सोलापूर तरुण भारत
आसमंत



# सनातनचा महाशंखनाद; तुष्टीकरणाचे गड उद्ध्वस्त...

**पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी सनातनचा महाशंखनाद केला असून, बंगालपासून ते तामिळनाडूपर्यंत तुष्टीकरणाचे गड उद्ध्वस्त केले आहेत. हिंदूंचा, हिंदुत्वाचा अपमान करणार्‍यांना जनता कदापि माफ करणार नाही, हे या निकालांनी अधोरेखित केले असून, ही विजयगाथा लोकशाहीच्या उत्सवात ‘धर्मस्थापने’चा क्षण ठरली आहे.**

राजकारण आचार्य पवण त्रिपाठी

भारतीय राजकारणाच्या कालखंडात काही क्षण असे येतात, जे संपूर्ण इतिहासाची दिशाच बदलून टाकतात. पण, नरेंद्र मोदी यांनी भारताचे नेतृत्व स्वीकारल्यापासून आजपर्यंत असे क्षण जणू ठोक भावाने दररोज समोर येत आहेत. मोदींची ‘भारत आणि भारतीय प्रथम’ ही संकल्पना रोज फुलत-फळत आहे. ‘सबका साथ, सबका विकास’, सुशासन, स्पष्टवक्तेपणा आणि पारदर्शकतेचे तत्व, या सर्वांनी मिळून आज पश्चिम बंगालच्या विधानसभा आणि दक्षिण भारतातील निवडणुकीचे निकाल जेव्हा समोर आले, तेव्हा हे स्पष्ट झाले की, हे केवळ सत्तांतर नाही, तर हा त्या कोट्यवधी वंचित-उपेक्षित स्वाभिमानांचा हुंकार आहे, ज्यांना दशकानुदशके ‘व्होट बँक’ राजकारणाच्या वेदीवर बळी दिले जात होते.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तनाच्या लाटेने आज ज्या पद्धतीने आपला झेंडा फडकावला आहे, त्यामुळे डॉ. श्यामाप्रसाद मुखज यांची आठवण येणे स्वाभाविक आहे. डॉ. मुखर्जी यांनी ज्या बंगालच्या मातीतून ‘एक राष्ट्र, एक विधान’चा संकल्प घेतला होता, आज त्याच मातीतून त्यांच्या विचारांच्या सरकारला जवळपास दोन तृतीयांश बहुमत देऊन नियतीचे चक्र पूर्ण झाले आहे. या ऐतिहासिक जनादेशाची पायाभरणी केवळ विकासाच्या आश्वासनांवर नाही, तर त्या सुरक्षेच्या भावनेवर आधारित आहे, जी गेल्या एका वर्षात गंभीर धोक्यात आली होती.

सुमारे दोन वर्षांपूर्वी शेजारी देश बांगलादेशात झालेल्या सत्तांतरानंतर जे काही घडले, ते बंगालचा हिंदू कधीही विसरणार नाही. बांगलादेशात ज्याप्रकारे सत्तांतर झाले आणि शेख हसीना यांना जीव मुठीत घेऊन भारतात पलायन करावे लागले, त्याने सीमापारच्या या बाजूला राहणाऱ्याबंगाली समाजालाही अक्षरशः हादरवून टाकले. ‘शांतीचे दूत’ म्हणून ओळखले जाणारे ‘नोबेल’ पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांनी सत्ता सांभाळताच, बांगलादेशात जे घडू लागले, त्याने भारतातील तथाकथित धर्मनिरपेक्षतेचा मुखवटा फाडून टाकला. बांगलादेशातील प्रसिद्ध लोकसंगीतकार राहुल आनंद यांचे १४० वर्षे जुने घर जाळण्यात आले. ही केवळ एक घटना नव्हती, तर एका संस्कृतीला नष्ट करण्याचा तो अश्लाघ्य प्रयत्न होता. त्यांच्या हाताने बनवलेली वाद्ये जाळण्यात आली, तेव्हा त्याचे चटके पश्चिम बंगालमधील मालदा, मुर्शिदाबाद आणि नादिया जिल्ह्यांतही जाणवले.

‘इस्कॉन’च्या संतांची अटक आणि हिंदूंच्या हत्याकांडावर जेव्हा भारतातील ‘सेक्युलर जमात’ आणि ममता बॅनर्जी यांचे प्रशासन मौन बाळगून होते, तेव्हा बंगालचा सामान्य हिंदू समजून गेला की, जर आज तो जागा झाला नाही; तर उद्या त्याचीही अवस्था अशीच होईल. मतदान केंद्रांवर लागलेल्या लांबलचक रांगा ही या ‘अस्तित्वाच्या लढाई’चीच परिणती होती. यावेळी हिंदूंनी ‘चुपचाप कमल छाप’ नव्हे, तर ‘उघडपणे अधिकार’ ही नीती स्वीकारली.

**पश्चिम बंगालमधील भाजपच्या ऐतिहासिक विजयाची परिणती ही केवळ ममतादीदींच्या बेबंदशाहीचाच परिणाम नाही, तर हिंदू जागृतीचा तो नवअध्याय ठरला आहे. त्यामुळे आता सम्राट गोपालपासून, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर यांसारख्या धुरिणांनी दाखवलेल्या हिंदुत्वाच्या वाटेचा राजमार्ग करण्याचा संकल्प करावा लागेल.**

ममतादीदींच्या ‘इमाम भत्ता’पासून ते धार्मिक तुष्टीकरणाच्या राजकारणाने बंगालच्या मूळ स्वरूपाला बासनात गुंडाळले होते. ‘जय श्रीराम’च्या घोषणांवर तुरुंगात डामणार्या या मानसिकतेला, आज जनतेने सत्तेबाहेरचा मार्ग दाखवून हे सिद्ध केले आहे की, बंगाल आता ‘संदेशखाली’सारख्या घटनांना सहन करणार नाही. महिलांवरील अत्याचार आणि स्थानिक पातळीवरील तृणमूलच्या ‘सिंडीकेटराज’मुळे निर्माण झालेला रोष बांगलादेशातील घटनांनी ज्वलंत आगीत परिवर्तित झाला आणि आजचा निकाल हा त्या सामूहिक चेतनेचाच परिणाम आहे. बंगालची ही लाट दक्षिणेकडेही तितक्याच वेगाने धडकली. तामिळनाडूमध्ये एम. के. स्टॅलिन यांचा पराभव हा भारतीय राजकारणातील अत्यंत महत्त्वाचा संकेत आहे. ज्यांनी सनातन धर्माची तुलना ‘डेंग्यू’ आणि ‘मलेरिया’शी केली होती आणि त्याला संपवण्याची शपथ घेतली होती, त्यांना तामिळनाडूच्या ईश्वरभक्त जनतेने आपली ताकद दाखवली. ‘द्रविडी’ राजकारणाच्या नावाखाली हिंदू संस्कृतीचा अपमान आता राज्यात मान्य नाही. भाजपने तेथे केवळ आपला जनाधार वाढवला नाही, तर स्टॅलिन यांच्या अभेद्य किल्ल्यालाही धक्का देत, हे सिद्ध केले की, ‘मुरुगन’ची भूमी अधर्म्यांच्या बाजूने उभी राहणार नाही. आसाममध्ये भाजपच्या प्रचंड विजयाने मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या ‘घुसखोरीमुक्त आसाम’ या धोरणावर शिक्कामोर्तब केले आहे. आसामच्या मूळ रहिवाशांनी स्पष्ट केले आहे की, ते त्यांच्या लोकसंख्यात्मक रचनेशी आणि संस्कृतीशी कोणतीही तडजोड करणार नाहीत. पुदुच्चेरीसारख्या लहान केंद्रशासित प्रदेशात भाजपचे सरकार स्थापन होणे हे दर्शवते की, ‘कमळ’ आता देशाच्या प्रत्येक कोपर्यात फुलण्यासाठी सज्ज आहे. हा केवळ निवडणुकीतील विजय नाही, तर उत्तर ते दक्षिण असा वैचारिक एकात्मतेचा आणि सनातनचा शंखनाद आहे. या निवडणुकीचा सर्वांत मोठा संदेश असा आहे की, आता हिंदू बचावात्मक नाही; तर ठामपणे पुढे येत आहे. तो आपल्या ओळखीबद्दल लाजिरवाणा नसून, हिंदू असण्याबद्दल अभिमान बाळगतो. तो विकासाबरोबरच आपल्या परंपरेचे रक्षणही करू इच्छितो. विरोधी पक्षांसाठी हा स्पष्ट धडा आहे की, बहुसंख्य समाजाच्या भावनांना तुडवत सत्ता मिळवता येत नाही. जेव्हा कोलकात्याच्या रस्त्यांवर विजयी शंखनाद होत आहे, जो एका नव्या युगाचा प्रारंभ आहे, जिथे तुष्टीकरणाला कदापि स्थान नसेल. पश्चिम बंगालने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना खरी श्रद्धांजली अर्पण केली आहे. आता बंगालला पुन्हा ‘सोनार बांगला’ बनवण्याचे आव्हान आहे; ही विजयगाथा लोकशाहीच्या उत्सवात ‘धर्मस्थापने’चा क्षण आहे. हा विजय त्या हुतात्म्यांना अभिवादन आहे, ज्यांनी बंगालच्या अस्मितेसाठी प्राणांची आहुती दिली. आजचा सूर्योदय एका नव्या भारताचा- समर्थ, सक्षम आणि सनातनी भारताचाच उदय दर्शवतो.

# विकासाची गगनभरारी



लक्ष्यवेध
प्रतिनिधी

कोणत्याही राज्याच्या किंवा देशाच्या प्रगतीचे मोजमाप करायचे असेल, तर तिथल्या पायाभूत सुविधांकडे नजर टाकावी लागते. अमेरिकेचे रस्ते चांगले आहेत, ते अमेरिका श्रीमंत असल्यामुळे नाही; तर अमेरिकेचे रस्ते चांगले असल्यामुळेच अमेरिका श्रीमंत आहे, हे जॉन एफ. केनेडी यांचे सुप्रसिद्ध वाक्य.

आज महाराष्ट्राच्या भूमीवर याच तत्त्वाचा साक्षात्कार होताना दिसला. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई आणि राज्याची सांस्कृतिक व ‘आयटी’ राजधानी असलेले पुणे, या दोन महानगरांना जोडणाऱ्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे राष्ट्रार्पण झाले. हा उद्घाटन सोहळा नव्या, गतिमान आणि प्रगत महाराष्ट्राच्या प्रवासातील सुवर्णक्षण ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीच्या आणि गतिमान नेतृत्वाखाली महाराष्ट्राने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात जी गरुडझेप घेतली आहे, त्याचे हे एक ज्वलंत उदाहरण ठरावे.

मेट्रोचे जाळे, भविष्याचा वेध घेणाऱ्या ‘पॉड टॅक्सी’, कोस्टल रोड, ‘समृद्धी’सारखे महामार्ग आणि आता ‘मिसिंग लिंक’. या सर्व प्रकल्पांतून एकच गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे महाराष्ट्र आता थांबणार नाही. राज्याची ही घोडदौड जागतिक स्तरावर एक नवी ओळख निर्माण करणारी ठरत आहे.

मुंबई- पुणे ‘एक्सप्रेस-वे’ हा तसा देशातील पहिलावहिला द्रुतगती मार्ग. १९९०च्या दशकात शिवसेना-भाजप युतीच्या काळातच या मार्गाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या मार्गाने मुंबई-पुणे प्रवासाची व्याख्याच बदलली. मात्र, या मार्गावरील खंडाळा घाट हे चालकांसाठी नेहमीच एक मोठे आव्हान असे. पावसाळ्यात दरडी कोसळणे, अवजड वाहनांमुळे होणारी वाहतुककोंडी आणि अपघातांच्या मालिकेमुळे प्रवाशांना मोठाच मनस्ताप सहन करावा लागे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणूनच ‘मिसिंग लिंक’ची संकल्पना पुढे आली. या प्रकल्पातील बोगदे हे जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक ठरले असून, यात उभारण्यात आलेला ‘केबल-स्टेड’ पूल हा जमिनीपासून १३२ मीटर उंचीवर आहे. तो आशियातील सर्वांत उंच पुलांपैकी एक ठरला.

त्याशिवाय, जगातील सर्वांत मोठा रुंद बोगदा, या जागतिक विक्रमालाही त्याने गवसणी घातली आहे. हा प्रकल्प भारतीय अभियंत्यांच्या कौशल्याचा, त्यांच्या कल्पकतेचा आणि

**महाराष्ट्रात होत असलेला पायाभूत सुविधांचा विकास, राज्याला प्रगतिपथावर नेणारा ठरला. ‘मिसिंग लिंक’ हे त्याचेच प्रतीक ठरावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होत असलेली प्रगती, राज्याला अग्रेसर करणारी ठरली. म्हणूनच, ‘मिसिंग लिंक’चे राष्ट्रार्पण महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील सुवर्णयुगाचा अध्याय ठरतो.**

महाराष्ट्राच्या जिद्दीचा एक अद्वितीय अविष्कार ठरावा. सह्याद्रीच्या कठीण कातळाला भेदून विकासाचा मार्ग कसा प्रशस्त केला जातो, याचेच हे मूर्तिमंत उदाहरण.

‘मिसिंग लिंक’ प्रकल्प राष्ट्राला अर्पण झाल्यामुळे, मुंबई आणि पुण्यातील अंतर सुमारे सहा किलोमीटरने कमी झाले आहे. तथापि, यातून वाचणारा वेळ हा अत्यंत महत्त्वपूर्ण असाच. घाटातील वाहतुककोंडी टळल्यामुळे प्रवाशांचा किमान २० ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. आजच्या वेगवान जगात ‘वेळ हाच पैसा आहे’. मुंबई- पुणे या पट्ट्यात दररोज लाखो नागरिक, ‘आयटी’ व्यावसायिक, उद्योजक आणि विद्याथ प्रवास करतात. त्यांच्या आयुष्यातील रोजचा अर्धा-पाऊण तास वाचणे, हे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणारे ठरेल.


याशिवाय, घाटातील वाहतुककोंडीमुळे होणारा इंधनाचा अपव्ययही आता थांबणार असल्याने, दररोज हजारो लिटर इंधनाची बचत होईल. घाटातील अपघातांचे प्रमाण या नव्या आणि सरळ मार्गामुळे शून्यावर येण्यासही मदत होईल. औद्योगिक मालवाहतूक वेगाने झाल्यामुळे उत्पादन क्षेत्रालाही याचा मोठाच फ लाभ होणार असून, राज्याच्या ‘जीडीपी’ वाढीला यातूनच गती मिळेल.

महामार्गांबरोबरच, शहरांतर्गत वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यावरही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सरकारने दिलेला भर कौतुकास्पद असाच. एका दशकापूर्वी मुंबईतील वाहतूक म्हणजे गर्दीने भरलेल्या लोकल ट्रेन आणि ट्राफिकमध्ये अडकलेल्या ‘बेस्ट’ बस, असेच समीकरण होते. आज मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरांचा चेहरामोहराच ‘मेट्रो’मुळे बदलला आहे. मुंबईत मेट्रोच्या विविध मार्गिकांचे जाळे वेगाने विणले जात असून, यामुळे मुंबईकरांचा प्रवास आता वातानुकूलित, सुरक्षित आणि वेगवान झाला आहे.

कागदावरच रेंगाळलेले हे प्रकल्प फडणवीस सरकारमुळे वेगाने माग लागले. पुण्यातही मेट्रो धावल्याने, सांस्कृतिक राजधानीला एक आधुनिक नागरी वाहतूक व्यवस्थाही मिळाली. नागपूर मेट्रोने तर विदर्भाच्या विकासाला एक नवे परिमाणच दिले. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जितकी सक्षम, तितकाच रस्त्यांवरील वाहनांचा ताण कमी होऊन, पर्यावरणाचेही रक्षण होते. शाश्वत विकासाचे हे प्रारुप महाराष्ट्र यशस्वीपणे देशासमोर मांडत आहे. आधुनिक तंत्रज्ञान अंगीकारण्यात, महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिला आहे. ‘वांद्रे-कुर्ला संकुला’सारख्या देशातील सर्वांत मोठ्या व्यावसायिक केंद्रात, ‘पॉड टॅक्सी’ प्रकल्प राबवण्याचा निर्णय हा याच प्रगत विचारसरणीचा भाग.

राज्याच्या कानाकोपऱ्यात महामार्गांचे चौपदरीकरण युद्धपातळीवर सुरू आहे. यामुळे महाराष्ट्रातील कोणतेही शहर किंवा गाव आता विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेले नाही. मुंबई, पुणे, नाशिक या त्रिकोणात अडकलेला उद्योग आता छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि सोलापूरसारख्या शहरांकडे वळत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राला ‘वन ट्रिलियन डॉलर इकोनॉमी’ बनवण्याचे जे उद्दिष्ट ठेवले, ते गाठण्यासाठी हे सर्व प्रकल्प भक्कम पाया ठरणार आहेत. त्यांच्या भगीरथ प्रयत्नांमुळेच आज महाराष्ट्र विदेश गुंतवणुकीत देशात अव्वल स्थानावर आहे.

पायाभूत प्रकल्पांचा एकत्रित परिणाम हा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर आणि पर्यायाने सर्वसामान्यांच्या जीवनावर सकारात्मक होत आहे. ‘मिसिंग लिंक’चे आज झालेले राष्ट्रार्पण महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील सुवर्णयुगाचा अध्याय ठरावा. महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याशी जोडणारा एक भक्कम दुवा आज पूर्ण झाला आहे.



समाजभान

प्रवीण दीक्षित

# कळ्या उमलताना...



गेल्या काही दिवसांत अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या ऐकू येत आहेत. यामुळे राज्यातील अल्पवयीन मुलींची सुरक्षा हा मोठाच प्रश्न निर्माण झाला आहे. कायदा आणि सुव्यवस्था असूनही, वाढणारे गुन्हे ही चिंतेची बाब. त्यामुळे अल्पवयीन मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा घेतलेला आढावा...


भोर तालुक्यातील नसरापूर येथे ६५ वर्षांच्या नराधमाने, तीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केली. अत्यंत निंदनीय असेच हे कृत्य. या पूर्वीही दोनवेळा अल्पवयीन मुलींवर अशी कृत्ये करूनही, न्यायालयाने त्याला 'दोषमुक्त' जाहीर केले होते. त्याचवेळी उच्च न्यायालयाने स्वत:हून दखल दिली असती व आरोपीला शिक्षा झाली असती, तर ही घटना टळू शकली असती. पोलिसांनीही महिलांविरुद्धच्या प्रत्येक गुन्ह्यात, आरोपीला शिक्षा होईपर्यंत सर्वोच्च न्यायालयापर्यंत खटला लढवणे गरजेचे आहे. समाजातील ही विकृती कशी रोखायची, हा शासन, पोलीस, तसेच संपूर्ण समाजापुढे आज प्रश्न आहे. मुंबईतील साकीनाका येथे नुकत्याच एका 'निर्भया'ला, अत्यंत क्रूरपणे बलात्कार करून एका निर्जन ठिकाणी टाकण्यात आले. त्यानंतर, थोड्याच वेळाने बेशुद्धावस्थेतच तिचा मृत्यू झाला. ठाण्यात एका अल्पवयीन मुलीवर, गेले अनेक महिने ३०-३२ तरुणांनी बलात्कार केला. यात काही अल्पवयीन मुलांचाही समावेश होता. अत्यंत उद्वेग निर्माण करणाऱ्या या अशा घटना केवळ पुणे, मुंबई, ठाण्यापर्यंतच मर्यादित नसून, सर्वच शहरांमध्ये, गावांमध्ये वारंवार घडल्याचे नजरेस येते. यातील अनेक पीडिता या अल्पवयीन मुलीच आहेत. सामाजिक माध्यमे जसे फेसबुक, व्हॉट्सप यांच्या मदतीने विश्वास निर्माण करणे, प्रत्यक्ष भेटीसाठी बोलावणे व त्यानंतर शारीरिक संबंध प्रस्थापित करणे, त्याचा व्हिडिओ तयार करणे, शस्त्रांचा धाक दाखवणे, 'ब्लॅकमेल' करत अत्याचार चालू ठेवण्यासारखे प्रकार सतत उघडकीस येत आहेत.

शारीरिक छळ करणे, वर्दळीच्या ठिकाणी छेडछाड करणे, शिवाय मोबाईल, ई- मेल या माध्यमातून सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बहुतेक सर्व गैरप्रकार करण्यात ओळखीचे लोक नातेवाईक, शेजारी हेच जास्तीत जास्त आरोपी म्हणून समोर आले आहेत. या व्यक्तींविरुद्ध तक्रार करायला पीडिता तयार होत नाहीत; मुलीला तक्रार करू नये, यासाठी पालकही दबाव आणतात. पीडिता हीच जणू काही दोषी आहे, अशी वागणूक समाजातून दिली जाते. हे ओळखूनच अल्पवयीन मुलींनी ओळख असलेल्या किंवा विश्वासू वाटणाऱ्या कोणत्याही पुरुषांबरोबर एकट्याने राहताना, जास्तीत जास्त खबरदारी घेणे व विवाहपूर्व शरीरसंबंध ठेवण्यास विरोध करणे आवश्यक आहे. याशिवाय, जर कोणी अतिप्रसंग करायला लागलाच, तर ११२ या भारत सरकारने आपत्कालीन मदतीसाठी सुरू केलेल्या ॲपच्या माध्यमातून. तत्काळ पोलीस मदत मिळवावी. याशिवाय 'सायबर टोलमुक्त हेल्पलाईन १५५२६०'वर संपर्क करावा. हा क्रमांक सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध आहे. त्याशिवाय, www. Cyberbrime.gov.in यावर ई-मेलही करावा. यामध्ये आपले नाव गुप्त ठेवूनही तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. शासनाने बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये दोन महिन्यांत दोषारोप-पत्र पाठवणे बंधनकारक केले असून, त्यासाठी जलद गती न्यायालयांची स्थापन केली आहे. छेडछाडीच्या घटनांमध्ये पीडितेचा जबाब व अन्य पुरावा एकत्र करून, पोलिसांनी २४ तासांत दोषारोपपत्र पाठवणे बंधनकारक करणे आवश्यक आहे.

वेळच्या- वेळेसच टवाळखोरांना न्यायालयातून शिक्षा झाल्यास, बलात्कारासारखे पुढील गंभीर गुन्हे कमी होण्यास मदत होते. यासाठी न्यायाधीशांनीही कठोर भूमिका घेऊन अरोपींना दया न दाखवता, शिक्षा करणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांचेही वेळोवेळी प्रशिक्षण आवश्यक ठरते. त्यामुळे समाजात कायद्याविषयी विश्वास उत्पन्न होईल. महिला पोलिसांनी आपल्या हद्दीतील महिला बचतगट सदस्या, महिलांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने, शाळा व महाविद्यालयातील मुलींसाठी ठिकठिकाणी प्रत्यक्ष अथवा 'झूम'सारख्या ॲपची मदत घेऊन जनजागृती करणे, महिलांमधे व अल्पवयीन मुलींमधे पोलिसांबद्दल विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे.

अत्याचाराचे बळी असणाऱ्या पीडितांशी संवाद साधून, त्यांना पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास प्रोत्साहित करणे, न्यायालयात त्यांना खंबीर आधार देऊन सत्य सांगण्यास पाठिंबा देणेही आवश्यक ठरते. पोलिसांनीही 'महिला पोलीसमित्र' ही संकल्पना राबवून, ज्या ठिकाणी पोलीस उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी 'महिला पोलीसमित्रां'च्या मदतीने, अल्पवयीन मुलींशी संवाद साधणे गरजेचे झाले आहे.

महिलांची, मुलींची सुरक्षा ही आपली समजून त्यासाठी क्रियाशील राहणेही गरजेचे आहे. अल्पवयीन मुलांना एकटे न सोडता, त्यांच्या सुरक्षेची खबरदारी घेणे, प्रत्येक पालकाचेही कर्तव्य असून, ही जबाबदारी पार न पाडणाऱ्या पालकांवरदेखील सौम्य स्वरूपात कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा गरजेची आहे.




# डिजिटल दुकानाची किल्ली 'जेन-झी'च्या हाती!

**अवघ्या दहा मिनिटांत घरपोच सेवा देणाऱ्या 'क्विक कॉमर्स' कंपन्या, ऑनलाईन सदस्यता देणाऱ्या कंपन्या, 'ई-कॉमर्स' कंपन्यांना सुगीचे दिवस का आले? कारण, त्यांचा एक मोठा ग्राहकवर्ग 'जेन-झी'च्या माध्यमातून तयार झाला. नमूद केलेल्या सर्वच क्षेत्रांची एकत्रित उलाढाल २५० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक होऊ शकते. त्याची मदार ही केवळ 'जेन-झी'च्या खांद्यावर आहे, असा एक अहवाल नुकताच प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने...**

आकलन

तेजस परब

पूर्वीच्या काळातील वस्तुविनिमय (बार्टर) पद्धतीपासून ते आता अलीकडे डिजिटल व्यवहारांपर्यंत, भारतीय बाजारपेठेनेही कित्येक स्थित्यंतरे अनुभवली. एकेकाळी रोखीने, धनादेशाने, डेबिट किंवा क्रेडिट कार्डद्वारे होणारे व्यवहार आता 'यूआर कोड पेमेंट' पद्धतीवर येऊन ठेपले. पूर्वीच्या काळी लिखितस्वरूपात असलेल्या वही-खात्यांची जागा संगणकाने घेतली. आता तीच संगणकीय पद्धत 'सर्व्हर'अंतर्गत 'मोबाईल बेस ॲप्लिकेशन'द्वारे आणि 'बारकोड यंत्रणे'द्वारे होऊ लागली.

जसजसे नवतंत्रज्ञानाने आपले स्थान बाजारपेठांमध्ये मजबूत केले, तसेच व्यापक बदल खरेदी-विक्री, व्यवहारांमध्येही आज प्रकर्षाने उमटलेले दिसतात. गेल्या २५ वर्षांनंतर आता प्रथमच पुढची पिढी म्हणजेच, 'जेन-झी' पिढी कमावती झाली. त्यांची क्रयशक्ती वाढली. पूर्वी आर्थिकदृष्ट्या पालकांवर अवलंबून असणारी ही पिढी आता जवळपास सगळेच निर्णय स्वबळावर घेऊ लागली. ही पिढी पूर्वापार चालत आलेल्या जोखडात राहणारी नाही, हे एव्हाना आपल्याला अवतीभोवती उदाहरणे पाहिली की, लक्षात येतेच. याच पिढीच्या अशाच वागण्या- बोलण्याचा, व्यवहारज्ञानाचा ऊहापोह आणि बाजारपेठेवर त्याचे होणारे संभाव्य परिणाम '२५० अब्ज डॉलरचे ई- कॉमर्सचे नवे क्षितिज' या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहेत. 'गुगल'च्या मते, भारतीय ग्राहक जो मुळात 'टीअर २' शहरांतून येतो, तो डिजिटल व्यवहार करताना कुठल्याही भाषा किंवा भौगोलिक सीमांची बंधने मुळात बाळगत नाहीत.

एकाच वेळी 'स्ट्रीमिंग', 'स्क्रोलिंग' आणि 'ॲप सर्फिंग' आदींद्वारे खरेदी करण्याचा अनुभव ते घेत असतात. असे करण्यात 'जेन-झीं'ची संख्या अधिक. ऑनलाईन खरेदीच्या या प्रक्रियेत आता फक्त खरेदी आणि व्यवहार ही गोष्ट मर्यादित राहिलेली नाही. त्याचे 'रिव्ह्यू', 'फिलेट मार्केटिंग', 'इन्फ्लूएन्स मार्केटिंग' असे नवे पैलूही खुले झाले आहेत. 'सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर्स'च्या मदतीने ग्राहक प्रभावाखाली येतो, त्याने दिलेल्या व्हिडिओ आशयामुळे अनुभव घेतो, त्याबद्दलचे सकारात्मक आणि नकारात्मक घटक समजून घेतो आणि आवडल्यास खरेदीही करतो. 'डीटूसी ब्रॅण्ड्स' किंवा सेवा देणाऱ्या कंपन्यांनी हा बदल समजून घेणे आवश्यक आहे. या अहवालानुसार, भारतातील ऑनलाईन किरकोळ बाजारपेठ ८५ ते ९० अब्ज डॉलर्स इतकी असून, ती पुढील पाच वर्षांत २०३० पर्यंत २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते, असा अंदाज आहे. २०२१ ते २०२५ याकाळात भारतात '५-जी' क्रांती झाली. इंटरनेट सर्वदूर गावखेड्यात पसरले. परिणामी, एकूण ११ कोटी नवे ग्राहक या बाजारपेठेत उतरले. देशातील १९ हजार पिनकोडपर्यंत घरपोच वस्तुसेवा देण्याची आज व्यवस्था आहे. त्यामुळे 'ई-कॉमर्स'वर दिल्ली, मुंबई, बंगळुरू यांसारख्या महानगरांची मक्तेदारी मुळीच नाही. 'टीअर-२' आणि 'टीअर ३' शहरांतही ऑनलाईनच्या माध्यमातून एकूण ६० टक्के ऑर्डर्स आहेत.तिथेही ११ कोटी ग्राहक पाच वर्षांत ऑनलाईन बाजारपेठेशी जुळवून घेण्यात यशस्वी झाले आहेत. स्थानिक भाषांमधील मजकूर, आशय, स्वस्त 'स्मार्टफोन्स', गावखेड्यात पोहोचलेली इंटरनेट सुविधा, डिजिटल व्यवहारांबद्दलची जनजागृती या घटकांमुळे या शहरांचा सहभाग वाढला.

(पान ६ वर)

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर

शहरात एखादी नवी इमारत, उड्डाणपूल किंवा मोठा प्रकल्प उभा राहताना आपण त्याकडे विकासाचे प्रतीक म्हणून पाहतो. क्रेन फिरत असतात, सिमेंटचे मिक्सर अखंड चालू असतात, कामगारांची लगबग सुरू असते. या सगळ्या हालचालींमध्ये शहराच्या वाढीचा उत्साह दिसतो. पण या गोंगाटाच्या मधोमध काही लहान मुलंही असतात- धुळीत बसून खेळणारी, लोखंडी सळ्यांच्या बाजूला भटकणारी, कधी सिमेंटच्या पोत्यावर झोपलेली. शहरासाठी ही दृश्यं साधी असतात; प्रत्यक्षात ती एका हरवत चाललेल्या बालपणाची कथा सांगत असतात.

उंच इमारतींच्या सावलीत वाढणाऱ्या या मुलांचं आयुष्य मात्र अस्थिरता, असुरक्षितता आणि वंचिततेने भरलेलं असतं. भारतामध्ये सुमारे ९. ३ कोटी मुले स्थलांतरित गटात मोडतात. स्थलांतरामुळे शाळेत प्रवेश घेणे, कागदपत्रे मिळविणे आणि सातत्य राखणे कठीण होते. काही वेळा मुलांना तात्पुरत्या शाळांमध्ये प्रवेश मिळतो, पण काही महिन्यांतच पुन्हा स्थलांतर झाल्यामुळे शिक्षण खंडित होते. परिणामी अनेक मुलांचे बालपण शाळेच्या वर्गात न घालवता बांधकाम साईटवरच जातं. आरोग्याच्या बाबतीतही परिस्थिती गंभीर आहे. अनेक अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, सुमारे ४७ टक्के मुले कुपोषणाच्या समस्येला सामोरी जातात. योग्य आहार, स्वच्छ पाणी आणि आरोग्यसेवा यांचा अभाव ही त्यांच्या आयुष्याची सामान्य स्थिती बनलेली असते. बांधकाम साईटवरील धूळ, सिमेंटचे कण आणि प्रदूषण यामुळे श्वसनविकार, त्वचारोग आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो.

लहान वयातील मुलांना सतत धुळीत राहावे लागल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता असते. सुरक्षेचा प्रश्न तर अधिकच गंभीर आहे. ८० टक्क्यांहून अधिक मुले उघड्यावर, धोकादायक आणि असुरक्षित वातावरणात वाढतात. साईटवरील खोल खड्डे, उघड्या लोखंडी सळ्या, जड यंत्रसामग्री




# सिमेंटच्या धुळीत हरवणारं बालपण

यापैकी अंदाजे १.५ कोटी मुले दरवर्षी आपल्या पालकांसोबत रोजगाराच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात आणि त्यातील मोठा हिस्सा बांधकाम क्षेत्राशी संबंधित असतो. ही मुले कोणत्याही एका गावाची किंवा शहराची राहत नाहीत. त्यांचे बालपण सतत बदलणाऱ्या साईट्स, तात्पुरत्या झोपड्या आणि अस्थिर आयुष्याच्या भोवऱ्यात अडकलेले असते. आज एका शहरात, उद्या दुसऱ्या शहरात अशा सततच्या स्थलांतरामुळे त्यांना स्थैर्याचा अनुभवच मिळत नाही. एका अंदाजानुसार भारतातील चार कोटी बांधकाम मजुरांपैकी मोठा वर्ग आपल्या कुटुंबासह साईटवरच राहतो. त्यामुळे हजारो मुले दिवसाचे तास धुळीच्या ढिगाऱ्यांत, लोखंडी सळ्यांच्या सावलीत आणि धोकादायक यंत्रसामग्रीच्या आसपास घालवत असतात. त्यांच्या आयुष्यात खेळाचं मैदान नसतं, बालवाडी नसते, शाळेची घंटा नसते; असते ती फक्त आई-वडिलांच्या श्रमाची धावपळ. अनेक वेळा आई-वडील दिवसभर कामात गुंतलेले असल्यामुळे मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी कोणीही नसते. परिणामी लहान मुलं साईटवरच फिरत राहतात किंवा थोडी मोठी मुलं लहान भावंडांची काळजी घेत बसतात.

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सुमारे १.०६ कोटी स्थलांतरित मुले आहेत, ज्यामध्ये बांधकाम मजुरांच्या मुलांचे प्रमाण लक्षणीय आहे. या मुलांच्या शिक्षणाची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. विविध अभ्यासांनुसार ७० ते ८० टक्के मुले नियमित शाळेत जाऊ शकत नाहीत. कारण आणि उंचावर चालणारे काम यामुळे अपघाताचा धोका कायम असतो. अनेक वेळा साईटवर बालसंगोपनाची कोणतीही व्यवस्था नसते. त्यामुळे मुलं खेळताना किंवा भटकताना अपघाताला बळी पडण्याची शक्यता वाढते. या वास्तवात मुलींची परिस्थिती आणखी जटिल बनते. त्या दुहेरी वंचितपणाचा सामना करतात. एकीकडे स्थलांतरित कुटुंबातील अस्थिर जीवन तर दुसरीकडे लिंगाधारित भेदभाव. लहान वयातच त्यांच्यावर घरकाम आणि लहान भावंडांची जबाबदारी येते. अनेक वेळा त्या शाळेत जाण्याऐवजी आईला घरकामात मदत करतात किंवा भावंडांची काळजी घेतात. असुरक्षित वातावरणामुळे छेडछाड, शोषण किंवा बालविवाहाचा धोकादेखील वाढतो. भारतात बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी काही कायदेशीर तरतुदी अस्तित्वात आहेत. अलीं अंतर्गत विविध राज्यांमध्ये बांधकाम कामगार कल्याण मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. या मंडळांमार्फत शिक्षण, आरोग्य आणि बालसंगोपनासाठी काही सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. अनेक कामगारांची नोंदणी होत नाही, स्थलांतरित स्वरूपामुळे योजनांची माहिती मिळत नाही आणि साईटवर आवश्यक सेवा पोहोचत नाही. खरं तर शहरांच्या विकासात बांधकाम कामगारांचे योगदान अनन्यसाधारण आहे. उंच इमारती, रस्ते, पूल आणि पायाभूत सुविधा उभारण्यात त्यांचा मोठा वाटा असतो. पण विडंबना अशी की, शहराचा चेहरा बदलणाऱ्या या श्रमिकांच्या मुलांना मात्र सुरक्षित आणि सन्मानजनक बालपण मिळत नाही.

(पान ६ वर)

कथा

रेखा भिवगडे

# कन्यादान

'चला वेळेत पोहोचलो....' मोबाईलमध्ये वेळ पहात दिनकरराव पुटपुटले. त्यांची पत्नी दीपालीने विचारले, "आता इतक्यात कसली ही सभा-मीटिंग ठेवली? काही त्याचे कारण कळले नाही?" आत शिरताच दीपाली पुढे म्हणाली, "अरे, इथे गौरी व श्रीयाळ करवदेच दिसत आहेत. वेळ तर झाली." श्रीयाळ, गौरी म्हणाले, "नमस्कार, दिनकरराव, दीपालीजी." "नमस्कार, नमस्कार! चला बसूयात." सभागृहात नेहमीचीच व्यवस्था होती. दिलेल्या वेळेपर्यंत ही चौघेच होती. जवळपास अर्धा तासात सभागृह सभासदांनी भरून गेले. पदाधिकारी मंचावर स्थानापन्न झाले. गणपती, सरस्वती वंदनेने सुरुवात झाली. दीपप्रज्वलनाचा कार्यक्रम मागील दोन- तीन सभांपासून बाद करण्यात आला. कारण साठवलेल्या तेलाची, मेणबत्ती वगैरेची नेहमीच करावी लागणारी तयारी, उगाचच खटाटोप वाटू लागली. सूर्याचा, त्यानंतर विजेच्या दिव्यांचा लखलखाट होताच. सरस्वती वंदनेनंतर सर्वांनी उजवा हात पुढे करून नित्याची प्रतिज्ञा घेतली. 'आम्ही आमच्या देशाचे सुविद्य नागरिक आहोत. आमच्या 'सर्वतोपरि' संस्थेद्वारे नित्यनेमाने समाज व देशहिताकरिता सुयोग्य कार्य करतो. करत राहू. जय हिंद.' सर्वांनी आपापली आसनं ग्रहण केलीत. सचिव बंडू नाना म्हणाले, "यावेळेस सामूहिक विवाहवचा प्रस्ताव आपणा सर्वांसमोर ठेवत आहोत. आनंदमय अनाथ आश्रमांतील तीन मुलींचे तसेच मुला- मुलींच्या लग्नाकरिता धन न जमवू शकणाऱ्या निर्धन, रोजंदारी करणाऱ्या लोकांच्या मुला- मुलींच्या सामूहिक विवाहाचे आयोजन करावयाचे आहे. त्यात आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित, नाही तर गृहीतच धरले आहे.

जवळपास आपण २५ उपवर तरुण- तरुणींचे विवाह नक्की केले. त्यातील अनाथ आश्रमातील तीन कन्या आहेत. दोन कन्यांना माता-पिता मिळाले. तिसऱ्या कन्येचे नंदाचे कन्यादान करण्यास आपण होऊन तयार असतील त्यांनी सहज पुढाकार घ्यावा..." सभागृहात कुजबूज होत-होत आवाज वाढला..." शांत व्हा! ऐका, सारे फक्त एकाच गोष्टीवरून गदारोळ करू नका. आपण सर्व जी प्रतिज्ञा घेतो व ज्या विचारांनी प्रेरित होऊन ही संस्था आपली म्हणतो, त्यापासून दूर जात आहात. तर, कन्यादानाकरिता तयार असणारे..."

तोच दिनकरराव व दीपाली चटकन उठून उद्गारले, "आम्ही कन्यादानास तयार आहोत." "बस्स! प्रश्नच मिटला. आता पुढील कार्यक्रमाची रूपरेखा आदरणीय अध्यक्ष दादासाहेब पाटील समजावतील, अशी मी आदरणीय अध्यक्ष दादासाहेबांना विनंती करतो." असे म्हणून सचिवांनी दादासाहेबांना बोलण्यास सुचविले.

"राम राम मंडळी, आपल्या 'सर्वतो परि' संस्थेचे ब्रीदवाक्य 'सदा तत्पर नागरिक' या विचारांचे सुयोग्य पालन आजतागायत आपण सर्वांनी केले. हा आता आपला सव्वाशेवा म्हणजे १२५ वा कार्यक्रम. २५ उपवर जोड्यांचे मंगल परिणय कार्य, पुण्यकार्यच म्हणा ना आपण करतोय. यात सर्वांना आमंत्रण आहे. आपण संस्थेकडून प्रत्येक जोडप्याला संसारोपयोगी वस्तू देणार आहोत. त्या सर्व आपण आपल्या नेहमीच्या वर्गणीतून पूर्ण करणार आहोत.

लग्न दिवशी फक्त न्याहारी-फराळ देऊ. जर कोणाला जेवणाचा घाट घालायचा असल्यास, साधारण म्हणजे आपल्या सर्व सभासदांचे कुटुंब, जोडप्यांचे पालक, मित्र, काही वऱ्हाडी पकडून जवळपास दोन-अडीच हजार लोकांची भोजन व्यवस्था कोणी अतिरिक्त वर्गणीतून देऊ इच्छित असल्यास सांगा. इथेच



ठरवून घेऊ." गौरी-श्रीयाळ, दिनकर-दीपाली आणि अन्य दहा जणांनी भोजनास संमती दर्शवली. मंडप व इतर व्यवस्था सहा लोकांनी घेतली.

लग्नकार्याचा दिवस ठरला. पत्रिकेची भानगड न ठेवता तिथेच उपस्थित असलेल्या २५ ही उपवर जोडप्यांना तसेच सर्वांना निमंत्रण देऊन सभा सफल संपन्न झाली. लग्नाच्या दिवशी सारे सभागृह सुगंधाने, सनईच्या मंगलस्वरांनी आनंदी झाले होते. २५ वधू आपल्या आई- वडिलांसोबत उपस्थित होत्या. नियोजित वेळी २५ वर आपल्या आई-वडील, आप्तांसोबत मंगलाचरण, सीमांत पूजनानंतर प्रवेश करते झाले.

लग्नविधी, बाकी सारे सोपस्कार पूर्ण झाले. दिनकरदीपालीने, नंदाचे अश्रुपूर्ण नेत्रांनी कन्यादान केले. नंदाने आज दुसऱ्यांदा आई दीपाली व बाबा दिनकरचे पाय धरले. आई-बाबा नंदाने मायेचे कढ अनुभवले. दीपाली-दिनकरांना मुलगी नसल्यामुळे आणि दोघेही मुले दूर परदेशी. आता दोघेही सर्वतोपरी संस्थेत अनेकानेक उपक्रमातून सक्रिय सहभाग करीत आनंदाने जगत होते. त्यातच नंदाच्या कन्यादानाचेही पुण्य पदरी पाडून घेतले.

नंदाचा पती रमेश चांगला मुलगा होता. दीपाली म्हणाली, "ऋणानुबंध, बंधातून घडलेले कर्तव्यपूर्ण कन्यादान, रोमांचकच." दिनकर-दीपालीला नंदासारखी मुलगी, रमेशसारखा पुत्रवत जावई मिळाला. दोघांनीही वर्षभराचे नंदाचे सारे, सोपस्कार, संस्थेच्या सभासदांसह आनंदाने पार पाडलीत. जीवनाला एक नवे वळण सुखद अनुभूती मिळाली. ती अनुभवत तृप्त होत, संस्थेच्या उपक्रमातून नागरिक कर्तव्यपूर्तीचा आनंद सोहळा संपन्न होत राहिला.

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# उंटावरचा फकीर-२



आकाशात टिपूर चांदणे पडले होते. समुद्र पोटात असंख्य गुपिते घेऊन एका अनाम नाविकाला उसळत्या लाटांची मनस्वी साथ देत होता. तो अज्ञात खलाशी जन्माने इजिप्शियन ग्रीक आणि रोमन साम्राज्याचा नागरिक होता. इ. स. पहिल्या शतकाच्या उत्तरार्धात तांबड्या समुद्रावर बोटीने प्रवास करणारा तो खलाशी खरे तर एक साधारण व्यापारी होता. पण एका तीव्र उर्मीने त्याने इ. स. ६० मध्ये 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' हे तांबड्या समुद्राचे प्रवासवर्णन लिहिले आणि तो अमर झाला.

यापुस्तकात फक्त ६६ परिच्छेद आहेत; पण पहिल्यांदाच इजिप्तच्या दक्षिण किनाऱ्यावरच्या बेरेनिक बंदरापासून तांबड्या समुद्रावरून पूर्व आफ्रिकेशी आणि भारतासह आग्नेय आशियाशी होणाऱ्या प्राचीन व्यापाराचे या पुस्तकाद्वारे जगाला दर्शन झाले. मेगॅस्थेनिसचे 'इंडिका' असो किंवा कोणा अज्ञात नाविकाचे 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' असो, भारतीय इतिहासात ही पुस्तके अजरामर आहेत. कारण आपल्या प्राचीन व समृद्ध इतिहासाचे दस्तऐवजीकरण याच ऐतिहासिक पुस्तकांमुळे शक्य झाले आहे.

'इजिप्तमधल्या आमच्याकडच्या झाडांमधून डिंक स्रवतो,' असे विधान या अनाम खलाशाने केले. इजिप्तमध्ये स्थायिक झालेला हा ग्रीक व्यापारी आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरच्या अझानिया आणि अरेबियन द्वीपकल्पातल्या 'काना' बंदरापर्यंत व्यापारासाठी जात होता. समुद्रात प्रवास करीत असतानाच नैर्ऋत्य मोसमी वाऱ्याशी त्याचा परिचय झाला आणि लहान जहाजात बसून टम्म फुगलेल्या त्रिकोणी शिडाला धरून तो भारताच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत आला. हा एक सामान्य अनाम ग्रीक व्यापारी होता. फारसा शिकलेला नव्हता. त्याचे ग्रीक आणि लॅटिन शब्द, त्याने केलेल्या वाक्यरचना त्याच्या शिक्षणाबद्दल बरेच काही सांगून जातात. पण प्राचीन काळी नाविकांना तज्ज्ञांनी बनवलेले नकाशे मिळत नव्हते. केवळ स्वतःचे उत्तम दिशाज्ञान आणि सूक्ष्म निरीक्षणशक्तीच्या आधारावर त्याने पूर्वेच्या समृद्धीची गाथा पश्चिमेला सांगितली आणि यातच त्याचे थोरपण दिसून येते.

भारताच्या गजबजलेल्या बाजारपेठा, तेथील समृद्ध व्यापार संस्कृती याचे नेमके वर्णन त्याने पहिल्या शतकात केले. यामागे त्याची उदात्त विचारधारा नसेलही. कदाचित स्वतःच्याच पुढच्या प्रवासासाठी त्याने त्याच्या नोंदवहीत हे टिपण तयार केले असेल. पण प्राचीन समृद्ध भारतीय संस्कृतीच्या खुणा त्याने त्याच्या नोंदवहीत जपल्या म्हणून या अनाम नाविकाकडे अत्यंत आदराने पाहिले जाते. पेरिप्लसमध्ये तांबड्या समुद्राच्या नाविक मार्गांचे उल्लेख आहेत.

व्यापारी उलाढालींची वर्णने आहेत. पहिला मार्ग इजिप्तच्या बेरेनिक बंदरापासून सुरू होतो आणि एडनच्या आखातातून हॉर्न ऑफ आफ्रिकेच्या टोकावरच्या सोमालियामधल्या 'गार्डाफुईला' (रास असीर) प्रदक्षिणा घालून 'ऱ्हाफ्ता' या बंदरापर्यंत जातो.

पेरिप्लसने लिहिले आहे की, भारत आणि गार्डाफुई यांच्यामधील होणाऱ्या व्यापारावर भारतीय व्यापाऱ्यांचे वर्चस्व होते. दुसरा नाविक मार्ग इजिप्तचा पूर्व किनारा, मायोस होरमोसवरून सुरू होतो. हे बंदर टोलेमी वंशाचा राजा फिलाडेल्फस याने इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात भारतासोबतच्या व्यापारासाठी वसवले होते.

पेरिप्लसने सांगितलेला तिसरा मार्ग एडनच्या आखातातून बाहेर पडून अरबस्तानच्या पूर्व किनाऱ्याने युफ्राटीस नदीच्या तोंडी 'अपोलॉग' (अल् उबुल्ला) बंदरापर्यंत येऊन भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर नर्मदा नदीच्या मुखावर 'भडोच' बंदरापर्यंत येत होता आणि तेथून मलबार किनाऱ्यापर्यंत पोहोचत होता. या अनाम नाविकामुळे रोम, आफ्रिका, पर्शिया, भारत आणि चीन या साम्राज्यांच्या आणि शेजारील लहान-मोठ्या राष्ट्रांच्या किनाऱ्यावरच्या वसाहती आणि तेथल्या प्राचीन व्यापारासंबंधी पहिल्यांदाच माहिती मिळाली. यानिमित्ताने राजकारणामुळे व्यापार वर्चस्व कसे बदलत गेले हेही कळले. रोमने इजिप्तवरती विजय मिळविला आणि अरब व्यापाऱ्यांची मक्तेदारी कमी होऊन रोमचे भारताशी थेट व्यापारी संबंध तयार झाले.

मायोस हार्मोस या इजिप्तच्या बंदरावरून निघालेली गलबते उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर बर्बेर जमातीच्या देशात पोहोचायची. बर्बेर म्हणजे असंस्कृत आणि गुहेमध्ये राहणाऱ्या जमातींचे ठिकाण. तेथे जवळच अगरीयोफगोई जमातीचे मांसभक्षक लोकही राहायचे. येथेच पश्चिमेला नाईल नदीच्या पूर्व किनाऱ्यावर 'मेरोई' नावाचे प्राचीन शहर होते. त्याच्याच अंतर्गत नुबिया प्रांतात हत्तींचा मोठा व्यापार होता. तांबड्या समुद्राच्या आफ्रिकेच्या या पूर्व किनारी हस्तिदंताचे मोठे व्यापार केंद्र होते.

पेरिप्लसच्या डायरीत आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील अनेक महत्त्वाच्या बंदरांचा उल्लेख आहे. जसे की 'अडुलीस ' (मसावा), 'मालो', 'मुंडूस' या बंदरांजवळ जहाजे थांबायची. 'मुंडूस' बंदरानंतर जहाजे 'मोसिलम' (रास हन्तारा) येथे थांबत. कारण हे बंदर दालचिनीच्या व्यापाराचे मोठे केंद्र होते. त्यानंतर सोमालियाची 'गार्डाफुई' (रास असीर) खाडी लागायची आणि तेथील शेवटचे बंदर 'हाफ्ता' (सध्याचे किलावा बंदर) मध्ये सगळी गलबते थांबायची. येथे काथ्याने फळ्या एकत्र शिवून गलबते तयार केली जायची.

हस्तिदंत आणि कासवांच्या पाठींचा मोठा व्यापार येथेचालायचा. या बंदरांच्या विरुद्ध दिशेचा किनारा म्हणजे 'आरियाके' (खंबायत आखातापासून चौलपर्यंतचा समुद्रकिनारा) आणि 'बारिगाझा'(आजचे भडोच) येथून भारताचा स्थानिक माल 'ऱ्हाफ्ता' येथे यायचा. गहू, तांदूळ, तूप, तिळाचे तेल, सुती कापड, रेशमी कापड असे सर्व सामान गलबतात शिगोशिग भरायचे. तात्पर्य हेच की, एवढ्या प्राचीन काळातदेखील भारतातील शेती अतिशय समृद्ध होती. भारतातील साखर उत्पादनाचा पहिला उल्लेख पेरिप्लसच्या डायरीत आढळतो.

'साकरी' नावाच्या बांबूपासून बनवलेला सुमधुर मध. ही साखर ऱ्हाफ्ताला नियमित पोचायची. इजिप्तच्या 'बेरेनिक' बंदरापासून उजव्या बाजूने सुरू झालेला प्रवास पूर्व आफ्रिकेच्या 'ऱ्हाफ्ता' बंदरावर थांबला. त्यानंतरच्या समुद्राचा शोध तेव्हापर्यंत लागला नव्हता. पण हा अनाम नाविक हरहुन्नरी होता.

'बेरेनिक' बंदरापासून डाव्या बाजूने प्रवास केला तर 'भडोच' येण्याआधी कोणती बंदरे येतात हेदेखील त्याने अनुभवले. मुझा बंदरापासून भारताच्या किनाऱ्यापर्यंत गलबतांची रांगच रांग असायची. लोखंड, पोलाद, कापडांचे अनेक प्रकार आणि लाख भारतातून त्याकाळी आयात व्हायचे. तलम जांभळे कापड, मलमल, केशर, अंगरखे, घोंगड्या, औषधी वनस्पती अशा अनेक वस्तूंची मोठी उलाढाल असायची. 'मुझा' बंदर आणि त्यानंतरच्या 'एडन'मध्ये मोठ्या प्रमाणात धुपाचा व्यापार चालायचा.

एडन सोडल्यावर ओम्मना बाजारपेठ ओलांडून सिंधू नदीच्या मुखाशी असलेल्या 'बार्बारिकोन' (कराची) बंदरात रोमन राज्याच्या पूर्व भागातून तागाचे असली व नकली कापड आणि इजिप्तमधून तागाचे तलम कापड आयात केले जात होते. तसेच भरतकाम केलेले नक्षीदार कापड, पुष्कराज, पोवळी, शिलाजित, धूप, काचेची भांडी, चांदी-सोने, वाईन यांची आयात व्हायची. कराची बंदरातून रेशमी कापड, सुती कापड, जनावरांची कातडी रोमला जायची.

भारतीय व्यापारी मोत्यांच्या बदल्यात पोवळी विकत घ्यायचे. कराचीमधून म्हणजेच बार्बरिकोनहून जहाजे भडोचला प्रवास करीत. हा अनाम नाविक सांगतो की, सिंथस म्हणजे सिंधू नदीच्या पलीकडे अजून एक आखात आहे. त्याचे मोठा आणि लहान असे दोन भाग आहेत. या ठिकाणी समुद्राचा तळ अत्यंत उथळ आहे; पण दोन्ही ठिकाणी प्रचंड मोठे भोवरे आहेत. त्यामुळे जहाजाचा नांगर येथे टेकू शकत नाही. येथे बहुतांशी गलबते भोवऱ्यांमध्ये अडकून गायब होतात. पेरिप्लसच्या वर्णनानुसार असा निष्कर्ष काढता येतो की, 'इरीनोन' म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीचे कोरडे होत जाणारे कच्छचे वाळवंट असावे. म्हणूनच तेथे पाणी उथळ होते.

या आखातातून एका भूशिराने डोके वर काढले आहे. हा अनाम नाविक सांगतो, इरीनॉनपासून बाराका (द्वारका) खाडीला वळसा देऊन ते पूर्वेकडे, दक्षिणेकडे आणि नंतर पश्चिमेकडे वळते. यात सात बेटे आहेत. येथील खवळलेल्या समुद्रामुळे कोणतेही गलबत वाचू शकत नाही. फक्त निष्णात नाविकच पुढची वाट काढू शकतो.

जेव्हा मोठमोठे काळे साप येथे पाण्यावर खेळताना दिसतात तेव्हा समजावे की आपण सिंधू नदीच्या मुखातून कच्छच्या आखातात जात आहोत. तेथूनच आता भारताचे हृदय भडोच येणार असते. आणि त्या अनाम नाविकाची भारतातील लाटांवरची परिक्रमा आता सुरू होते...

---


आनंद स्पंदन

डॉ. अविनाश मोहरील

# सामर्थ्य दे या संवादास...

दोन पिढ्यांमधील संवाद हे कधी सुसंवाद तर कधी विसंवाद असतात. हा नियम कोणत्याही ठरावीक पिढ्यांच्या जोडीला लागू पडतो असे नाही. प्रत्येकच दोन पिढ्यांमध्ये हा प्रकार आढळतो. फरक पडतो तो केवळ विषयांचा, गरजांचा आणि बदललेल्या समाज व्यवस्थेचा. असाच एका बाप व लेकीमधला पत्ररूपी संवाद मला वाचायला मिळाला. हे दोन्हीही संवाद एकमेकांना दिलेली उत्तरे नाहीत तर स्वतंत्र मते आहेत. मी या पत्रांचा वाचक म्हणून या दोन्हीही मतांच्या मध्ये उभा राहून माझे मत तपासून घेतोय.

**लेकीचा पत्ररूपी संवाद:** बाबा, तुम्ही मला जरा समजून घ्यावे असे मला वाटते. मी आता मोठी झालेय हे प्रथम तुम्ही तुमच्या मनाला पटवायला हवे. मी आता अकराव्या वर्गाची विद्यार्थिनी आहे. आता मला काही निर्णय माझ्या मनाने घेऊ द्या ना. मला ठाऊक आहे की, तुम्हाला माझी पार्टीसाठी जातात. त्या पिझ्झा खायला जातात, मज्जा करतात; पण मला मात्र तुम्ही जाऊ देत नाही. कधी कधी तुमची पैशांची अडचण असते हे मला ठाऊक आहे; त्याहीपेक्षा जास्त काळजी तुम्हाला अशी आहे की मी बिघडेन. या बाबतीत तुम्हाला कसा विश्वास देऊ, हे मला कळत नाही. मला माझे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करावेसे वाटत आहे. तुम्हाला वाटत सेल की मी केवळ अकरावीत आहे आणि स्वातंत्र्याच्या गोष्टी करीत आहे. पण बाबा, मला माझ्या मैत्रिणींसारखे जगायचे आहे. मस्ती करायची आहे. त्यांच्यासारखे मोकळेपणाने वागायचे आहे आणि त्या वागण्यातील झगमगाट अनुभवायचा आहे. बाबा, तुमच्या सात्त्विक जगण्याच्या व्याख्या बंदिस्त वाटू लागल्या आहेत. बाबा, मला मुक्तपणे झेपावायचे आहे. मला समजून घ्या. बाबा, हे सारे मी तुम्हाला सांगू शकत नाही म्हणून एका कागदाचा आधार घेऊन तुमच्यापर्यंत माझे मन पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. हे सारे वाचून तुमच्या मनाला वेदना होणार आहेत, परंतु माझ्या मनाची घुसमट मी कुणाला सांगणार? तुम्हालाच ना?



फार काळजी वाटते आणि मला हे देखील ठाऊक आहे की, ही काळजी तुमच्या माझ्यावरील प्रेमामुळेच निर्माण होत असते. पण बाबा, मला आता तुमचे काळजी करणे बंधन वाटायला लागले आहे. मला तुम्ही मोबाईल फोन देणार नाही, असे सांगितले आहे. बाबा, माझ्या सगळ्या मैत्रिणींकडे मोबाईल फोन आहेत. त्या सर्वजणी व्हॉट्स ॲप वापरतात. त्या ग्रुपवर त्यांच्या खूप गमतीजमती सुरू असतात. मी जेव्हा त्यांना भेटते तेव्हा मला एकटे वाटायला लागते. त्या सर्व जणी वेगवेगळ्या पोस्टबद्दल बोलत असतात, जोक्स शेअर करतात; पण मी मात्र वेड्यासारखी त्यांच्या गोष्टी ऐकत राहते. कारण मला त्यातील काहीच माहीत नाही. त्या सर्व मैत्रिणी इन्स्टाग्रामवर आहेत. आमच्या काही मित्रांशी त्या चॅटिंग करतात. बाबा, थोडे मोकळे बोलते...

मलाही चॅटिंग करावे वाटते. मलाही असे वाटते की माझे मित्र असावे. त्या दिवशी तुम्ही तुमच्या मित्राला सांगत होतात की, तुम्ही मला व्हॉट्स ॲप किंवा इन्स्टाग्राम वापरू देत नाही आणि हेच तुमचे माझ्यावरील चांगले संस्कार आहेत. इन्स्टाग्रामवर काय काय चालते हे देखील तुम्ही सांगत होतात. बाबा, मला त्या दिवशी खूप वाईट वाटले. माझे संस्कारक्षम असणे किंवा नसणे हे तुम्ही केवळ मोबाईलच्या वापरावरून ठरविले. बाबा, मी तुमची मुलगी आहे आणि त्यामुळे मी कसे वागले पाहिजे, याचे मला पूर्ण भान आहे आणि राहीलही. परंतु तुमच्या मनातील काळजीपोटी मी अनेक बाबींपासून दूर जात आहे व त्यामुळे मला माझ्यात कमतरता आहे, असे वाटू लागले आहे. मैत्रिणी

**बापाचा पत्ररूपी संवाद:** बेटा, बघता बघता तू अकराव्या वर्गात गेलीस. साधारण १५ वर्षांपूर्वी एका दवाखान्यातील नर्सने तुला माझ्या हातात दिले. त्यावेळी जगातील सर्वोच्च आनंद मला प्राप्त झाला. तुला हातात घेताना एका बापाला मिळणारे सर्वोच्च सुख मला मिळाले होते. तो प्रसंग आठवला की, मी त्या प्रसंगाच्या भावनांशी बांधला जातो व त्यामुळे मला तू मोठी झाली, यावर विश्वासच बसत नाही. पण तू मोठी झालीस तरी अजून तुला हे जग कळलेले नाही. तुझ्या आजूबाजूच्या वातावरणाचा अभ्यास मला जेवढा आहे तेवढा तुला अजून झालेला नाही. सध्याच्या या जगात झपाट्याने बदलत जाणारे वातावरण मला तुझ्याबाबतीत काळजीत पाडते. मी तुला मोबाईल फोन दिलेला नाही. कारण त्याच्या माध्यमातून एका विचित्र चक्रामध्ये तू अडकणार आहेस; जे चक्र चक्रव्यूहाप्रमाणे आत घेतं, पण बाहेर पडू देत नाही. तुला भविष्यात एका निश्चित ध्येयाला गाठायचे आहे व त्या मार्गामधील व्हॉट्स ॲप व इन्स्टाग्राम ही सर्वात घातक व्यवधाने आहेत. तू ते वापरीत नाहीस, याचा मला अभिमान वाटतो व मी त्याबद्दल माझ्या मित्रमंडळींना या तुझ्या संस्कारित वागण्याचे दाखले देत असतो.

(पान ६ वर)

---

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

# तृचाकल्प सूर्यनमस्कार

प्रातःकाली सूर्याची मित्र, रवि, सूर्य, भानु, खग, पुष, हिरण्यगर्भ, मरिची, आदित्य, सविता, अर्क आणि भास्कर ही १२ नामे उच्चारत त्याला १२ साष्टांग नमस्कार घालणे यासारखा सर्वांगसुंदर व्यायाम दुसरा नाही. याचा उद्देश शरीरसौष्ठव, लवचीकता, आरोग्य, प्राणशक्ती जागृत करणे, सूर्यदेवतेच्या स्वरूपाचे स्मरण आणि त्यातील तत्त्वांचे चिंतन असा आहे.

**तृचाकल्प नमस्कार:** तृच म्हणजे वेदातील तीन ऋचांचा समूह. कल्प म्हणजे विशिष्ट कल्पनेने, उद्देशाने, विचारपूर्वक घडवून आणण्याची एखादी आदर्श रचना. म्हणून विशिष्ट देवतेसंबंधित वैदिक ऋचांच्या उच्चारासहित घातलेले नमस्कार म्हणजे तृचाकल्प नमस्कार. यांचा मुख्य उद्देश मंत्र, अर्घ्य, जप याद्वारे उपासना करीत आध्यात्मिक साधना करणे हा आहे. यात मंत्रप्राधान्यतेचे स्वरूप, तत्त्व जाणणे आणि त्यानुसार पालन करण्याच्या विधींचे महत्त्व आहे. साधे सूर्यनमस्कार आणि तृचाकल्प सूर्यनमस्कार यांच्यातील फरक थोडक्यात सांगावयाचा तर साधे नमस्कार हे योगासनाधारित असून प्रात:काळी करावयाचा शारीरिक व्यायाम असे असून त्यांचा उद्देश आरोग्य आणि ऊर्जा संपादन हा आहे, तर तृचाकल्पात वैदिक विधी, वेदमंत्राचे, विशेषतः सौरसूक्ताचे आणि सूर्याच्या बीजाक्षरांचे उच्चारण असून ते त्रिकाळ करावयाचे आहेत. एकात देहाच्या माध्यमाद्वारे सूर्याला जाणणे आहे तर दुसऱ्यात ऋचा आणि मंत्रशक्तीद्वारे अनुभवणे आहे. ऋग्वेदात सूर्याला उद्देशून १४ सूक्ते आहेत. त्यातील सौरसूक्तातील पहिल्याच ऋचेतील ३ मंत्र तृचाकल्प सूर्यनमस्कारात म्हटले जाऊन त्यांचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

१) सूर्याची साक्षिभावाने उपासना 'उदुत्यं जातवेदसे देवं वहन्ति केतवः। दृशे विश्वाय सूर्यम्।' उगवल्यावर सूर्य त्याच्या किरणांद्वारे सर्वांना दृश्यमान होतो. सर्व जगत्व्यवहाराचे तो साक्षिभावाने अवलोकन करतो. ही ऋचा उच्चारतांना हे लक्षात घ्यावे की, आपल्या सर्व कृतींवर सूर्याची दृष्टी आहे. त्यामुळे 'आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः।' विश्वातील सर्व शुभ माझ्याकडे येवो, ही प्रार्थना सफल झाल्याशिवाय राहणार नाही.

२) अज्ञान तिमिराचा नाश व्हावा 'अप त्ये तायवो यथा नक्षत्रा यन्यक्तुभिः। सूराय विश्वचक्षसे।।' सूर्योदयानंतर नक्षत्रांनी हतप्रभ किंवा क्षीण व्हावे त्याप्रमाणे तेजस्वी सूर्यामुळे माझ्यातील अज्ञानरूपी अंधकाराचा नाश व्हावा. माझा मोह नष्ट होऊन मला स्मृतीचा लाभ व्हावा.

३) सूर्य प्राणशक्तीचा दाता आहे: 'तरणिर्विश्वदर्शतो ज्योतिषकृदसि सूर्य। विश्वमाभासि रोचनम्।' हे सूर्यदेवा, तू सर्वांना प्रकाशित करणारा आहेस म्हणून माझ्याही जीवनात ऊर्जा, तेज आणि पारदर्शिकता निर्माण होवो. तीनही ऋचांचा एकत्रित अर्थ म्हणजे सूर्याच्या साक्षिभावामुळे माझ्यातील अज्ञानाचा नाश होऊन ज्ञानमार्गावरील माझा प्रवास यशस्वी होवो. 'तमसो मा ज्योतिर्गमय।' अविद्येच्या अंधकारातून मी विद्येच्या गावी जावे. हा संपूर्ण विधी संध्यावंदनावेळेस न्यास आणि सूर्याला अर्घ्य प्रदान करून करावयाचा असतो.



**बीजाक्षरांची योजना:** संपूर्ण वृक्ष बी मध्ये सामावलेला असतो; त्याचप्रमाणे प्रत्येक देवतेचे स्वरूप, शक्ती आणि तत्त्व तिच्या विशिष्ट बीजाक्षरात सामावलेले असते. उदा. ओंकारात संपूर्ण सृष्टीचे मूल बीज तर ह्रां ह्रीं ह्रूं...मध्ये देवतेचे तत्त्व-सत्त्व सामावलेले असते. यांना शाब्दिक अर्थ नसला, तरी त्यांच्या उच्चारण्यातील स्वर, लय, ताल, आरोह, अवरोह, स्वरीत, उदात्त, अनुदात्त या सर्वांचा एकत्रित सांगीतिक प्रभाव पडतो. यांच्या सुयोग्य पठनाने निर्माण झालेल्या ध्वनी आंदोलन-कंपनांमुळे आपल्या शरीरात आणि भोवताली चैतन्याची जाणीव होऊन देवतेच्या स्वरूपाचे आकलन होण्यास आणि तिच्याप्रत जाण्याचा आपला मार्ग सोपा होतो. 'ऱ्हां, ऱ्हीं, ऱ्हुं, ऱ्हैं, ऱ्हौं, ऱ्हः' ही मंत्रांची बीजाक्षरे आहेत. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा-चैतन्य आहे. तृचांना बीजाक्षरांची जोड दिल्यास ज्ञान आणि शक्तींचे ऐक्य साधून पूर्णत्वाकडे वाटचाल होते. बीजमंत्रांचा उच्चार करीत सौरसूक्तातील ऋचा म्हणत, सूर्याची मित्र-रविसूर्य-भानु... इत्यादी द्वादश नामांना स्मरत घातलेले २४ सूर्यनमस्कार फलदायी होतात.

**यांचा क्रम असा :** १) ६ बीजाक्षरे क्रमशः अनुक्रमे उच्चारत सूर्याची क्रमशः प्रथम सहा नामे, पुन्हा तीच ६ बीजाक्षरे पुढील ६ नामे उच्चारत याप्रमाणे १२ नमस्कार. उदा. 'ॐ ऱ्हां मित्राय नमः। ॐ ऱ्हीं रवये नमः।' याप्रमाणे. नंतर २) प्रत्येकी दोन बीजाक्षरे एकत्र आणि सूर्याची प्रत्येकी २-२ नामे एकत्र असे ६ नमस्कार. त्यानंतर ३) प्रत्येकी ४ बीजाक्षरे एकत्र आणि त्यासोबत सूर्याची अनुक्रमे ४-४ नामे असे तीन. पुढे ४) सर्व सहा बीजाक्षरे क्रमशः आणि सूर्याची पहिली ६ नामे आणि नंतर पुन्हा राहिलेली ६ नामे असे २, शेवटी ५) संपूर्ण ६ बीजे आणि १२ नामे एकत्र याप्रमाणे एकूण २४ नमस्कार होतात आणि हे सर्व होत असताना सौरसूक्तातील वरील ३ तृचांचे क्रमशः उच्चारण आणि शेवटी संपूर्ण सौरसूक्ताचे गायन होते.

**विलक्षण साम्य:** तृचाकल्पातील बीजमंत्राक्षरासहित घातलेल्या नमस्कारांची संख्या २४ आणि गायत्री मंत्रातील अक्षरांची संख्यासुद्धा २४. यातील साम्य हा योगायोग नसून यातही एक रहस्य आहे. त्यावर विवेचन करणे हा पुन्हा एक स्वतंत्र लेख होईल. जो प्रतिदिनी सूर्यास वंदन करतो त्याला सहस्त्र जन्मांत आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक असे कोणतेही दारिद्र्य येत नाही. त्याच्या सुवर्णरथाला एकच चाक, चाकांचे आरे ६, घोडे हिरव्या रंगाचे असून ७ आहेत. चाकाचे एक आवर्तन म्हणजे १ वर्ष; तेवढ्या काळात ६ आरे फिरतात म्हणजे पृथ्वीवरचे ६ ऋतू. घोड्यांचा रंग हिरवा म्हणजे त्याच्यामुळेच पृथ्वीवर जीवसृष्टी टिकून राहते. तो चर आणि अचरांचा प्रेरक, रक्षक आणि आत्मा आहे.

'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च।' आणि ७ घोडे म्हणजे आठवड्याचे ७ वार. सुभाषितकार सूर्याच्या सामर्थ्याविषयी म्हणतात- 'रथ:स्यैकं चक्रं भुजगयमिता:सप्त तुरगाः। निरालंबो मार्गाश्चरणविकला:सारथिरपि।रविर्यात्येवंतं प्रतिदिनमपारस्य नभसः। क्रियासिद्धी: सत्वे भवति नोपकरणे।।' सूर्याच्या रथाला फक्त एकच चाक, घोडे किती तर विषम संख्येत ७, लगाम कशाचे तर विषारी सापांचे, सारथी बघावा तर तोही अपंग, मार्ग आकाशासारखा अधांतरी आणि अपार. तरी सूर्य हा असा समर्थ की, प्रतिदिनी तो हे अथांग आकाश पार करतो.

तात्पर्य हेच की, समर्थ व्यक्तींच्या यशाचे रहस्य त्यांना उपलब्ध असलेल्या साधनांत नसून त्यांच्या आत्मबलावर असते. सूर्योपासनेने साधकही असाच समर्थ होतो. 'आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविअंशुमान्।' म्हणजे आदित्यात मी विष्णू आणि सर्व तेजस्वींमध्ये सूर्यरूपाने मीच वास करतो, असे स्वतः भगवंत विभूतियोगात सांगतात. यामुळे विष्णनामसहस्राचे जे फलित तेच सूर्योपासनेचे. यामुळे साधकही 'वीर्यं तेजश्चविन्दति' म्हणजे वीर्य आणि तेज प्राप्त करतो.

बल, रूप यांनी समृद्ध होतो. यजुर्वेदातही सूर्योपासनेचे हेच फलित आहे. 'स्वयंभरसि श्रेष्ठो रश्मि र्वर्चोदा असि वर्चो मे देहि। सूर्यस्यावृतमन्वावर्ते.' ज्याप्रमाणे सूर्य स्वयंभू आणि सर्वश्रेष्ठ असून सर्व जगाला प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे सूर्योपासकही एक दिवस तसाच होतो.

---



## सर्वश्रेष्ठ नाते

नाळेशी जोडून ठेवी,
श्वासाची नाजूक तार
रक्ताचे दूध करोनी,
बाळासाठी आहार
हृदयीच्या मळ्यात फुलवी,
फुलबाग संस्काराची
अंतर्गाभ्यात रुजवी, ती देठ आचाराची.
मस्तिष्काच्या रांजणी भरे, सुविचारांचे मोती
आशीर्वाद बाळासाठी सदैव तिच्या ओठी
ओल्या मातीला देई, आकार आणि संस्कार
हो जीवन त्याचे सुखमय एकच मनी विचार
आपुल्या जीवातून घडवते, दुजाजीव चिमुकला
सर्वश्रेष्ठ नाते मातेचे, वंदन त्या जननीला

मनीषा लिमये



## जे दिले देवाने

जे दिले देवाने कार्य तू विसरू नको
सर्वस्व वाहूनी देवासी
श्रेय तू मागू नको ।।१।।
दु:ख दैन्य कुणा ना चुकले
साठवूनी सुख का उरले
दु:खात सुखाला स्मरूनी
केवळ सुख तू मागू नको ।।२।।
ना घेऊन आलो काही
ना घेऊन जाऊ काही
घेतले इथे जे काही
ते देणे तू विसरू नको ।।३।।
धरिले ध्येय तू हृदयाशी
गाठणे अवघड आहे
मार्ग तुझा खडतर तरीही
चालणे तू सोडू नको ।।४।।

संजय कठाळे

# हवामान बदलाचे आव्हान पेलताना

पर्यावरण — **मिलिंद बेंडाळे**

**जगभरात ऊर्जा क्षेत्र मोठ्या उलथापालथीच्या टप्प्यातून जात असताना भारताने दाखवलेली दिशा मोलाची आहे. तोकडा तेल- गॅस पुरवठा, वाढती किंमत आणि अनिश्चितता यामुळे अनेक देश अडचणीत असताना भारताने हवामान बदलाच्या प्रश्नावर दीर्घकालीन आणि संतुलित धोरण स्वीकारून वेगळी वाट चोखाळली. विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधण्याचा भारताचा प्रयत्न आज जागतिक स्तरावर लक्ष वेधून घेत आहे.**



जग ऊर्जा आणि हवामानाच्या दुहेरी संकटातून जात असताना भारत एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. एका बाजूला जागतिक स्तरावर तेल आणि वायू पुरवठा साखळ्यांमध्ये खंड पडत आहे, किमती वर जात असून अनिश्चितताही वाढत आहे तर दुसऱ्या बाजूला भारताने विकासाच्या गतीला धक्का न लावता हवामान बदलाच्या आव्हानाला उत्तर देण्याचा मार्ग निवडला आहे. ही केवळ धोरणात्मक निवड नाही, तर भविष्यातील विकासाचे स्वरूप ठरवणारा निर्णायक टप्पा आहे. भारतासमोरचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे वाढती ऊर्जा मागणी.

पुढील दशकात देशातील विजेची गरज जवळपास दुप्पट होण्याचा अंदाज आहे. इलेक्ट्रिक वाहनांची वाढती संख्या, डिजिटल अर्थव्यवस्थेचा विस्तार, डेटा सेंटरची वाढ आणि औद्योगिक विकास या सर्वांचा थेट परिणाम ऊर्जा वापरावर होणार आहे. या पृष्ठभूमीवर विकासाला गती देताना पर्यावरणीय संतुलन राखणे ही कसरत सोपी नाही. याच काळात जागतिक परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न तीव्र झाला आहे. युद्धामुळे केवळ इंधनाच्या किमती वाढल्या नाहीत, तर मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायूंचे उत्सर्जनही झाले आहे. त्यामुळे हवामान बदलाचे संकट आणखी गंभीर झाले आहे. अशा वेळी भारताने आपले हवामान लक्ष्य अधिक स्पष्टपणे मांडले आहे, ही सकारात्मक बाब आहे. भारताने २०३५ पर्यंत उत्सर्जन तीव्रतेत लक्षणीय घट करण्याचे आणि वीजनिर्मितीमध्ये मोठा हिस्सा गैर- जीवाश्म स्रोतांकडून मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे लक्ष्य महत्त्वाकांक्षी असले, तरी केवळ घोषणांपुरते मर्यादित नाही. त्यामागे ठोस योजना आणि अंमलबजावणीची रूपरेषा दिसून येते. 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ऑथॉरिटी'च्या अंदाजानुसार, पुढील १० वर्षांमध्ये भारतातील वीज मागणी मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. अशा परिस्थितीत पारंपरिक जीवाश्म इंधनांवर अवलंबून राहणे हा पर्याय दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकतो. म्हणूनच भारताने सौर, पवन आणि इतर नवीकरणीय ऊर्जेकडे मोठ्या प्रमाणावर वळण्याचा निर्णय घेतला आहे. सौर ऊर्जा भारताच्या ऊर्जा संक्रमणाचा कणा बनत आहे. प्रचंड सूर्यप्रकाश, विस्तीर्ण भूभाग आणि तांत्रिक प्रगती यामुळे भारताला सौर ऊर्जेत मोठी संधी आहे.

२०३५ पर्यंत देशातील एकूण वीज क्षमतेपैकी मोठा हिस्सा सौर ऊर्जेतून येईल, असा अंदाज आहे. यामुळे केवळ कार्बन उत्सर्जन कमी होणार नाही, तर ऊर्जा स्वावलंबनालाही चालना मिळेल. पवन ऊर्जा, जलविद्युत आणि हरित हायड्रोजन यांसारख्या पर्यायांवरही भारत लक्ष केंद्रित करीत आहे. या विविध स्रोतांचा समतोल वापर केल्यास ऊर्जापुरवठा अधिक स्थिर आणि टिकाऊ होऊ शकतो; मात्र या संक्रमणासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधां ध्ये मोठी गुंतवणूक करावी लागणार आहे. ऊर्जा निर्मितीइतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचे वहन आणि वितरण. नवीकरणीय ऊर्जा मोठ्या प्रमाणावर वापरात आणण्यासाठी ट्रान्समिशन नेटवर्कचा विस्तार आवश्यक आहे. नवीन वीजवाहिन्या, आधुनिक वीज उपकेंद्र आणि स्मार्ट ग्रिड तंत्रज्ञान यांचा वापर केल्याशिवाय हे उद्दिष्ट साध्य होणार नाही. सरकारने या दिशेने काही महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. सौर ऊर्जेला प्रोत्साहन देणाऱ्या योजना, घरगुती वीज निर्मितीला चालना देणारे उपक्रम आणि हरित ऊर्जा 'ओपन ॲक्सेस' यांसारख्या धोरणांमुळे ऊर्जा क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये ऊर्जा उपलब्धतेतील तफावत कमी करणे, लहान उद्योगांना परवडणारी वीज उपलब्ध करून देणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या गरजा लक्षात घेणेही तितकेच आवश्यक आहे. जागतिक पातळीवर पाहता भारताचा हा दृष्टिकोन इतर विकसनशील देशांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल साधणे शक्य आहे, हे भारताने दाखवून दिले आहे; मात्र या मार्गावर सातत्य आणि प्रामाणिक अंमलबजावणी आवश्यक आहे. भारतासमोरचा प्रश्न 'विकास करायचा की नाही' हा नाही तर 'विकास कसा करायचा' हा आहे. हा विकास शाश्वत, समावेशक आणि पर्यावरणपूरक असल्यास दीर्घकालीन यशाचा पाया ठरेल. अन्यथा, अल्पकालीन लाभांच्या मागे धावताना भविष्यातील पिढ्यांसाठी गंभीर संकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे ऊर्जा आणि हवामान या दोन्ही क्षेत्रांमध्ये संतुलित, दूरदृष्टीपूर्ण आणि ठोस पावले उचलणे हीच काळाची गरज आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा संकट आणखी गडद झाले आहे. युद्धामुळे मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायूंचे उत्सर्जन झाले असून पर्यावरणीय हानीही वाढली आहे. अशा पृष्ठभूमीवर भारताने २०३१ ते २०३५ या कालावधीसाठी आपले अद्ययावत हवामान लक्ष्य निश्चित केले आहे. राष्ट्रीय स्तरावर ठरवलेल्या योगदानांनुसार, उत्सर्जन तीव्रतेत सुमारे ४७ टक्के घट आणि वीजनिर्मितीमध्ये ६० टक्के हिस्सा गैर- जीवाश्म स्रोतांकडून मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे लक्ष्य केवळ महत्त्वाकांक्षी नाही, तर वास्तवाशी सुसंगतही आहे. राष्ट्रीय वीजनिर्मिती आराखड्यानुसार २०२६ ते २०३६ दरम्यान भारतातील वीज मागणी प्रचंड वाढणार आहे. या वाढीमागे औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर हे प्रमुख घटक आहेत. अशा परिस्थितीतही कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा निर्धार हा भारताच्या धोरणात्मक स्पष्टतेचे प्रतीक आहे. ऊर्जा संक्रमणाच्या या प्रवासात सौर ऊर्जा भारताची मुख्य ताकद ठरत आहे. २०३५ पर्यंत एकूण स्थापित वीज क्षमतेपैकी सुमारे ४५ टक्के हिस्सा सौर ऊर्जेचा असू शकतो. स्थापित क्षमता १,१०० गिगावॉटपेक्षा अधिक होण्याचा अंदाज असून त्यातील ७० टक्के क्षमता गैर-जीवाश्म स्रोतांमधून येईल. आजही भारत नवीकरणीय ऊर्जेच्या बाबतीत जगातील अग्रगण्य देशांपैकी एक आहे. सौर ऊर्जेत भारत तिसऱ्या आणि पवन ऊर्जेत चौथ्या क्रमांकावर आहे. या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी मोठी गुंतवणूक आवश्यक आहे. आजघडीला ९०० गिगावॅट नवीकरणीय ऊर्जा ग्रिडशी जोडण्यासाठी ट्रान्समिशन नेटवर्कचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला जातोय.

लाखो किलोमीटर नव्या वीजवाहिन्या उभारल्या आहेत आणि सबस्टेशन क्षमता वाढविली जाणार आहे. तथापि, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्राचा विस्तार करताना काही आव्हानेही आहेत. नवीकरणीय ऊर्जा प्रामुख्याने अनिश्चित स्वरूपाची असते. सूर्यप्रकाश किंवा वाऱ्याच्या उपलब्धतेवर ती अवलंबून असते. त्यामुळे ऊर्जा साठवण तंत्रज्ञानाची गरज निर्माण होते. बॅटरी स्टोरेज, ग्रीन हायड्रोजन आणि स्मार्ट ग्रिड यांसारख्या तंत्रज्ञानात गुंतवणूक करणे आवश्यक आहे. याशिवाय, मोठ्या प्रमाणावर नवीकरणीय ऊर्जा ग्रिडमध्ये समाविष्ट करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विस्तार करावा लागतो. नवीन ट्रान्समिशन लाईन्स, सबस्टेशन आणि आधुनिक वितरण प्रणाली यांची उभारणी ही मोठी आणि खर्चिक प्रक्रिया आहे; परंतु दीर्घकालीन फायद्यांच्या दृष्टीने ही गुंतवणूक अत्यावश्यक आहे. भारताचा हा प्रवास केवळ देशापुरता मर्यादित नाही तर जागतिक स्तरावरही महत्त्वाचा ठरतो. विकसनशील देशांसाठी भारत एक आदर्श निर्माण करीत आहे की, विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधता येऊ शकतो. तथापि, या प्रवासात सातत्य राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि सार्वजनिक सहभाग यांचा समन्वय साधल्यासच अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात अपेक्षित यश मिळू शकते.

---

**आपली वाढ आणि विस्तार करायचा असेल, तर आपली मुळे मजबूत आणि विस्तारित करायला हवीत. काळ कितीही निघून गेला आणि कोणीही आपल्या मागून येऊन कितीही पुढे गेले तरी आपल्या क्षमतांचा विकास आपणच योग्य नियोजनातून करायला हवा. जेव्हा आपल्या क्षमता आजमावण्याची वेळ येईल तेव्हा आपण एकपरिपूर्ण व्यक्ती असू त्यामुळे आपण शर्यतीत मागे राहणार नाही आणि मग मुंगी व नाकतोड्याची गोष्ट तर आपल्याला ठाऊक आहेच.**

# नियोजन

नवचेतना — **समिधा पाठक**

लहान असताना आई मला तयारी करून द्यायची, गृहपाठ केला की नाही विचारायची, माझ्या सर्व ॲक्टिव्हिटीज एकदम व्यवस्थित प्लॅन करायची, त्यामुळे माझं रूटीन एकदम व्यवस्थित असायचं. आई माझा अभ्यास घ्यायची, कंसेप्टपासून ते ॲप्लिकेशनपर्यंत! त्यामुळे परीक्षा जवळ आली किंवा सरप्राईज टेस्ट असली, तरीही माझी सगळी तयारी असायची. शाळेला कधी उशीर झाला नाही, की कधी काही विसरले नाही. पण, पुढे जसजशी मोठी होत गेली, आई-बाबांनी मला स्वावलंबी बनवायला सुरुवात केली. मग मात्र सुरुवातीला माझी मजा येऊ लागली. सकाळी अलार्म लावून उठायचं, दूध गरम करून प्यायचं, आंघोळ करायची, युनिफॉर्म घालायचा, बॅग भरायची, टिफिन व बॉटल बास्केटमध्ये टाकायची, शूज पॉलिश करायचे आणि पावणे सातला शाळेसाठी निघायचं! तसं फार काही अवघड नव्हतं हे सगळं करणं, पण पूर्वी ज्या गोष्टी मला आयत्या मिळायच्या, त्या आता स्वतःला कराव्या लागत होत्या. कम्फर्ट झोनमधून जरा बाहेर पडावं लागलं होतं, बदल स्वीकारावा लागला होता आणि म्हणूनच कधीकधी घोळ होऊ लागला. कधी मला उशीर होऊ लागला, कधी शूजला पॉलिश करायचं राहून जायचं व कधी नव्हे ते एके दिवशी शाळेत मला एका पिरेडला उभं राहण्याची शिक्षा मिळाली. त्याचं झालं असं की, गृहपाठ करायला दिला होता. आदल्या दिवशी रात्री गृहपाठ झाल्यावर मी वही टेबलवरच ठेवून दिली. सकाळी उठल्यावर बॅगमध्ये टाकून देऊ असा विचार केला, पण सकाळच्या गडबडीत मी पार विसरून गेले. टीचर वह्या बघायला राउंडवर आल्यात. ज्यांनी गृहपाठ केला नव्हता, त्यांना उभं राहायला सांगितलं. मलादेखील उभं राहावं लागलं! उभं राहायला तर हरकत नव्हती, पण टीचर जे म्हणाल्या, ते माझ्या मनाला लागलं- ''मिस पाठक, इट वॉज नॉट एक्सपेक्टेड फ्रॉम यू!'' रात्री जेवत असताना घडलेला प्रकार मी आई-बाबांना सांगितला. त्यांनी मला समजवलं, प्लॅनिंग चुकतंय तुझं! आणि तुला आता हेच शिकायला हवं! बॅग सकाळी भरण्यापेक्षा रात्रीच भरायला हवी म्हणजे घाई गडबड होत नाही. सगळ्यांकडे चोवीसच तास असतात आणि त्या चोवीस तासांत भरपूर काही करता येतं. जर योग्य नियोजन करता आलं तर! हा झाला एक किस्सा. योग्य नियोजनाच्या अभावी किती चुका होतात, स्ट्रेस लेव्हल वाढते, धांदल उडते आणि एकही काम धड होत नाही. प्लॅनिंग करा! हे म्हणायला किती सोपं आहे. फारसं काय लागतं हे म्हणायला किंवा सांगायला? टाईम टेबल बनवला किंवा एक प्लॅन बनवला की झालं. पण, प्लॅन म्हणजे फक्त एक कागदाचा तुकडा असतो की काय? एक घर बांधण्याचं साधं उदाहरण घेऊ या. आपण घर बांधायचं ठरवलं. पण, आपलं घरं कसं असावं, ही संकल्पना नसली तर काय होईल? जसजसं सुचत जाईल, तसतसं घर बांधल्या जाईल. दोन मजले तर हवे, पण जिना कुठून असायला हवा, हे ठरलंच नसेल, तर मग जागा उरली किंवा जमेल त्या ठिकाणी जिना बांधावा लागेल. शेवटी ॲडजेस्ट करणं आलं. मग मनातली घराची संकल्पना आणि वास्तव्यात साकारलेली वास्तू भिन्न असेल! पण, तेचं जर पहिले ड्रॉईंग तयार केलं आणि त्याचं बरोबर ॲनालिसिस केलं तर आपल्याला मनाजोगी व परिपूर्ण अशी वास्तू उभारता येईल. आयुष्याचंही तसंच असतं. काय हवं आहे, हे ठरवून ते मी कसं मिळवायला हवं, त्यात मला कोणते अडथळे येऊ शकतात, माझं अस्तित्व मी किती छान घडवू शकतो व हे सगळं करत असताना ट्रकिंग करून, ॲनालिसिस जर योग्य वेळी केलं तर आपल्याला आयुष्यातही ॲडजेस्ट करायची गरज पडत नाही! यालाच म्हणतात नियोजन. अर्थात प्लॅन एक रोड मॅप असतो. आपल्याला स्वप्नापासून ध्येयाकडे नेणारा. उद्याचा दिवस तेच गाजवू शकतात, जे आजच उद्यासाठी तयार असतात! प्रॉडक्टिव्हिटी ही अकस्मात प्राप्त झालेली कला नाहीय, तर प्रॉडक्टिव्हिटी ही तर्कशुद्ध नियोजन, मेहनत व जिद्दीच्या संगमातून निर्माण होणारी कला आहे. इतिहासातील सारी युद्धं ही काय फक्त बळाच्या जोरावर जिंकल्या गेली आहेत? मुळीच नाही. जिंकण्यासाठी बळ तर आवश्यक आहेच, पण बळासोबतच तंबूमध्ये केलेलं नियोजनही तितकंच महत्त्वाचं ठरतं! प्रसिद्ध शास्त्रज्ञ फ्रँकलिन म्हणायचा, इफ यू आर फेलिंग टू प्लॅन, देन यू आर प्लॅनिंग टू फेल. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यात वेगवेगळ्या गोष्टीचं नियोजन करावं लागतं, पण फंडा सारखाच असतो! त्यामुळे प्लॅनिंगची कंसेप्ट जर बरोबर कळली, तर तिचं ॲप्लिकेशन बरोबर करता येतं. मग काय आहे ती कंसेप्ट? १. आपलं उद्दिष्ट लिहायचं. २. त्या उद्दिष्टाची काही टप्प्यात विभागणी करायची. ३. उद्दिष्ट मिळवण्यासाठी योग्य दिशा निवडायची. ४. त्यानंतर एक टाईमलाईन ठरवायची. ५. आठवड्यातून एक दिवस ठरवून केलेल्या कामाचं विश्लेषण करायचं आणि टाईमलाईन चेक करत राहायची. ६. वीक पॉईंट्सवर वर्क करायचं आणि एक टप्पा गाठला की त्याला फुली मारून पुढे जायचं प्लॅनिंगची ही प्रोसेस फार उपयुक्त ठरते. अनेक वेळा आपण प्लॅन तर बनवतो, पण त्याच्या हिशोबानी चालतोय की नाही, हे बघायला विसरतो. त्यामुळे दर आठवड्याला विश्लेषण करायलाच हवं. एखाद्या ठिकाणी जात असताना, आपण धरलेली वाट बरोबर आहे की नाही, हे जीपीएसने ट्रॅक करत असतो. ट्रकिंग का करतो? मार्ग चुकायला नको म्हणूनच ना? तसंच आयुष्यातही ट्रॅकिंग करणं फार गरजेचं असतं. अन्यथा मार्गावरून भटकून जाऊ. प्रत्येक गोष्टीसाठी असा प्लॅन बनवलाच पाहिजे असं नाही. काही गोष्टींना खूप नेमकं प्लॅनिंग लागत नाही, पण मोठ्या गोष्टींतून आपण ही सवय शिकतो आणि मग ॲक्शन्स बिकम हॅबिट्स! मेलबॉक्समध्ये अनेक मेल येतात. मग काम करताना किती धांदल उडते! हे करू की ते? काही केल्या सुचत नाही. पण, तेचं प्रायरटी, कम्प्लिट व पेंडिंग अशी लेबल्स बनवली तर काम किती सोपं व पटकन होत जाईल? आपली वाढ आणि विस्तार करायचा असेल, तर आपली मुळे मजबूत आणि विस्तारित करायला हवीत. काळ कितीही निघून गेला आणि कोणीही आपल्या मागून येऊन कितीही पुढे गेले तरी आपल्या क्षमतांचा विकास आपणच योग्य नियोजनातून करायला हवा. जेव्हा आपल्या क्षमता आजमावण्याची वेळ येईल तेव्हा आपण एक परिपूर्ण व्यक्ती असू त्यामुळे आपण शर्यतीत मागे राहणार नाही आणि मग मुंगी व नाकतोड्याची गोष्ट तर आपल्याला ठाऊक आहेच. उन्हाळ्यात अन्नधान्य मुबलक असतं म्हणून नाकतोडा मजा करतो व मुंगी पावसाळ्यासाठी नियोजन करते. मग पावसाळ्यात नाकतोड्यावर उपासमारीची वेळ येते. प्रत्येकाची काही स्वप्नं असतील. मग तुमच्या स्वप्नांना नियोजनाची साथ देऊन करा साकार! (लेखिका, स्त्री सशक्तीकरण व युवा चेतना या विषयांच्या स्तंभलेखिका आहेत.)

---

**कधी कधी आयुष्याच्या वाटेवर अशी काही माणसं भेटतात की, त्यांच्या साधेपणातच एक विलक्षण तेज दडलेलं असतं. ते तेज शब्दांत मावणारं नसतं. ते अनुभवावं लागतं. अशा व्यक्तींना भेटल्यानंतर आपला खुजेपणा आपल्याला जाणवायला लागतो. अशाच एका अद्भुत व्यक्तिमत्त्वाशी काही दिवसांपूर्वी भेट झाली माँ कोंडाळकर आजी!**

# जगणं जेव्हा 'नाम' बनतं...

उगवतीचे रंग — **विश्वास देशपांडे**
भ्र. ९४०३७४९९३२



वय वर्ष ८५सडसडीत बांधा पण शरीरात विलक्षण चैतन्य, चेहऱ्यावर प्रसन्न शांतता आणि डोळ्यांत अपार श्रद्धेचा उजेड. स्मृती आणि श्रवणशक्ती अत्यंत उत्तम. भूक लागणे हा निसर्गनियम आहे. परंतु या निसर्ग नियमावर मात करून त्याच्या विरुद्ध जगणारी काही उदाहरणे मी माझ्या आकाशझुला पुस्तकात एका लेखात दिली होती. त्यापैकी एक होत्या पश्चिम बंगालमधील प्यारी बाई आणि दुसरे उदाहरण होते गुजरातमधील एका बाबांचे. ज्यांना लोक चुडीवाले माताजी म्हणून ओळखत असत. आता ते दोन्हीही हयात नाहीत. परंतु त्या दोघांनी अन्नपाण्याशिवाय कित्येक दिवस काढले ही गोष्ट खरोखरच अद्भुत आणि आश्चर्यचकित करणारी होती. युरोपातील देखील एक संत महिला अशाच प्रकारची होती. परंतु अशा व्यक्तींचे उदाहरण मला प्रत्यक्ष पाहायला मिळेल आणि त्यांच्याशी भेट होऊ शकेल असे कधी वाटले नव्हते. परंतु माँ कोंडाळकर यांना भेटलो आणि खरोखरच खूप धन्यता वाटली. त्यांचं नाव ताराराणी. पण सगळे त्यांना माँ म्हणून हाक मारतात. त्यांच्या आहाराबद्दल ऐकलं आणि आश्चर्यचकितच झालो.


आठ वर्षांपासून त्या फक्त दोन केळी आणि थोडं दूध यावर जगत आहेत. हे ऐकताना प्रथमदर्शनी अविश्वसनीय वाटतं. वारीत तर खाद्यपदार्थांची रेलचेल असते. तरी देखील दुपारी फक्त दोन केळी त्या घेतात. त्या व्यतिरिक्त इतर कोणताही आहार त्या घेत नाहीत. पण त्यांच्यासमोर बसल्यावर जाणवतं की, शरीराच्या गरजा मर्यादित केल्या की आत्म्याची शक्ती किती व्यापक होते ! शरीरात ऊर्जा केवळ अन्नामुळे येते असा आपला समज असतो. परंतु तो या माउलींनी खोटा ठरवला आहे श्रद्धेचे बळच त्यांना जगण्याची ऊर्जा देते. केवळ दोन केळी आणि दूध एवढाच आहार त्यांना या वयात देखील संपूर्ण वारी पायी करण्याएवढी ऊर्जा प्रदान करतो हे केवढे आश्चर्य! त्यांच्याशी भेटायची उत्सुकता मला आधीपासूनच होती. माझ्या मुलीच्या सासूबाईंमार्फत त्यांच्याबद्दल ऐकलं आणि मग एक दिवस मी, माझी पत्नी श्रद्धा आणि मुलीचे सासू-सासरे असे आम्ही चौघं त्यांना भेटायला गेलो. पुण्यातील महात्मा सोसायटीत त्या राहतात. त्यांची भेट झाली आणि मी अक्षरशः भारावून गेलो. त्यांचं आयुष्य म्हणजे एक अखंड वारी आहे. त्यांना कळायला लागल्यापासून त्या वारी करीत आहेत. आजपर्यंत एकही वर्ष त्यांनी पंढरपूरची वारी चुकवलेली नाही. वारीला जाण्याआधी त्या आळंदीला जातात, तिथून वारीसोबत पंढरपूर, आणि परत येतानाही जेव्हा इतर लोक वाहनाने येतात, तेव्हा त्या मात्र पायीच परत येतात. पुन्हा आळंदीला जाऊन दर्शन घेऊनच वारीची सांगता! सदानंद महाराज आळंदीकर हे त्यांचे गुरु! गुरूंनी अनुग्रह दिला आणि गुरूकडून घेतलेले नाम त्यांनी आयुष्यभर जपले आणि जपत आहेत. त्या सांगत होत्या, वारी म्हणजे साधी गोष्ट नाही. त्यात खूप शिस्त असते. कोणी शिस्त मोडण्याचा प्रयत्न केला तर त्याला वारीतून काढून टाकतात. परंतु तिथे खूप मजा सुद्धा असते. तिथं कोणी कोणाला काही म्हणत नाही. सगळे एकमेकांना 'माऊली' म्हणतात. 'माऊली चला माऊली या' असं म्हणताना सगळा अहंकार गळून पडतो. वारीत अभंग, भजन किंवा गवळणी म्हणताना आजही या वयात त्या एखाद्या लहान मुलीसारख्या रममाण होऊन नाचतात. नाचताना सगळं काही विसरून जातात. खरंच 'माऊली' या एका शब्दातच समतेचा आणि प्रेमाचा एक विलक्षण सुगंध दडलेला आहे! आपल्या वागण्याबोलण्यामुळे वारीत त्या सगळ्यांच्या माऊलीच झाल्या आहेत. वारीत, आळंदीला आणि पंढरपूरला सगळेजण त्यांना माँ या नावानेच संबोधतात. त्यांची दिनचर्या ऐकली की आपण थक्क होतो. रात्री सात- साडेसातला निजणं आणि पहाटे तीनला उठणं! त्या स्वतः सांगतात, रात्री नामस्मरण करताना केव्हा झोप लागते ते कळतही नाही. पहाटे उठल्यावर पुन्हा नामस्मरण, भजन-कीर्तन सकाळी सहाला राजाराम पुलाजवळच्या विठ्ठल मंदिरात जाऊन भजनपूजन साडेआठला परत दुपारी ज्ञानेश्वरी, गीता, तुकाराम गाथा, विष्णू सहस्त्रनाम यांचे वाचन आणि दिवसभर नामात रममाण! घरात दोन मुलं, सुना, नातवंडं-सगळा संसार आहे; पण त्या त्यात कणभरही हस्तक्षेप करत नाहीत. संसारात असूनही त्या अलिप्त आहेत. संसारात राहून अलिप्तपणे जगणारी आणि आपल्या साधनेत गढून गेलेली ही योगिनी आहे. त्या स्वयंपाकघरात चुकूनही डोकावत नाहीत. समोर काहीही अगदी त्यांचा आवडता पदार्थ ठेवला तरी त्या घेत नाहीत. मंदिरात प्रसादाचा पेढा मिळाला तरी तो स्वतः न खाता दुसऱ्याला देतात! त्यांच्या आयुष्यात दानधर्मालाही तेवढंच महत्त्व आहे. वारीत त्या एक दिवस सर्व वारकऱ्यांना आपल्या वतीने भोजन देतात. दानधर्म केला पाहिजे, हे त्यांचं ठाम मत आहे. त्यांच्या बोलण्यात एक सहज विनोदही आहे. त्यांनी सांगितलेला एक प्रसंग तर अतिशय गमतीदार होता. काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी त्या कोथरूडला राहत होत्या. बहुधा थंडीचे दिवस असावेत. पहाटेच्या अंधुक प्रकाशात पांढरे केस, पांढरे कपडे घालून त्या बाहेर पडल्या होत्या. एका टेम्पोवाल्याने त्यांना पाहिलं आणि त्याला वाटलं भूतच आहे! तो एवढा घाबरला की त्याने गाडी एका बाजूला घेऊन थांबवली. आजी त्याला समजवायला पुढे गेल्या, तर तो आणखीच घाबरला! मग थोडे उजाडेपर्यंत त्यात तशाच थांबल्या. शेवटी उजाडल्यावर त्यांनी खिडकीवर टकटक करून सांगितलं, बाळा, घाबरू नकोस मी आजी आहे! पण भीतीमुळे तो माणूस अक्षरशः ओलाचिंब झाला होता. ही गोष्ट सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरचं निरागस हास्य मनात घर करून राहत होतं. त्यांच्या श्रद्धेची खोलीही तितकीच विलक्षण आहे. मीराबाई, जनाबाई यांची उदाहरणं देताना त्या म्हणाल्या, श्रद्धा अशी असावी! नाम हीच इस्टेट आहे. आपण ती वापरली, तर देवाला आपली काळजी घ्यावीच लागते! त्यांना दोन मुले आहेत. मोठा मुलगा बाणेरला राहतो आणि धाकटा त्यांच्याजवळच महात्मा सोसायटीत असतो. त्यांचे नाव सतीश. या सतीशदादांना आम्ही भेटलो. सतीशदादा म्हणजे प्रसन्न व्यक्तिमत्व! त्यांच्याशी थोड्या गप्पाही झाल्या. आपल्या आईबद्दल बोलताना ते म्हणाले की आठ वर्षांपासून ती काहीही खात नाही.

(पान ६ वर)

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

# अनसूया आणि अपाला



सोमदत्त आणि दुर्वासांसह सती अनसूया आणि ऋषिका अपाला

वैदिक काळात वावरणारा समाज नैतिक आचरण आणि कर्मठ वृत्तीचा होता. त्या काळात ऋषिवृंद यज्ञप्रधान जीवनशैलीचा अवलंब करत, हे सर्वश्रुत आहे. यज्ञ करणाऱ्या पुरुषाच्या शेजारी त्याची पत्नी हवीच. कारण त्यातले काही विधी यजमानपत्नीला करायचे असतात. यजमान आणि यजमानपत्नी दोघांनी एकत्रित आणि स्वतंत्रपणे करण्याच्या विधींची विभागणी जवळपास सारखी आहे. म्हणजेच यज्ञात यजमानपत्नीची भूमिका बरोबरीची असते. त्यामुळे यज्ञकर्म करणारे सगळे ऋषी संसारी होते, हे स्पष्टच आहे.

ऋग्वेदाचं पाचवं मंडल हे अत्री ऋषींच्या गोत्राचं आहे. भारतीय परंपरेत गोत्र ही एक वंशसातत्य दर्शविणारी व्यवस्था आहे. सनातनी लोक विविध ऋषींचे गोत्रज (वंशज) म्हणवून घेतात. पूजाकर्म असो की श्राद्धकर्म ते करणाऱ्या व्यक्तीला स्वत:चं गोत्र सांगावं लागतंच. विवाह संबंध ठरवताना वधू आणि वर एकाच गोत्राचे नकोच; शिवाय विशिष्ट गोत्रांचं विशिष्ट गोत्रांशी सख्य असल्यामुळे त्या विशिष्ट गोत्रांशीच ठरवण्याची प्रथा आहे तर गोत्र ही एक अस्सल भारतीय अशी संकल्पना आहे. ऋग्वेदकालीन ऋषींच्या वंशावळीत अत्री गोत्र हे इतर सर्व गोत्रांशी जुळवून घेणारं, सर्वांशीच मैत्री असणारं गोत्र आहे. गोत्र अत्री आणि सर्वांशी मैत्री अशी एक म्हणदेखील जुनेजाणते सहज म्हणून जातात. तर, अशा या अत्री ऋषीची पत्नी अनसूया आणि कन्या अपालाची ही कथा. सर्वात आधी माता, पिता आणि कन्येच्या नावांची आद्याक्षरं एकच असण्याची फॅशन अतिप्राचीन कालापासून भारतात होती; या विधानाचा हा अस्सल आणि भक्कम पुरावा आहे. अनसूया म्हणजे जिच्याकडे असूया नाही अशी. ही प्रजापती कर्द आणि देवाहुतीच्या नऊ मुलींपैकी एक. सांख्य दर्शनाचे प्रणेते कपिल महामुनी हिचे सहोदर म्हणजे सख्खे भाऊ. अतिशय निरलस, निगर्वी, निर्मल, निरागस आणि सात्त्विक स्त्री म्हणून तिचा महिमा सारे गातात. अत्री ऋषी आणि अनसूया हे दाम्पत्य तपस्वी आणि साधक होतं. शिवाय अनसूया ही पतिव्रता असल्यानं तिला सती ही उपाधी देण्यात आली होती. सध्या उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांच्या सीमेवर वसलेल्या चित्रकूट नावाच्या स्थानी अनसूयेचा संसार बहरला. तिला दत्त, सो आणि दुर्वास हे तीन पुत्र आणि अपाला नावाची एक कन्या झाली. यातलं प्रत्येक अपत्य अतिशय मेधावी आणि तप:पूत होतं. तिच्या गृहकृत्यदक्ष असण्याविषयीचे संदर्भ रामायणात आहेत. अयोध्या सोडल्यानंतर श्रीराम, सीता आणि लक्ष्मण भरपूर वेळ मंदाकिनी नदीकाठी असलेल्या चित्रकूटला अत्री ऋषींच्या आश्रमात त्यांच्या छत्रछायेत राहिले. त्या कालखंडात सीतेनं माता अनसूयेकडे आदर्श भारतीय स्त्रीत्वाचे धडे गिरवले. पौराणिक उल्लेख आहे तो तिच्या पातिव्रत्याची परीक्षा घेण्यासाठी आलेल्या ब्रह्मदेव, विष्णू आणि महेशाचं तान्ह्या बाळांत रूपांतर झाल्याचा. त्यांच्यापैकी ब्रह्मदेव म्हणजे सो , दत्तात्रेय म्हणजे भगवान विष्णू आणि दुर्वास म्हणजे शिवशंकर असं वर्णन सापडतं. उदाहरणार्थ भागवत, मार्कंडेय आणि ब्रह्मांड पुराणांत अनसूया आणि अत्रिनंदन दत्त म्हणजे परब्रह्म असल्याची वर्णनं आहेत. गुरू-शिष्य परंपरेद्वारे योग आणि भक्तिमार्गाचा अवलंब करणारा एक स्वतंत्र संप्रदायच त्रिगुणात्मक दत्त स्वरूपाची उपासना करतो. त्यांची माता म्हणून महासती अनसूयादेखील सर्वांना परमआदरणीय वाटतेच. याच अनसूया मातेची एकुलती एक कन्या म्हणजे अपाला. हिला अनेकदा अपाला अत्रेयी असंही संबोधण्यात आलं आहे. माता-पित्याकडून साधना आणि तपश्चर्येचं बाळकडू मिळालेली अपाला ब्रह्मतत्त्वाविषयी सहजी व्यक्त होऊ शकत असे. तिच्यात एक कवीदेखील विकसित झाला होता. त्यामुळे तिचे विचार ती काव्यात्मक भाषेत अभिव्यक्त करीत असे. ऋग्वेदीय संदर्भ सांगतात की, ती लग्नायोग्य झाल्यानंतर तिचा विवाह एका तरुणाशी करून देण्यात आला. अनेक ठिकाणी त्याचं नाव कृषव असल्याचं म्हटलं आहे. तो सौंदर्यासक्त होता म्हणे. म्हणजे त्याला भौतिक सौंदर्याविषयी अतोनात आकर्षण होतं. विवाहानंतर काही काळानं तिला त्वचारोग झाला. तिला बहुधा श्वेतकुष्ठ म्हणजे ल्युकोडर्मा झाला असावा, असं अनु ान अनेक अभ्यासकांनी लावलं आहे. कारण तो हळूहळू वाढू लागला. त्यामुळे तिचं रूपसौंदर्य ओसरू लागलं. तिच्या पतीनं तिचा त्याग केला. दु:खी अपाला आपल्या माहेरी परत आली. तिच्या माता-पित्यानं तिला आधार देऊन ज्ञानसाधना करण्यास प्रवृत्त केलं. सोबतच वैदिकांची सर्वशक्तिमान देवता इंद्राची आराधना करण्यास सांगितलं. इंद्रदेवाला सो वल्लीचा रस आवडतो म्हणून तिनं तो त्याला अर्पण करीत त्याची स्तुती केली आणि स्वत:ची असहाय्य अवस्था ऐकवली. ते काव्य म्हणजेच ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातलं ९१ वं सूक्त! तिच्याविषयी अधिक माहिती शोधताना अतिशय संदिग्ध संदर्भ आढळतात. म्हणजे एकदा नदीवरून पाणी भरून आणत असताना तिला वाटेत सो वल्ली उगवलेली दिसली. इंद्रदेवाला या वेलीच्या पानांचा रस आवडतो म्हणून तिनं त्या वेलीची पानं खुडली. पण ती कुटून त्यातून रस काढण्यासाठी तिच्याकडे कसलंच साधन नव्हतं. म्हणून तिनं ती पानं आपल्या दातांनी भरडली आणि त्यांचा रस गाळण्यासाठी म्हणे ओठांचा विनियोग केला.

येनकेनप्रकारेण इंद्रदेवाला सो रस देण्याची तिची इच्छा किती तीव्र होती, हे या प्रसंगातून स्पष्ट होतं. तिच्या या निरागस निस्सीम भक्तीनं प्रसन्न होऊन इंद्रदेव तिथे प्रकट झाले. त्यांनी तिच्या ओठांतून गळणारा सो रस स्वीकारला आणि तिला त्वचारोगातून मुक्त केलं. तिला तिचं शारीरिक सौंदर्य आणि कांती परत मिळाली. ती ज्या सूक्ताची द्रष्टा आहे त्यात तिची व्यथा, त्यातून होणारी तगमग, इंद्रदेवाचं तिच्यावर प्रसन्न होणं, त्यानं तिला रोगमुक्त करणं हा सारा तिचा व्यक्तिगत अनुभव स्पष्ट प्रामाणिक, सरळ, निष्कपट, स्पष्ट, आणि शुद्ध शब्दांत व्यक्त झालेला आहे. हे सारं वाचलं की अपालेचं धैर्य आणि दृढता, तिची साधना आणि तपश्चर्या, तिच्यातलं कवित्व आणि प्रज्ञा थेट आपल्या मनाला जाऊन भिडते. एक लाघवी नवतरुणी ते परित्यक्ता आणि या कटू अनुभवांतून स्वकर्तृत्वानं द्रष्टा झालेली एक समर्पित ऋषिका हे अपालाचं उत्क्रांत होत जाणं नक्कीच प्रेरणादायी आहे. त्याच बरोबर प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेत सर्व प्रकारच्या व्यक्तींना स्वत:चा उत्कर्ष साधण्याची मोकळीक होती, हेच अधोरेखित होतं. वैदिक काळाच्या आध्यात्मिक आणि बौद्धिक जीवनात अलौकिक योगदान देणाऱ्या या परम आदरणीय माता आणि कन्येची ही आठवकथा!!

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

# ‘गंगातीरी धीडरें म्हणती वराडी आहिता म्हणेती...’



जगातील ३००० भाषा मृत्युपंथाकडे जात आहेत. आपली ‘मायमराठी’ सध्या सुरक्षित आहे, असे म्हटले जाते. जगातील भाषा आणि बोलींचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करणे जसे आवश्यक आहे तसेच बोलींना महत्त्व आणि प्रतिष्ठा देण्याचीही गरज आहे. संस्कृती आणि भाषा यांचे संबंध अन्योन्य असतात. खाद्यसंस्कृती बदलली की लोकभाषेतील शब्दही बदलतात. खाद्यपदार्थांचे स्थलांतर लोकभाषेतील शब्दसंग्रह वाढविणारे असते. रांधनर ‘धन, शिदोरी- सिदोरी, भातुके- भातके, न्याहारी- नीहारी असे शब्द प्राचीन काळापासून लोकभाषेत आहेत.

न्याहारी हा शब्द लीळाचरित्रात संध्याकाळी जेवणासाठी आला आहे. ‘लोकू दूरी पावला: माणसांची नीहारी जाली: गोरुवे गावाकडे नीगाली : वीळू जाला’ असा उल्लेख आहे. रांधणे म्हणजे शिजवणे, रांधवणी म्हणजे स्वयंपाकघर आणि रांधवणहाट म्हणजे शिजवलेले पदार्थ विकत मिळतात तो बाजार. ‘जी जी आमते गंगातीरी धीडरें म्हणती तु ते वराडी आहिता म्हणेती’ हे महदाइसेचे शब्द ‘धीडरे’ (धीरडे) या आज आवडीने खाल्ल्या जाणाऱ्या पदार्थाची प्राचीनता अधोरेखित करणारे आहे. ‘वऱ्हाडी भाकरी कैसी जी’ महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीत भाकरीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हाइंभटाने लिहिलेल्या गोविंदप्रभुचरित्रात ‘वीव्हाओ स्वीकारू’ या लीळेत महदाइसेने गायिलेल्या पहिल्या मराठी काव्याची निर्मिती कथा आली आहे, हे सर्वांना माहीत आहेच. गोविंदप्रभूंना वीव्हायाची प्रवृत्ती झाली म्हणून चार दिवसांचा सोहळा साजरा केला गेला. चारी दिवस महदाइसेने गायिलेले रुक्मिणीस्वयंवर गोविंदप्रभूंसह सर्वांनी ऐकले. विवाह सोहळा असल्याने ‘वऱ्हाडी’ आले होते. महाराष्ट्रात ‘वऱ्हाड’ या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक अर्थ प्रदेशसूचक आहे.

विदर्भातील अकोला, अमरावती, वाशीम, बुलढाणा या भागाला वऱ्हाड म्हणतात. दुसरा अर्थ विवाह समारंभात सहभागी झालेले वर आणि वधू यांचे सर्व नातेवाईक म्हणजे वऱ्हाडी होत. विवाह सोहळ्यात सहभागी सर्व नातेवाईकांचा एकत्रित उल्लेख ‘लग्नाचे वऱ्हाड’ असा केला जातो. प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांच्या ‘वऱ्हाड निघालंय लंडनला’ या एकपात्री प्रयोगाचे शीर्षक वऱ्हाड या शब्दाचा महाराष्ट्राच्या लोकवाणीतला अर्थ स्पष्ट करणारे आहे. गोविंदप्रभूंना विवाहाची प्रवृत्ती झाली म्हणून साजरा केलेल्या सोहळ्यात भाकरी नव्हती, पण इतर अनेक खाद्यपदार्थ केले होते. या लीळेत पुढील वर्णन आले आहे. ‘मग आबैसीं ताट केलें: गोसांवी आसनीं उपविष्ट जाले: मग मांडे: पुरीया: घारिया: वडे: उंबरें: ऐसें आवघे उलथउलथं अवलोकिलें: मग गोसांवीं म्हणीतलें: आवो मेली जाय भाकरी नाही म्हणें: आबाइससीं म्हणीतलें: जी जी वऱ्हाडी भाकरी कैसी जी: च्याही दीस गोसांवों रुकुमीणि-सैंवर आइकीलें: चौथां दीसीं साडे जाले: मग प्रवृत्ति भंगली:’ या लीळेत गोविंदप्रभूंच्या ‘आवो मेली जाय भाकरी नाही म्हणें’ या प्रश्नाचे उत्तर देताना आबाइससीं म्हणीतलें: जी जी वऱ्हाडी भाकरी कैसी जी: म्हणजे विवाह सोहळ्यात वऱ्हाडी मंडळींसाठी भाकरी कशी करावयाची? विवाह सोहळ्यात वऱ्हाडी मंडळींसाठी भाकरी करत नाहीत म्हणून केली नाही. तेराव्या शतकात सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन आहारामध्ये भाकरी होती, हे या लीळेवरून सहज कळते. भाकरी प्राचीन खाद्यपदार्थ आहे आणि त्याची लोकप्रियता अजूनही कायम आहे. ‘वडेयाचे आंबट’ लीळाचरित्र, गोविंदप्रभू चरित्र आदी गद्यग्रंथ, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगांसह अनेक प्राचीन साहित्यकृतींमध्ये महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचे कितीतरी उल्लेख आहेत. आज सर्वत्र आवडीने ‘दही वडा’ खाल्ला जातो, प्राचीन महाराष्ट्रातही ‘वडेयाचे आंबट’ म्हणजे आजचा दहीवडा आवडीने खाल्ला जात होता. ‘मैळभटाचा उपहारू स्वीकारू’ या लीळेत गोविंदप्रभूंनी मैळभटाच्या घरी जेवण केल्याचा उल्लेख आहे. जेवताना वडेयाचे आंबट गोविंदप्रभूंना आवडले, ‘गोसावी म्हणीतले: आवो आणि मेली जाए: गोड गोड आणिक घाली म्हणे मग आणिक आंब वाढिले:’ दहीवड्यांतील दह्याची आंबट, गोड, जरा तिखट अशी विशिष्ट चव असते त्यामुळे त्या दह्याला आंब म्हटले आहे. दहींकारिणी दूधभात, दहीभात, ताकभात खाण्याची महाराष्ट्राची प्राचीन तऱ्हा आणि परंपराही आहे. ‘ताकभातेविण गमेचि ना’ हे नागदेवाचार्यांचे शब्द ताकभाताची आवड दर्शविणारे आहेत. दहीभात, ताकभात, ताककण्या आजही लोक आवडीने खातात. आता तर मोठमोठ्या उपाहारगृहांध्ये कर्ड राईस मिळतो. संत ज्ञानेश्वरांच्या ‘पैल तो गे काऊ कोकताहे’ या अभंगात ‘दहिंभाताचीं उंडी लाविन तुझ्या तोंडी’ असा दहीभाताचा उल्लेख आहे. यातील दहीभाताची उंडी म्हणजे पाणी नसलेल्या दह्यात कालवलेल्या भाताचा गोळा होय.‘दहींकारिणी’ असा एक सुंदर शब्द दही विकणाऱ्या स्त्रियांसाठी लीळाचरित्रात आला आहे. ‘विजुळी’ म्हणजे दुधाचे विरजण लावून केलेले दही. ‘दहिउ कुरू’ म्हणजे दही भात. ‘कुरू’ हा शब्द गोविंदप्रभूचरित्र आणि लीळाचरित्रातही आला आहे. पण आता विरजण आणि दही दोन्ही शब्दांच्या वापराच्या उत्साहावरच विरजण पडले आहे. साकर होईजे ते नीके साखरेसाठी ‘साकर’ असा शब्द प्रचलित आहे. महात्मा चक्रधरांचे वाक्य फारच मौलिक आहे, ‘साकर होईजे ते नीके साकर अनुभविजे ते नीके’ या वाक्यातील ‘नीके’ या शब्दाचा अर्थ उत्तम असा आहे. दृष्टान्तपाठात साकरेचा दृष्टान्त आहे. महात्मा चक्रधरांच्या राहीनायक या अनुयायाच्या म्हशीचे नाव ‘साकरी’ असे होते. एकदा राहीनायक बाइसाला सांगतात, ‘माते साकरी नांवें म्हैसी असे जी: तीयेचा तांबीया भरूनि दूध मी गोसावियालागी व्यालिये आणीन।’ चवदार दूध देणाऱ्या म्हशीचे नाव साकरी ठेवणे म्हणजे तिच्या दुधाच्या चवीचे कौतुक करणे होय. संत तुकारामांच्या अभंगात साखरेचा सुंदर उल्लेख आहे. ‘अंगी ज्वर तया नावडे साकर। जन तो इतर गोडी जाणे।।’ ज्वर म्हणजे ताप.

(पान ६ वर)

साहित्य शिक्षण


किरण डोंगरदिवे

भ्र. ७५८८५६५५७६

# काळ्यानिळ्या रेषामधील शैक्षणिक संदर्भ

राजू बाविस्कर ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात त्या समाजाचे शिक्षणाचे भान हरपलेले होते उपेक्षा आणि वंचिताचे जीवन ही सर्व मंडळी जगत होती. त्यांच्या वाट्याला आलेल्या अनुभवाचे पीळ लेखकाने आपल्या आत्मकथनात मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेला 'शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा! हा मंत्र समाजाच्या पर्यंत पोहोचण्यात कुठले अडथळे येत आहेत? याचे उत्तर शोधण्याची काम हा ग्रंथ लावतो. माझे गाव माझी वतनदारी या पहिल्याच प्रकरणात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना महार वतने बंद झाली त्याच कालावधीत गावागावात ही वतनदारी मांग समाजाने सुरू केली असावी आणि त्यामुळेच समाजातील शैक्षणिक प्रगती खुंटत गेली की काय? असा प्रश्न लेखकाने उपस्थित केला आहे. शिक्षणाच्या अभावानेच मातंग समाजासाठी प्रगतीचे आणि विकासाचे दारे पाहिजे त्या प्रमाणात उघडले नाही असे लेखक यातून सुचवतात.

लेखकाचा मोठा भाऊ कचरू दुसऱ्या वर्गात जाताना गुरुजी त्याला शाळेतून बोलवण्यासाठी मुलांना पाठवायचे, शाळेत घेऊन जायचे, शाळेच्या विहिरीजवळ त्याला आंघोळ घालायचे हे सर्व योग्य असले तरी त्याला दवंडी द्यायला लावायचे. आता हे तात्विक दृष्टीने किती बरोबर आहे हे त्या काळाला ठाऊक मात्र महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांची जात किंवा धर्म याबाबत भाष्य सातत्याने होत आलेले आपण पाहतो. त्यातून नेमके तत्कालीन शिक्षक कोणता आसुरी आनंद मिळवत होते हे सांगणे कठीण आहे मात्र मी स्वत: या प्रसंगातील गुरुजींच्या वर्तनाचे समर्थन करू शकत नाही. चिल्या नावाच्या व्यक्तिरेखे बद्दल लिहिताना २६ जानेवारीसाठी आपण ढोल वाजवत आहोत आणि शाळेतील इतर मुले आपल्याला हसत आहे असा विचार मनात आल्यामुळे चिल्या नावाच्या मुलाने शाळेतील बँड चोरी करून तो विहिरीत फेकून दिल्याचा उल्लेख या ग्रंथात आलेला आहे. त्यावरून लहानपणी प्रसंगानुरूप आपण आपल्या समाजावर किंवा जातीवर लादलेले काम आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसमोर करत असू तर त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो हे वेगळे सांगावे लागत नाही. एक उदाहरण द्यायचे तर नागराज मंजुळे ह्यांच्या फँड्री ह्या चित्रपटात सर्वात जिव्हारी लागणार प्रसंग म्हणून त्या मुलाने शाळेच्या समोर डुक्कर पकडणे आणि इतर मुलांनी त्याच्यावर फिदीफिदी हसणे हा होय. जाड्या रम्या या प्रकरणांमध्ये सुद्धा खो खो आणि कबड्डीसाठी शाळेला ढाल जिंकून देणाऱ्या मातंग समाजाच्या या मुलाबद्दल शाळेतील इतर मुले,’ ते ढोर खातात म्हणून त्यांच्या ताकद आहे’ असं बोलायचे ही सुद्धा त्या विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण करणारी बाब होय. अशा गोष्टी शाळेत घडत असतील तर शिक्षकाने याकडे लक्ष देऊन असे प्रकार शाळेत होऊ नये यासाठी काळजी घेतली पाहिजे. दगड्या, रम्या, चिल्या अशा काही मुलांच्या आठवणी लेखकाने या ग्रंथात सांगितले आहेत लेखक ज्याप्रमाणे शिक्षणामुळे बदलले त्याप्रमाणे इतर मुलांना शिक्षण न घेता आल्यामुळे त्यांचे जीवन कसे सुरु असेल? असा प्रश्न लेखकाला सतत पडतो. डिग्यासारखे मुले आई आजारी राहायची म्हणून शिक्षणाकडे दुर्लक्ष करायची. असेही अनेक प्रसंग विविध पात्रांच्या संदर्भातून या ग्रंथात वाचायला मिळतात.




काळ्यानिळ्या रेषा हे राजू बाविस्कर यांचे २०२२ मध्ये प्रकाशित झालेले आत्मचरित्र असून याला २०२५ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. खऱ्या अर्थाने आत्मचरित्राच्या रूढ आणि पारंपारिक पद्धतीपेक्षा फार वेगळे असे हे आत्मचरित्र आहे. काळ्यानिळ्या रेषा या आत्मकथनाचे संपादक म्हणून प्रफुल्ल शिलेदार यांची भूमिका या ठिकाणी महत्त्वाची आहे. ते त्यांच्या प्रस्तावनेत सांगतात, बाविस्कर यांची चित्रशैली मिश्रछटांचे रंग असणारी आहे. त्यामुळे शब्द असो की चित्र बाविस्कर संयतपणे आपली वेदना मांडतात. वेदनाच्या मुळाशी घेऊन जातात चित्र पाहणाऱ्याला आणि ग्रंथ वाचणाऱ्याला अस्वस्थ करून सोडतात.

लेखकाची आई लेखकाच्या मामीला टोपल्या आणि डालके विणायला शिकवायची. खरं म्हणजे याच पद्धतीने भारतीय संस्कृतीतील अनेक कला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झालेले आहेत. हेच खरे जीवन शिक्षण होय. मधू अप्पा या व्यक्तीबद्दल लिहीत असतानाही लेखक अगदी सुरुवातीलाच, 'कमी शिकलेली माणसंही मनानं खूप मोठी आणि दिलदार असतात. एखादी चांगली गोष्ट त्यांच्या मनाच्या दरवाज्यातून शिरली की तुमच्याबद्दल त्यांच्या मनात आदराचं हिरवंगार झाड होत असतं. अशा शब्दात लेखकाने निरक्षर असणे किंवा कमी शिकलेले असणे यामुळे विशेष फरक न पडता माणसाचा संस्कार महत्त्वाचा आहे असे अधोरेखित केले आहे. लेखकाची मोठी बहीण नबा, तिला शिक्षणाचे महत्त्व कळायच, लेखक आणि त्याचे भाऊ बँड वाजवून शिक्षण घेतात याचा तिला अभिमान वाटायचा. मोठा भाऊ जेंव्हा नोकरीला लागला तेव्हा तिने पेढे वाटले आणि लेखक खिरोद्याला चित्रकला महाविद्यालय शिक्षणाला जातात हे कळल्यावर तिने जे वर्तन केले त्या प्रसंगातून तिचे भावांवरील प्रेम आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित होते. आपल्या समाजाची दशा आणि दिशा ठाऊक असल्यामुळे बहिणीला भावाच्या शिक्षणाचे अप्रूप असणारच कारण त्या काळात सातवी पास जुनी मॅट्रिक असलेला खंड्या बाप्पा चोरी करायचा हे त्या समाजातील सर्वांनाच ठाऊक होते. त्यामुळे आपल्या भावांनी खूप जास्त शिकून नोकरीवर लागावे आणि आई-वडिलांच्या कष्टाचे पांग फेडावे अशी साधी धारणा त्या बहिणीची होती. त्या काळात शिक्षण घेणाऱ्या मातंग समाजातील मुलांबाबत लेखकाची एक वाक्य फार महत्त्वाचे आहे, ते म्हणतात, शाळा शिकत असताना प्रत्येक गावाबाहेरच्या आमच्या झोपड्यांच्या दारातून माझ्यासारखी अनेक पोरं बसलेली दिसायची. त्यांना प्रश्न पडतीलच असं नाही. कारण त्या झोपडीत, त्या घरात शोधण्यापेक्षा पोटाचे प्रश्न अधिक मोठे आहेत. या सर्व वातावरणात लेखक आणि त्याचा भाऊ शिक्षण घेत असे ही गोष्ट त्या काळात फार महत्त्वाची होती. झडीच्या दिवसात खूप पाऊस असला तरी या बंधूंना शाळेचेच काळजी असायची असा उल्लेख सुद्धा लेखकाने आवर्जून केलेला आहे. परीक्षा दिलेली असली की जाणारी मुले इदगाहच्या मोठ्या भिंतीजवळ उभे राहून इदगा पास की नापास असा आवाज द्यायचे आणि त्याचा प्रतिध्वनी पास असा आला की ते आनंदित व्हायचे. अशा लहान मोठ्या प्रसंगातून लेखकाने स्वतःच्या शिक्षणाच्या आठवणी काळ्यानिळ्या रेषाच्या पानोपानी पेरलेल्या आहेत. कधी त्यांनी आठवी नववीत असताना त्यांना भेटलेल्या रानु नावाच्या बाईच्या आठवणी तर कधी सातवीपर्यंत शाळा सोडून सापित सौंदर्य घेऊन जगणाऱ्या हिरा सिनकर सारख्या स्त्रियांच्या आठवणी आणि त्यांचे जीवन याबाबत ओळख करून दिली आहे. कोणतेही शिक्षण घ्यायचे म्हटले की प्रत्येकाला गुरुची आवश्यकता असते असे सांगून लेखकाने त्यांना बँड शिकवायला भुसावळच्या स्वतंत्र बँडमध्ये असलेला मास्तर झिंग्या काका याचे आवर्जून नाव घेतले आहे.

लेखकाने पुढे ट्रंपेट वाजवावे ते शिकून घेतले. एका लग्नाच्या वरातीत नवरदेव स्वतः जळाला आणि तो मरण पावला मात्र त्याही परिस्थितीत नवरदेवाचे वडील बँड वाल्यांचे पैसे देण्यासाठी समोर आले त्यावेळी, 'माणसं शिक्षण न घेता ही खूप शिकल्यासारखी आणि समजुतदार असतात हे लक्षात आलं असं लेखकाने सांगितले आहे. शिक्षण घेत असताना वर्गाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर बाविस्कर यांचे चित्र काढण्याचे आणि त्याच प्रमाणे वाद्य वाजवण्यातील कौशल्य कसे कसे विकसित होत गेले याबाबत सुद्धा आपल्याला माहिती मिळत जाते. बँडच कॉम्पिटिशन याबद्दल माहिती देताना लेखक म्हणतात, बेंडच कॉम्पिटिशन म्हटलं की बोर्डाच्या परीक्षेचा अभ्यास तरी कमी करत असतील इतकी बँडची रिहर्सल करावी लागायची. या वाक्यातून लेखकाला शिकण्यापेक्षा बँड वाचवून रोजी रोटी कमावणे जास्त महत्त्वाचे आहे.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, १० मे ते शनिवार, १६ मे २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १० मे-** मदर्स डे, श्री स्वामी शुकलेश्वर जयंती, श्री वासुदेव आरे महाराज जयंती पंढरपूर (जि. सोलापूर), पंचक दुपारी १२:१२ नंतर प्रारंभ, देवी सातेरी भद्रकाली उत्सव, आरोंदा (सावंतवाडी), श्रीदेवी व्हराडी मंदिर उत्सव परुळे ✻ **सोमवार, ११ मे-** राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन, नवदुर्गा प्रकटोत्सव मडकई, अमोघसिद्ध यात्रा मदने वस्ती गिरगाव ✻ **मंगळवार, १२ मे-** परिचारिका दिन, संत मुक्ताबाई पुण्यतिथी, दिनबाबा पुण्यदिन इचलकरंजी, विठ्ठलादेवी जत्रा देवगड ✻ **बुधवार, १३ मे-** अपरा एकादशी, संत श्री पारनेरकर महाराज वार्षिकोत्सव पारनेर (जि. नगर), दूरसंचार दिन ✻ **गुरुवार, १४ मे-** प्रदोष, छत्रपती संभाजीराजे जयंती, संत सेना महाराज जयंती, श्री महालक्ष्मी उत्सव कळंबे, पंचक समाप्ती रात्री १०:३३ ✻ **शुक्रवार, १५ मे-** शिवरात्री, रवि वृषभ, पुण्यकाल स. ६.२१ ते दु. १२.४५, जागतिक कुटुंब दिन, अगस्ती लोप, सावित्री चतुर्दशी, रुद्रपशुपती महाराज पुण्यतिथी निमसोड (ता. खटाव), संत चोखोबाराय समाधी सोहळा पंढरपूर ✻ **शनिवार, १६ मे-** श्री शनैश्वर जयंती, दर्श भावुका अमावास्या, अन्वाधान, श्री जोगेश्वरी यात्रा (जोगणी) उदगाव (ता. शिरोळ), जत्तीरदेव यात्रा तुळस.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १०, १३ मे ✻ **बारसे-** ११ मे (१५ नंतर), १३ मे (१४ नंतर) ✻ **जावळ-** १०, ११, १४ मे (१३ पर्यंत) ✻ **गृहप्रवेश-** १०, १३ मे

### मेष :- आर्थिक प्रगती

राशी स्वामी मंगळ सोमवारी राशीत येत आहे. त्यामुळे उत्साहाने विविध कामे मार्गी लावू शकाल. बुधवारचा बुध, गुरु लाभ योग आर्थिक बाबतीत प्रगती करणार आहे. नवे विचार मार्गी लावता येतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. उष्णतेपासून त्रास संभवतो. धनस्थ रवि, बुध युती आर्थिक बाबतीत लाभदायक आहे. शुभ ता. १०, ११

### वृषभ:- उत्साहवर्धक घटना

धनस्थ गुरुचा बुधाशी होणारा लाभ योग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. गुरुवारी राशीतच रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. बारावा मंगळ अनावश्यक खर्च करावयास लावणार आहे. डोळ्यांच्या तक्रारींची दखल घ्यावी. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. सौख्य लाभेल. शुभ ता. १०, १३

### मिथुन:- चिंता नको

षष्ठेश, लाभेश मंगळ सोमवारी लाभस्थानी येत आहे. वैद्यकीय. कृषि, मेकॅनिकल अशा क्षेत्रात चांगली प्रगती होणार आहे. बुध, गुरु लाभ योग ही कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडविणार आहे. अपेक्षित संधी लाभतील. राशीत शुक्र येत असल्याने कौटुंबिक अडचणींवर मात कराल. चिंता नको. शुभ ता. १०, ११

### कर्क:- मनासारख्या घटना

पंचमेश, दशमेश मंगळ दशमात येत आहे. शिक्षण अनुभवातून मनासारखी प्रगती होत जाईल. कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. बुध-गुरु लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. लाभस्थानी होणारी रवि- बुधाची युती सरकारी कामे यशस्वी करणारी आहे. नव्या संधी लाभणार आहेत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. ११, १३

### सिंह:- सुसंधी लाभतील

मंगळ भाग्यस्थानी येत आहे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. कर्मस्थानी होणारी रवि- बुधाची युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी आहे. बुध-गुरु लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. छोटी साडेसाती आहे. त्यामुळे प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. व्यवसायात पुढचे पाऊल पडेल. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. सुसंधी लाभतील. शुभ ता. १०, ११

### कन्या:- शारीरिक तक्रारी

सोमवारी मंगळ आठवा होत आहे. १५ मेपर्यंत रवि ही आठवा आहे. त्यामुळे शारीरिक तक्रारी वाढणार नाहीत, याची काळजी घ्यावी. बुध- गुरु लाभ योग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. नव्या विचारांना विचाराने चालना द्यावी. अडचणी आल्या तरी मार्गही निघत जाईल. भाग्यवृंध्दिंगत करणार्या घटना घडतील. शुभ ता. १०, १३

### तुला:- स्वमतग्रह टाळावा

राशी समोरच मंगळ येत आहे. उत्साह, धडाडी, कार्य सिद्धीसाठी लाभदायक ठरेल. फार स्वमतग्रह टाळावा. बुध- गुरु लाभ योग आर्थिक बाबतीत समाधानकारक प्रगती करणारा आहे. कलागुणांचा विकास होत जाईल. अडचणी सुटत जातील. फार काळजी करू नका. कौटुंबिक जीवनात एक विचाराने रहावे. शुभ ता. ११, १३

### वृश्चिक:- समाधानकारक प्रगती

राशी स्वामी मंगळ षष्ठात येत आहे. कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. बुध-गुरु लाभ योग आर्थिक बाबतीत अनुकूल फलदायी आहे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. जुने येणे वसूल करून घ्यावे. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. शुभ ता. १०, ११

### धनु:- प्रगतीच्या घटना

पंचमेश, व्ययेश मंगळ पंचमात येत आहे. वैद्यकीय, संरक्षण क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. षष्ठातील रवि- बुधाची युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी आहे. अडचणींवर मात कराल. राशी स्वामी गुरुचा बुधाशी होणारा लाभ योग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी ठरेल. प्रगतीच्या घटना. शुभ ता. १०, ११

### मकर:- कलेत प्रगती

मंगळ सुखस्थानी स्वराशीत येत आहे. जमिन, वास्तू बाबतचे रेंगाळलेले व्यवहार आता होतील. पंचमात रवि, बुधाची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक समस्यातून मार्ग निघत जाईल. फार दगदग करू नका. बुध-गुरु लाभ योग व्यवसायात लाभदायक ठरेल. कार्यक्षेत्रात नव्या संधी लाभतील. कलेत प्रगती होईल. शुभ ता. ११, १३


### कुंभ:- यांत्रिक क्षेत्रात प्रगती

तृतीयेश, दशमेश मंगळ पराक्रमस्थानी येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात प्रगतीच्या घटना घडतील. चिकाटीने वाटचाल करावी. प्रगती होत जाईल. बुध- गुरु लाभ योग आर्थिक बाबतीत समाधानकारक फळे देणारा आहे. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. फार चिंता करू नका. शुभ ता. १०, ११

### मीन:- मनासारख्या घटना

धनेश, भाग्येश मंगळ धनस्थानी स्वराशीत येत आहे. स्थावरमध्ये नवीन गुंतवणूक करू शकाल. चिकाटीने वाटचाल करावी. शुभ फलदायी ठरेल. बुध- गुरु लाभयोग लाभदायक आहे. मनासारख्या घटना घडतील. वादाचे प्रसंग टाळावेत. अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. सौख्याच्या घटना घडतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ११, १३

!! शुभ भवतु !!




# आर्टिफिशियल इंटेलिजन्स: काळाची गरज

तंत्रज्ञान
महेश रायखेलकर
भ्र. ९३२६६१२४३६

AI म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा शब्द आता परवलीचा झाला आहे. हळूहळू आपण सर्व याचा वापर आपल्या दैनंदिन कामात करत आहोत. एखादी व्यक्ती तिचे शिक्षण, त्यातून मिळवलेले ज्ञान, तिला आलेले तिच्या जीवनातील चांगले किंवा वाईट अनुभव यावरूनच विचार करत असते आणि कोणतीही कृती करत असते. याच्या बाहेर त्याच्याकडे ज्ञानाचा काहीही स्रोत नसतो. पण जर विचार करा की एखाद्या मशीनला कोट्यवधी नव्हे तर अब्जावधी लोकांचे ज्ञान, अनुभव यांचा डेटा दिला तर त्या मशीनची क्षमता काय असेल? आणि ती मशीन काय काय करू शकेल? हेच दुसरे तिसरे काही नसून आर्टिफिशियल इंटेलिजन्स आहे. हेच जर एखाद्या ठराविक विषयातील ज्ञान, अनुभव असेल तर ती मशीन त्यातील निष्णातच ठरेल.

असे असंख्य AI ssistants/ I Chatbots आज उपलब्ध होत आहेत आणि दिवसेंदिवस त्यात भरच पडत आहे. उदा. ChatGPT, Canva I / Magic Studio, Meta I, Gemini इत्यादी. या आधी आपण माहितीसाठी गुगलचा वापर करत होतो पण गुगल एखाद्या विचारलेल्या विषयासंबंधीची माहितीची लिंक आपल्याला देत होता. ती दिलेली वेगवेगळी माहिती आपल्याला एकत्रित करून ती वापरावी लागत होती. पण ChatGPT `m I ssistant ला जर आपण एखादा विषय दिला तर लगेच तो त्याच विषयासंबंधीची एकत्रित माहिती आपल्याला देईल. एखाद्या विषयासंबंधी तुम्हाला पत्र लिहायचे आहे, आलेल्या मेलला उत्तर द्यायचे आहे, एखाद्या प्रॉडक्ट किंवा सर्विसची जाहिरात तयार करायची आहे, त्याला तुम्ही फक्त सांगा. ज्याला AI च्या भाषेत 'प्रॉम्प्टिंग' म्हटले जाते, हे सर्व तो तात्काळ करेल. हे म्हणजे जसा अलादिन AI चा जादूचा दिवा असल्यासारखे आहे.

डॉक्टर, वकील, CA शिक्षक, इंजिनियर, आर्किटेक्ट अशा क्षेत्रातील व्यक्तींना आपापल्या क्षेत्रात मदत करणारे I ssistants `oV आहेत, काही आले आहेत जे त्यांचे काम हलके करतील. टेक्स्ट, इमेज, ऑडिओ, व्हिडिओ या चार प्रकारे कोणत्याही विषयातील माहिती प्रसारण सर्वत्र होत असते. I ssistants / I Chatbots मुळे ही कामे विलक्षण गतीने अचूक होत आहेत.एखाद्या शेतकऱ्याला पिकाच्या रो-गावर उपाय हवा आहे, गृहिणीला नवीन रेसिपी हवी आहे, विद्यार्थ्याला गणित समजून घ्यायचे आहे A I सर्वांना मदत करते. अगदी मराठीतून विचारलं तरी उत्तर मराठीतून मिळते. AI ची गती ही अतिशय वेगवान आहे. तो अजून कोणकोणत्या क्षेत्रात शिरकाव करेल हे सांगता येणार नाही. AI आल्यामुळे नोकऱ्या जातील का अशी भीती निर्माण होत आहे. अशी भीती संगणक म्हणजेच कॉम्प्युटर जेव्हा बाजारात आले तेव्हाही वाटली होती. पण आपण पाहतो की संगणक/कॉम्प्युटर आल्यामुळे विलक्षण क्रांती झाली. काही नोकऱ्या गेल्या तर काही नवीन नोकऱ्या देखील उपलब्ध झाल्या आणि भारताने यात थक्क करणारी प्रगती केली. त्यामुळे अमेरिकेमधील सिलिकॉन व्हॅलीमध्ये भारतीयांचाच दबदबा आहे.

AI आल्यामुळे देखील काही प्रमाणात नोकऱ्या जातीलही पण नवीन संधी देखील तेवढ्याच उपलब्ध होतील. AI मानवास ओव्हरटेक करेल का असा एक प्रश्न सध्या निर्माण होत आहे. याचे उत्तर माझे तरी असे आहे की काही प्रमाणात करेल. पण माणसाच्या बुद्धिमत्तेचा आवाका AI ला कधीही येणार नाही. एखादी परिस्थिती पाहून निर्णय घेण्याची क्षमता, मानवी भावभावना ओळखण्याची क्षमता, सर्जनशीलता, मानवी मूल्ये ही AI मध्ये उतरण्यास अजून वेळ आहे. AI चे जसे फायदे आहेत तसे धोके सुद्धा आहेत. AI देत असलेली माहिती अगदी अचूक आहे असे म्हणता येणार नाही. त्याची पडताळणी माणसालाच घ्यावी लागेल. देत असलेला प्रॉम्प्ट चुकला की AI कडून येणारी माहिती चुकीची असणार आहे. येथे माणसाच्या बुद्धीचा कस लागणार आहे. AI आले आहे म्हणून त्याला घाबरून जाऊन, त्याच्याकडे दुर्लक्ष करून, त्याला टाळून कमीत कमी नोकरदार, व्यावसायिक, विद्यार्थी या लोकांना चालणार नाही. ते शिकून त्याचा आपल्या कामात वापर करणे कधीही हितावह ठरेल. कारण उद्याचा काळ त्यांचाच असेल जे AI वापरायला शिकतील.

पान २ वरून

## डिजिटल दुकानाची किल्ली...

'ब्लिंकिट', 'झेप्टो', 'इन्स्टामार्ट' आदी कंपन्यांनी 'क्विक कॉमर्स' क्षेत्रात प्रचंड आघाडी घेतली. २०२१ मध्ये केवळ ०.३ अब्ज डॉलर्स इतकी उलाढाल असलेली ही बाजारपेठ २०२५ पर्यंत सात-आठ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. २०३० पर्यंत ही बाजारपेठ ५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकेल, असा अंदाज आहे. याच काळात एकूण 'ई-कॉमर्स' बाजारपेठ ही अडीचशे अब्ज डॉलर्स इतकी उलाढाल करणार आहे. तसेच आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, 'जेन-झी' ग्राहकांची भविष्यात असणारी या बाजारपेठांवरील मक्तेदारी. एकूण खर्चातील ४५ टक्के हिस्सा हा एकट्या 'जेन-झी'कडे आहे. जेन-झी'चा कल आता रील्स, शॉर्ट्स किंवा सोशल मीडियावर 'स्क्रोलिंग' करताना विकत घेण्याकडे जास्त आहे. नवे उत्पादन 'क्रिएटर्स', 'इन्फ्लूएन्झर्स'वर विश्वास ठेवून मगच खरेदी केली जाते. मग अशा वेळी वस्तू व सेवांची किंमत ही गोष्ट त्यांच्या लेखी दुय्यम ठरते. भारतात केवळ ३० टक्के ग्राहक अद्याप ऑनलाईन वस्तू खरेदी करतात. याचा अर्थ, आणखी संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या सगळ्यात पारंपरिक बाजारपेठांना दुर्लक्षित करून परवडण्यासारखे नाही. नवे बदल, आव्हाने आणि संधी शोधून देण्यासाठी त्यांनाही एकप्रकारे प्रशिक्षणाची गरज आहे, तरच हा समतोल साधणे शक्य होईल.

पान २ वरून

## सिमेंटच्या धुळीत हरवणारं बालपण

समाजाच्या दृष्टीने ही मुलं अनेकदा अदृश्य ठरतात. ती आपल्या शहरातच असतात, पण आपल्या नजरेत नसतात. या परिस्थितीत बदल घडविण्यासाठी काही ठोस पावले उचलण्याची गरज आहे. बांधकाम साईटवर बालसंगोपन केंद्रे (क्रेच), चलनशील शाळा, पोषण सेवा आणि नियमित आरोग्य तपासणी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. स्थलांतरित मुलांसाठी शिक्षणात सातत्य राहील, अशी लवचीक व्यवस्था तयार करणे गरजेचे आहे. तसेच बांधकाम कंपन्या, स्थानिक प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे या मुलांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाची खरी प्रगती त्याच्या उंच इमारतींनी नव्हे, तर त्याने आपल्या सर्वात असुरक्षित मुलांसाठी निर्माण केलेल्या संधींनी मोजली जाते. जर हजारो मुलांचं बालपण अजूनही बांधकाम साईटवरील धुळीत हरवत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पनेवर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे. कारण प्रश्न फक्त इमारती उभारण्याचा नाही. प्रश्न आहे त्या इमारतींच्या सावलीत हरवणाऱ्या बालपणाला वाचवण्याचा...

पान ३ वरून

## सामर्थ्य दे या संवादास...

बेटा, मला तुझ्या या वागण्याचा व तू राखलेल्या संयमाचा अभिमान आहे. मोबाईलवरून अश्लील मेसेजेस पसरविणाऱ्या एका रॅकेटमध्ये माझ्या मित्राची तुझ्याच वयाची मुलगी सापडली तेव्हा त्याचा चेहरा मला बघवत नव्हता. पण तू तशी शक्यताही निर्माण होऊ देत नाहीस. कारण तू मोबाईलच वापरत नाहीस. तू तुझ्या मैत्रिणींसारखी सगळीकडे भटकतदेखील नाहीस, याचाही मला आनंद वाटतो. बेटा, तू कुठे बाहेर गेलीस आणि घरी परतण्याच्या वेळेपेक्षा तुला दहा मिनिटेही जास्त वेळ लागला तर मला धस्स होते आणि माझ्या काळजाचे ठोके चुकतात. तुझ्या काळजीपोटी माझे काय होते ते मी तुला सांगूच शकत नाही. परंतु, असे काळजीचे प्रसंग तू माझ्यावर आणत नाहीस. कारण तू अत्यंत समंजसपणे व आपल्या सुरक्षित चौकटीत राहून वागणारी शहाणी मुलगी आहेस, याचा मला सार्थ अभिमान आहे.

पान ४ वरून

## जगणं जेव्हा 'नाम' बनतं...

आमच्या घरात सर्वजण माळकरी आणि शाकाहारी आहेत. सकाळी आपल्या आईला विठ्ठल मंदिरात घेऊन जाण्याचे आणि परत आणण्याचे काम सतीशदादा आनंदाने करतात. माँ यांनी आपल्याजवळील सर्व पैसे, दागदागिने मुलांमध्ये वाटून टाकले. तुकाराम महाराज म्हणतात, सोने आणि रूपे आम्हा मृत्तिकेसमान. सोन्याची,धनाची, पैशाची कोणतीही आसक्ती त्यांनी ठेवली नाही. बोले तैसा चाले या उक्तीप्रमाणे वागणाऱ्या त्या आहेत. देह सुटल्यानंतरही कोणाला आपला त्रास नको म्हणून मुलांना त्यांनी सांगून ठेवलं की, थेट विद्युत दाहिनीमध्ये माझे अंत्यसंस्कार करा! देहाबद्दलचे प्रेम आणि देहाची आसक्ती भल्याभल्यांना सुटत नाही. पण इथे त्यांची विरक्ती दिसून येते. ही विचारांची स्पष्टता ही अलिप्तता आणि तरीही सगळ्यांवर असलेलं प्रेम! मला वाटतं हेच खऱ्या अध्यात्माचं लक्षण असावं. निघताना माँ ना सहज विचारलं. परमेश्वराचा एखादा साक्षात्कार आपल्या अनुभवास आला आहे का? तेव्हा त्या म्हणाल्या मी ८५ वर्षाची आहे. फक्त दोन केळी आणि थोडे दूध एवढाच आहार आहे. या देहाला तो भगवंत दरवर्षी वारीला घेऊन जातो आणि सुखरूप परत घेऊन येतो हा मोठा चमत्कार नाही का?

पान ५ वरून

## 'गंगातीरी धीडरें म्हणती वराडी आहिता म्हणेती...'

ज्याच्या अंगात ताप आहे त्याला साखरेची गोडी कळत नाही, त्याला साखर नकोशी वाटते, पण ताप नसलेल्या इतरांना मात्र साखरेची गोडी काय असते ते माहीत असते. तुका म्हणे काय सलपटासी काज अजूनही गावात सलपट, सालपट हे शब्द ओठांवर आहेत. या दोन्ही शब्दांचा अर्थ फळाची साल असा आहे. 'तुका म्हणे काय सलपटासी काज। फणसातील बीज काढुनि घ्यावे।।' या संत तुकारामांच्या ओळीत 'काज' हा बोलीतील शब्द आहे.

काज म्हणजे काम. फणसातल्या बियांचे गर खाण्यासाठी उपयोगाचे आहेत, पण फणसाच्या काटेरी सलपटाचे काहीच काम नाही. महाराष्ट्रातील काही भागात फळांच्या शेंगांच्या सालीला फोलपट म्हणतात. फोल म्हणजे बिनकामाचे आणि पट म्हणजे साल. बिनकामाची साल म्हणजे फोलपट होय. या सालीला काही भागात फोतर म्हणतात. फळाचा काढून टाकण्याचा सालीचा भाग म्हणजे फोतर होय. आरपान 'आरपान' म्हणजे रात्री जेवण झाल्यावर अन्न शिजवलेल्या व जेवलेल्या सर्व भांड्यात पाणी टाकून विसळून एका मोठ्या भांड्यात एकत्र केलेले अन्न मिश्रित पाणी. विसळणे म्हणजे भांडे घासण्यापूर्वी त्यात पाणी घालून अन्न काढून टाकणे होय. भांडी घासून पुन्हा एकदा पाण्याने विसळले जाते. विसळणे दोनदा केले जाते. हे आरपान गाय, म्हैस, बैल या घरच्या जनावरांपुढे मांडले जाते. ते घरच्या जनावरांना आवडते. कधी या आरपानावर डाळीची किंवा अन्य धान्याची चुरी टाकली जाते. अजूनही जनावरांपुढे आरपान मांडले जाते. म्हणून 'आरपान' हा शब्द आपले अस्तित्व टिकवून आहे.

पान ५ वरून

## काळ्यानिळ्या रेषामधील शैक्षणिक संदर्भ

ऐन परीक्षेच्या काळात तमाशामध्ये वाजवण्याचे काम केले त्यामुळे शाळा पडीत झाली आणि नववी नापास असा त्यांचा निकाल लागला. सोबतचे मुलं दहावीचे गेले लेखक मात्र नववीत राहिले ते खूप रडले आणि त्यांना खूप उदास वाटत असेल असे ते सांगतात यावरून शिक्षणाची कितीही आस्था असली तरी आर्थिक परिस्थितीमुळे तरी आर्थिक परिस्थितीमुळे अनेकांचे शिक्षण कुठे गचके खात पुढे गेले तर, कुठे कायम चे थांबले. हे सत्य आपल्याला पचवून घ्यावे लागते. बीए बीएडची जागा असताना लेखकाचा भाऊ इंटरव्यूसाठी जातो. पात्रता असूनही त्या ठिकाणी बाविस्कर म्हणजे गावात बँड वाजवणारे, बँड वाजवणारा मुलांना कसे शिकवेल? असे निरर्थक प्रश्न उपस्थित करण्यात आल्या आणि शेवटी एका गरीब कुटुंबाचं भलं होईल अशा विचारातून त्याला शिक्षक म्हणून घेतल्या गेलं. हा प्रसंगही जिव्हारी लागण्यासारखाच आहे. पात्रता असूनही जात आणि त्याचे संदर्भ शिक्षण क्षेत्रात का चघळले जातात? असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. रवी पेंटर कडून लेखक साइन बोर्ड रंगवायचे शिकले. त्याबद्दल बोलताना ते सांगतात की, रवी पेंटर लेखकाबद्दल इतरांना सांगताना सांगायचे की हा माझा एकलव्य आहे. लेखकाला ते एकलव्य म्हणत असले तरी हा गुरु एकलव्याच्या गुरु सारखा नव्हता. या वाक्यातून अतिशय महत्त्वाची अशी शिक्षण क्षेत्रातील व्यथा लेखकाने सांगितली आहे. बारावीमध्ये प्रवेश घेतलेल्या कचरू बाविस्कर यांच्यासोबत असलेल्या महारांच्या मुलांच्या संगतीमुळे त्या काळात त्यांच्यात बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची पेरणी झाली होती. ही गोष्ट मेलेल्या माणसाला जिवंत करते. लेखकाचा भाऊ त्यांच्या तालुक्यात आणि तेवढ्या भागात मातंग समाजातला पहिला बीए बीएड झाला होता. अज्ञानाच्या वाटेतून बाहेर निघण्यासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. असे म्हणूनच लेखक म्हणतात. लेखकाने स्वतः नोकरीला लागल्यावर ही काही वर्ष बँड वाजवला. मात्र लेखक म्हणतात फक्त शिक्षणामुळे आणि शिक्षणामुळेच ते या गरिबीच्या चिखलातून बाहेर पडू शकले होते. एकंदरीत काळ्यानिळ्या रेषा या विलक्षण आत्मकथनातील व्यक्तिरेखांचा विचार केला असता मातंग समाजातील गरिबी, हालाखी आणि दारिद्र्य आणि त्यावर शिक्षणाच्या साहाय्याने मात करणारे लेखकाचे कुटुंब असा अगदी साधा मात्र जगण्यासाठी तितकाच कठीण असलेल संघर्षचित्र लेखकाने उभे केले आहे.

वेध

मधुरा कुलकर्णी

# जागतिक युद्धखोरी काय साधतेय?

जग गेल्या काही वर्षांपासून अस्थिरतेच्या काळातून जात आहे. एका बाजूला रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे. दुसऱ्या बाजूला अमेरिका- इस्रायल- इराण युदधामुळे मध्यपूर्वेतील तणाव वाढत आहे. तिसरीकडे इस्रायलचे लेबनॉनवरील आक्रमणाच्या अनिश्चिततेचे दडपण जगावर आहे. अशा प्रकारे एकाच वेळी दोन तीन युद्धे चालू आहेत. त्यातच नुकतेच अमेरिकेने व्हेनेझ्युएलावर हल्ला करून त्या राष्ट्राध्यक्षाला बंदी बनवले आणि तिथल्या तेलसाठ्यावर कब्जा केला.

मध्यपूर्वेतील संघर्षाला दोन आयाम आहेत. इराणइस्राय लमधील पारंपरिक शत्रुत्व आणि जगातील बहुतांश तेलसाठे स्वत:च्या ताब्यात ठेवण्याचा अमेरिकेचा हव्यास. आज रशिया सोडला तर जगातील ७० टक्के तेलसाठ्यांवर अमेरिकेचे वर्चस्व आहे. परंतु त्यात इराणचा अडसर होता. त्यामुळे तेथील राजवट उलथून अमेरिकाधार्जिणे सरकार आणण्यासाठी अमेरिका उत्सुक होती. त्यामुळेच या युद्धात अमेरिकेने उडी घेतली. परंतु, आज या संघर्षांचे परिणाम केवळ युद्ध करणाऱ्या देशांपुरते मर्यादित राहत नाहीत. त्याचे पडसाद जगभर उमटतात. इंधन दरवाढ, महागाई, संरक्षण खर्चातील वाढ, अन्नधान्य संकट, पुरवठा साखळीतील अडथळे अशा अनेक रूपां ध्ये या संघर्षांची झळ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचते. जागतिकीकरणाच्या युगात एका देशातील अस्थिरता संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला हादरा देऊ शकते, हे या घटनां धून स्पष्ट झाले आहे. रशिया-युक्रेन युद्धाने सर्वप्रथम जगाला ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व दाखवून दिले. रशिया हा नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलाचा मोठा पुरवठादार आहे. युरोपमधील अनेक देश ऊर्जा गरजांसाठी रशियावर अवलंबून होते. युद्ध सुरू झाल्यानंतर पुरवठा विस्कळीत झाला आणि तेल-गॅसचे दर झपाट्याने वाढले. याचा परिणाम केवळ युरोपवरच झाला नाही, तर भारतासह अनेक देशां ध्ये पेट्रोल- डिझेल महागले. वाहतूक खर्च वाढल्याने अन्नधान्य, खत, औद्योगिक उत्पादन या सर्वच वस्तूंच्या किमती वाढल्या. सामान्य माणसाच्या दैनंदिन खर्चात वाढ झाली. म्हणजे युद्ध हजारो किलो ेटर दूर असले, तरी त्याची झळ आपल्या घरच्या बजेटपर्यंत पोहोचली. काही वर्षांपूर्वी अमेरिका आणि रशिया हे दोन तुल्यबळ देश होते.

१९९१ मध्ये रशियाचे विघटन झाले. कारण एकेकाळी अझरबैझान, कजाकिस्तान, उजबेकिस्तान यासारख्या मध्य आशियातील मुस्लिमबहुल भागातून रशियाचे सैन्य घडत असे. परंतु पारंपरिक सैनिकांचा हा भाग मूळ रशियातून फुटून स्वतंत्र झाला. अर्थात, उरलेला रशिया केवळ अण्वस्त्रांच्या बाबतीतच आजही अमेरिकेची बरोबरी करू शकतो, अशी स्थिती आहे. परंतु अण्वस्त्रांचा वापर फक्त स्वसंरक्षणासाठी करता येईल आणि ते युद्धात वापरावयाचे अस्त्र नव्हे, हा संकेत असल्यामुळे रशिया अण्वस्त्रे वापरू शकत नाही. त्यामुळे आज रशिया अमेरिकेच्या तुलनेत शस्त्रास्त्रदृष्ट्या काहीसा कमजोर ठरला आहे. जागतिक तेलव्यापाराच्या दृष्टीने विचार करताना लक्षात येते की, चीनदेखील तेलाचा फार मोठा खरेदीदार आहे.




भारतापेक्षाही चीनची तेलसंबंधित आयात अधिक आहे. त्याच वेळी चीनने औद्योगिक क्षेत्रात अमेरिकेला मागे टाकले आहे. ही चीनची महासत्ता मोडून काढणे आणि आर्थिक जगतावर डॉलरचे साम्राज्य टिकवून ठेवणे या उद्देशाने अमेरिका जगाच्या तेलसाठ्यावर कब्जा करू पाहते आहे. आज अशी स्थिती आहे की, अमेरिका सर्वात आक्रमक देश आहे, परंतु सामरिकदृष्ट्या सर्वाधिक कमजोर देशही अमेरिकाच आहे. कारण गेल्या काही काळात अमेरिकेने अनेक देशांना दुखावले आहे. आपल्या धरसोड धोरणात्मक कृतीने युरोपमधील मित्रदेश, आशियातील देश आणि भारतासारखे मित्रदेश या सर्वांनाच अमेरिकेने दूर केले आहे. विशेष म्हणजे हिटलरच्या काळात होता, तसा वंशवाद आज अमेरिकेत उफाळला आहे. ज्याप्रमाणे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शस्त्रास्त्रदृष्ट्या उत्कृष्ट असूनही मित्रांना दुखावल्यामुळे एकट्या पडलेल्या जर्मनीला अखेर पराभवाला सामोरे जावे लागले, तशीच काहीशी अमेरिकेची स्थिती आहे. अर्थातच हे केवळ ट्रम्प राष्ट्राध्यक्ष आहेत म्हणून नव्हे, तर त्यापाठीमागे 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' ही घोषणा सत्यात आणू पाहणारा एक मोठा गट आहे. त्यामुळे ट्रम्प सत्तेतून बाहेर पडले तरी ही मनोवृत्ती पुढील दोन-तीन दशके तरी तशीच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे कदाचित पुढील काळात अमेरिका संपूर्ण जगासाठी डोकेदुखी बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र वर वर पाहता असेच दिसते की, सध्या तरी अमेरिकेच्या आधिकारिक बलाढ्यतेमुळे सर्वजण गप्प आहेत. असे असले तरी पडद्यामागे सर्वच देशांच्या गुप्त हालचाली चालू आहेत.

विशेषत: भारताच्या संदर्भात ही बाब आवर्जून लक्षात येते. भारतीय राजकारणाचा धांडोळा घेतला तर जाणवते की भारताने चीन आणि पाकिस्तानबरोबर नेहमीच सहकार्याची भूमिका घेण्याचा प्रयत्न केला होता. किंबहुना, भारताने नेहमीच शेजारी राष्ट्रांशी उत्तम संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

आपण या दोन्ही देशांकडे मैत्रीचा हात पुढे केला होता. परंतु संघर्षाची स्थिती आल्यावर देशहिताला प्राधान्य दिले. गेल्या काही काळात मात्र भारत आणि चीन यांच्यामध्ये झालेला गलवान संघर्ष सोडता, दोन्ही देशां ध्ये ठिकठाक संबंध असल्याचे चित्र आहे. योग्य त्या उपाययोजना करून पाकिस्तानची दहशतवादीमुळे जगासमोर आणल्यामुळे सध्या त्या आघाडीवरही बऱ्यापैकी शांतता आहे.

आज सरकार चालू घडामोडींचा आढावा घेऊन देशहिताचे धोरण पुढे नेते आहे. युक्रेन-रशिया युद्धानंतर रशियावर पाश्चात्त्य देशांनी निर्बंध घातल्यानंतर रशियाबरोबर डॉलरमध्ये व्यवहार करणे कठीण झाले होते. तेव्हा सावधानतेने भारताने आपली व्यवहारमूल्यता वाढविण्याचा प्रयत्न केला. रशियाव्यतिरिक्त भारताने युनायटेड अरब एमिरेट्स, श्रीलंका, मॉरिशस आणि इतर काही देशांबरोबरही रुपयामध्ये व्यवहार वाढविण्याचे प्रयत्न केले. अमेरिकेच्या डॉलर वर्चस्वाला आव्हान देण्याचा हा एक लहानसा यशस्वी प्रयत्न होता. केवळ रुपयाच नव्हे, तर मधल्या काळात मध्यपूर्वेतील काही देशांनीही तेल व्यापारात विनिमयासाठी चिनी चलन स्वीकारायला सुरुवात केली. त्यामुळे भविष्यात डॉलरचे महत्त्व कमी होत जाईल, यात काहीच शंका नाही. आजघडीला डॉलरचे कमी होत असलेले मूल्य हीच अमेरिकेची मुख्य भीती आहे. त्यामुळे जगातील तेलसाठे ताब्यात घेऊन जगावर नियंत्रण ठेवण्याची धडपड सुरू आहे. प्रत्यक्षात अनियंत्रित डॉलर छापून वितरण केल्यामुळे कधी नव्हे एवढा चलनफुगवटा अमेरिकेत निर्माण झाला आहे.

खरे तर, युद्ध आणि लष्करी बळ हे कधीही आर्थिक प्रश्न सोडविण्याचे माध्यम बनू शकत नाही हे एक कालातीत सत्य आहे. मात्र ही बाब अमेरिकेला अजून शिकायची आहे. एकूणच, आजच्या जागतिक संघर्षजन्य स्थितीमध्ये भारताने आपले चातुर्य पणाला लावणे आवश्यक आहे. विरोधाला विरोध आणि स्वदेशापेक्षा परक्यावर विश्वास हे धोरण विरोधी पक्षांनी सोडून योग्य विचार आणि कृतीला पाठिंबा देणे आवश्यक आहे. इतर वेळी विभक्त असलो, तरी संकटकाळात आम्ही एकशेपाच आहोत, या वृत्तीनेच वागायला हवे. सरकारनेही सर्व पक्षांना आणि जनतेला विश्वासात घेऊन येऊ घातलेल्या संकटांची जाणीव करून द्यायला हवी आणि मोकळेपणाने सहकार्य मागायला हवे. या परिस्थितीत भारतासारख्या देशांनी काही महत्त्वाचे धडे घेणे आवश्यक आहे. ऊर्जा, अन्नधान्य, औद्योगिक उत्पादन आणि संरक्षण साहित्य यासाठी शक्य तितकी स्वयंपूर्णता आपल्या देशाला हवी आहे. बाह्य अवलंबित्व कमी केले तर जागतिक संकटांचा परिणाम मर्यादित करता येतो. भारताने अक्षय ऊर्जेला चालना देणे, स्थानिक उत्पादन वाढविणे आणि पुरवठ्याचे विविध स्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. भारतात अनेकदा नोकरशाहीच्या नकारात्मक भूमिकेमुळे ऊर्जेच्या निर्मितीला आणि वापराला खीळ बसते. सौर ऊर्जेची निर्मिती आणि वापर यातही नोकरशाहीच्या अडथळ्यां ुळे अनेक प्रश्न समोर येत आहेत. त्यामुळे त्यावर सरकारचे योग्य नियंत्रण असणे आवश्यक आहे.

ताज्या जागतिक संघर्षांनी आपल्याला एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. जग परस्परावलंबी आहे. एका प्रदेशातील युद्धाचा परिणाम दुसऱ्या खंडातील सामान्य नागरिकावर होऊ शकतो. त्यामुळे शांतता, सहकार्य आणि आत्मनिर्भरता या तिन्ही गोष्टी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. युद्धे अल्पकालीन राजकीय उद्दिष्टे साध्य करू शकतील, पण जगाला त्यांची किंमत दीर्घकाळ मोजावी लागते. त्यामुळेच सावध राहून योग्य मार्गाने प्रगतीची पावले उचलणे हेच या काळात आवश्यक आहे.

वेध

डॉ. पंकज जयस्वाल

# गरज सागरी बालेकिल्ल्याच्या डागडुजीची...

राजकारण, मुत्सद्देगिरी किंवा निवडणुका असोत, पंतप्रधान मोदी यांची, विरोधकांना हाताळण्याची स्वत:ची एक रणनीती आहे. ते लक्षद्वीपला गेले आणि तेथील सुंदर पाण्यात त्यांनी 'स्नॉर्कलिंग'चा आनंद घेतला. त्याचा अनुभव देशवासियांना सांगत, समाज माध्यमांवर त्याचे फोटोही प्रसिद्ध केले. त्याचबरोबर या बेटावर साहसी अनुभव घेण्यासाठी येण्याचे आवाहन केले. मालदीवमध्ये जशी समस्या होती, तशीच समस्या आपल्या काही विरोधी पक्षातील नेत्यांचीही आहे. सध्या विरोधी पक्षनेते या प्रदेशातील धोरणात्मक उपक्रमांना विरोध करताना दिसत आहेत. लक्षद्वीप प्रदेशात नागरी आणि लष्करी विकास का महत्त्वाचा आहे? हे आपण आधी समजून घेऊया...

भारतीय महासागर आणि अरबी समुद्राला लागून असलेल्या अनेक देशांमध्ये, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि बंदरे उभारून चीनने भारताची सामरिक असुरक्षितता वाढवली आहे. गेल्या काही दशकांमध्ये चीनने नौदल क्षमतेतही झपाट्याने सुधारणा केली. चीन श्रीलंकेत हंबनटोटा हे बंदर शहर वसवीत असून, भारतापासून ते सुमारे ५०० किलोमीटर अंतरावर आहे. तसेच, चीनने मालदीवमधील काही बेटांवर नियंत्रण मिळवत, विमानतळाचा विकास करत आहे. हंबनटोटा आणि चेन्नई, कोची व विशाखापट्टणम या बंदरांमधील अंतर ९०० ते १५०० किलोमीटर. भारताच्या अंतराळ मोहिमांसाठी महत्त्वाचे असलेले श्रीहरिकोटा येथील 'सतीश धवन अंतराळ केंद्र' ११०० किलोमीटर अंतरावर आहे. अनेक वर्षांच्या दुर्लक्षानंतर भारत मालदीव, मॉरिशस, सेशेल्स, श्रीलंका, पाकिस्तान आणि म्यानमारसारख्या शेजारी देशांमधील चीनच्या वाढत्या धोक्यावरचा उपाय म्हणून लक्षद्वीपचा विचार करत आहे. भारताने ही बेटे केवळ सुरक्षितच नव्हे, तर एक 'सामरिक सामर्थ्य केंद्र' म्हणून विकसित केली पाहिजेत. या बेटांच्या भौगोलिक स्थानामुळे भारताला त्याचा सामरिक फायदा मिळेल. लष्करी दृष्टिकोनातून, मिनिकॉय बेटावरील प्रस्तावित हवाईपट्टीमुळे भारताला अरबी समुद्र आणि विस्तृत हिंद महासागर क्षेत्रावर लक्ष ठेवणे सुलभ होते. याचा उद्देश लष्करी आणि नागरी प्रयत्नांमधील समन्वय अधोरेखित करतो. विशेष म्हणजे, भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय हवाई दल यांच्यातील सहकार्य, हा या प्रकल्पाचा एक महत्त्वाचा घटक. भारतीय तटरक्षक दलाने सुरुवातीला मिनिकॉय बेटांवर विमानतळ उभारण्याची शिफारस करतानाच, या जागेच्या सामरिक फायद्यांवर भर दिला. शिवाय, भारतीय महासागरातील चीनी प्रभावाच्या पार्श्वभूमीवर मिनिकॉय बेटावरील दुहेरी उद्देशाच्या हवाईपट्टीचे बांधकाम महत्त्वपूर्ण ठरते. चीनी प्रभावाच्या पार्श्वभूमीवर या विमानतळामुळे, भारताला सक्रिय भूमिका घेता आल्याने भारताच्या संरक्षणसज्जतेतही वाढ होते. भारतीय महासागर क्षेत्रातील सर्वाधिक वर्दळीच्या आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारी मार्गांवरील या द्वीपसमूहांचे सामरिक महत्त्व अवर्णनीय असेच. दि. ७ एप्रिल २०२१ रोजी, मार्गदर्शित -क्षेपणास्त्र विनाशक 'यूएसएस जॉन पॉल जोन्स' लक्षद्वीपच्या किनाऱ्याजवळून गेले. लक्षद्वीप भारताला एक सामरिक रक्षक, सागरी संरक्षक आणि एक राजनैतिक शक्ती म्हणूनही साहाय्यभूत ठरते.

**नौदल चौकी:** लक्षद्वीप बेटे अरबी समुद्रतील भारतीय नौदलासाठी 'नौदल चौकी' म्हणून काम करू शकतात.

**तस्करीवर लक्ष ठेवणे:** देशभरात बंदुका आणि अमली पदार्थांच्या तस्करीसाठी, लक्षद्वीपचा वापर तळ म्हणून करणे शक्य.

**समुद्री चाचेगिरीचा मुकाबला:** अरबी समुद्रातील समुद्री चाचांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी, लक्षद्वीप एक मोक्याचे ठिकाण ठरते.

**जलवाहतूक मार्ग:** लक्षद्वीपमधील नाईन-डिग्री चॅनेल हा पश्चिम आणि पूर्व आशियादरम्यानच्या जहाजांसाठी सर्वात जलद मार्ग आहे. लक्षद्वीप बेटांवरून याचा प्रभावी मागोवा घेणे शक्य.

**सामरिक साधन:** मालदीव मुद्यावरून चीनसोबत वाटाघाटी करताना, भारत लक्षद्वीप विकासाच्या मुद्द्याचा धोरणात्मक वापर करू शकतो.

**भारतीय महासागर क्षेत्रावर संयुक्त वर्चस्व :** जागतिक भू-राजकारणात भारत आता एक शक्तिशाली राष्ट्र असून, इतर राष्ट्रे भारतासोबत सहकार्य करत आहेत. त्यामुळे भारतीय महासागर क्षेत्रातील नौदलासाठी लक्षद्वीपचा वापर प्रशिक्षण आणि समन्वय केंद्र म्हणून होऊ शकतो. अरबी समुद्राच्या सीमा येमेन, ओमान, पाकिस्तान, इराण आणि मालदीवला लागून आहेत. त्यामुळे सरावासाठी हे एक मोक्याचे ठिकाण ठरते.

अरबी समुद्रातील जहाजांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी, लक्षद्वीप बेटांचा प्रभावी उपयोग केला जाऊ शकतो. भारताचे विशेष आर्थिक क्षेत्रही खूप विस्तृत असून, त्यात लक्षद्वीपचा समावेश आहे. विशेष आर्थिक क्षेत्र कोणत्याही देशाच्या किनारपट्टीपासून २०० सागरी मैल पर्यंत पसरलेले असते. लक्षद्वीपमुळे भारताचे समुद्राच्या मोठ्या भागावर नियंत्रण आहे. त्यामुळेच लांब पल्ल्याच्या जहाजांवर लक्ष ठेवणे आपल्याला शक्य होते. लक्षद्वीपच्या कावरत्ती बेटावर भारतीय नौदलाचा तळ आहे. यासोबतच, भारत सध्या लक्षद्वीपवर अजून एक तळ विकसित करत आहे.

**इतिहासातून मिळालेले धडे:** दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याने, लक्षद्वीपची सामरिक असुरक्षितता उघड केली. केरळस्थित इतिहासकार के. एम. सेठी यांच्या मते, भारतीय तटरक्षक दलाचे अधिकारी बी. के. लोशाली यांनी २०१० मध्येच म्हटले होते की, लक्षद्वीपची बेटे आणि वाळूचे दांडे, घुसखोर आणि अवैध मालासाठी लपण्याची उत्तम ठिकाणे आहेत.

लोशाली यांच्या मते, लक्षद्वीपची २५ निर्जन बेटे केरळम्च्या किनारपट्टीसाठीचा खरा धोका ठरतील. इतिहासकार के. एम. सेठी यांच्या मते, लक्षद्वीपवरील भारताच्या वर्चस्वाला आव्हान यापूवही होते. ऑगस्ट १९४७ मध्ये देशाची फाळणी झाल्यावर लक्षद्वीपला जोडण्याच्या प्रयत्नाचे वृत्त होते. दि. ९ ऑगस्ट २०१९ रोजी फतेह-उल-मुल्क अली नासिर यांनी लाहोरस्थित एका वर्तमानपत्रात म्हटले की, पाकिस्तानने १९४७ मध्ये लक्षद्वीप जोडण्याची एक संधी गमावली. पुढे नासिर म्हणाले की, 'जर पाकिस्तानने ते बेट ताब्यात घेतले असते, तर विषुववृत्ताजवळ त्यांची एक सागरी चौकी उभी राहिली असती. याचे संरक्षणविषयक फायदे प्रचंड असते आणि पाकिस्तानला मालदीवला टक्कर देणारे एक बेटही मिळाले असते, त्याचा पर्यटनासाठीही लाभ झाला असता.' तथापि, त्यांनी सांगितले की, 'तत्कालीन पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अली खान यांचे उद्दिष्ट, या दुर्गम द्वीपसमूहाला भारतीय महासागरात पाकिस्तानचा दक्षिणेकडील विस्तार बनवण्याचे होते आणि म्हणूनच, त्यांनी ऑगस्ट १९४७ मध्ये या बेटांवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला.' मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी नौदलाने कराचीहून एक 'फ्रिगेट' पाठवले. तोपर्यंत भारताचे उपपंतप्रधान सरदार पटेल यांनी तत्परतेने कारवाई करत, भारतीय ध्वज फडकवण्यासाठी उच्च भारतीय अधिकार्यांचे एक पथकच पाठवले. दि. ७ एप्रिल रोजी अमेरिकेच्या नौदलाच्या सातव्या ताफ्याने कळवले की, मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशक यूएसएस जॉन पॉल जोन्स भारताला न कळवता, लक्षद्वीपपासून १३० सागरी मैल दूर निघून गेले. अमेरिकेने सांगितले की, आंतरराष्ट्रीय कायद्यतेल समुद्री हक्क, स्वातंत्र्य जपण्यासाठीच त्यांनी असे केले. अमेरिकेच्या नौदलाने असेही सांगितले की, ते भारताच्या अवाजवी सागरी दाव्यांना आव्हान देतील. अमेरिकेच्या या भूमिकेमुळे भारत सरकार संतप्त झाले परंतु, अमेरिका मित्रराष्ट्र असल्याने त्यांनी शांतपणे प्रतिसाद दिला. तथापि, अमेरिकेच्या या घुसखोरीमुळे, चिनी किंवा पाकिस्तानी नौदल अमेरिकेच्या या सरावाची नक्कल करू शकतात अशी शक्यता प्रबळ झाली.

**लक्षद्वीपचा भूगोल :** लक्षद्वीप हा अरबी समुद्रातील ३६ बेटांचा एक द्वीपसमूह असून, केरळम् किनार्यापासून तो ४४० किलोमीटर अंतरावर आहे. केवळ ३२ चौरस किलोमीटर एकूण भूक्षेत्रफळ असलेली ही बेटे, भारताच्या केंद्रशासित प्रदेशांपैकी सर्वात लहान आहेत. असे असले, तरी ही बेटे भारतीय समुद्रासाठी सुमारे २० हजार चौरस किलोमीटर आणि देशाच्या विशेष आर्थिक क्षेत्रासाठी चार लाख चौरस किलोमीटर क्षेत्र पुरवतात. भारत सरकार या लक्षद्वीप बेटांना एक महत्त्वपूर्ण सागरी बालेकिल्लाच मानते.

**निष्कर्ष:** होर्मुझच्या सामुद्रधुनीतील संकटाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर विनाशकारी परिणाम झाला. यावरून हे सिद्ध होते की, आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी, आपण लक्षद्वीपमध्ये शक्तीवर्धन करणे गरजेचे आहे. विरोधकांच्या खोट्या पर्यावरण विषयक चिंतेच्या सापळ्यात अडकू नये. त्याऐवजी पर्यावरण शाश्वत ठेवत, राष्ट्रीय विकास आणि सुरक्षेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.



**आई आणि मातृत्व वृत्ती यांच्यात गल्लत होऊ नये. स्त्री ही व्यक्ती म्हणून उत्तम असेल तर ती आई म्हणूनही उत्तमच असते. जिजामातेसारखी मातृत्व वृत्ती असेल तरच शिवाजी महाराज घडतात. मुलांना सतत उपदेश देऊन संस्कार होत नसतात. पालकांची दैनंदिन, प्रासंगिक वागणूक आणि कौटुंबिक वातावरणातून संस्कार झिरपतात. म्हणूनच 'आई तू कशाला काही करते?' असे म्हणावेसे वाटते. मदर्स डेच्या निमीत्ताने...**

# आईपलीकडची




निमीत्त **डॉ. साधना कुलकर्णी**

अलिकडेच वर्तमानपत्रात एका खटल्याच्या निकालाची बातमी वाचली. खटल्याच्या तपशिलात शिरायची गरज नाही. एका पतीने पत्नीकडून आपल्या मुलीचा ताबा मिळावा यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. वर्षभरापूर्वी त्या दोघांचा घटस्फोट झाला तेव्हापासून मुलगी आईजवळ राहत होती. पतीच्या बाजूने ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आणि मानवी हक्क कार्यकर्ता इंदिरा जयसिंग यांनी युक्तिवाद केला. 'मुलीच्या आईचे विवाहबाह्य संबंध असल्यामुळे मुलीला आईच्या ताब्यात देणे योग्य नाही' असे मत त्यांनी युक्तिवादात मांडले. यावर उच्च न्यायालयाने दिलेले उत्तर असे की, 'चांगली पत्नी नसणे, याचा अर्थ संबंधित महिला चांगली 'आई' नाही असा नव्हे. व्यभिचार हे घटस्फोटाचे कारण असू शकते. परंतु अपत्याचा ताबा आईकडे न देण्याचे ते कारण असू शकत नाही,' असे निरीक्षण नोंदवून मुलीचा ताबा आईकडे देण्यात आला.



आता मुद्दा असा आहे की, 'आई' असणारी आणि 'व्यभिचार करणारी' व्यक्ती तर एकच आहे. इंदिरा जयसिंग यांनी महिलेच्या 'वागणुकीचा' निकष लावला तर उच्च न्यायालयाने 'आई' हा निकष लावला. म्हणजे फक्त आई असणे हे एक असामान्य गुणवैशिष्ट्य आहे का? यासंदर्भात महाभारतातील कुंतीची कथा आठवणे अपरिहार्य आहे. दुर्वास ऋषींनी शिवसेन राजाच्या कन्येवर, कुंतीवर प्रसन्न होऊन वर दिला होता. 'ज्या देवाचे स्मरण करशील, तो देव वश होईल' अशी ती शक्ती होती. लग्नापूर्वी कुंतीने सहज सूर्यदेवाचे स्मरण केले.

सूर्यदेव प्रकट झाले आणि त्यांनी कुंतीच्या नाभीला बोट लावले. 'तुला माझ्याप्रमाणेच तेजस्वी पुत्र होईल...' असा आशीर्वाद देऊन ते अंतर्धान पावले. आणि खरोखरच कुंतीला सूर्यपुत्राचा लाभ झाला. या अनपेक्षित घटनेने कुंती घाबरून गेली. समाजाच्या भीतीने तिने सूर्यपुत्राला नदीत सोडून दिले आणि हे सत्य दडवून ठेवले. आता या प्रसंगी कुंतीने कशाला प्राधान्य दिले हे तर सर्वश्रुतच आहे. म्हणजे एका स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वात आई असण्याबरोबरच अनेक गुण-अवगुण एकवटले असतील तर केवळ ती 'आई' आहे म्हणून श्रेष्ठ ठरते का? आपल्या संस्कृतीने मातेचा नेहमीच गौरव केला आहे. किंबहुना मातेला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी।' 'न मातु:परदैवतम्।' 'कुपुत्रो जायते क्वचिदपि, माता कुमाता न भवति।' 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.'

'देवाला प्रत्येक ठिकाणी जन्म घेणे शक्य नव्हते म्हणून त्याने आई निर्माण केली.' असे आणि यासारखे असंख्य वाक्प्रचार, सुभाषिते, श्लोकांनी प्रत्येक भारतीय मनाचे सॉफ्टवेअर तयार झाले आहे. ही उपरोक्त ब्रह्मवाक्ये शाळेत निबंधात लिहून, पाठ करून आईबद्दल अतिउदात्त धारणा प्रस्थापित झाल्या आहेत. आई म्हटले की मम तेचा सागर, त्यागमूर्ती, आदर्श, वात्सल्य, करुणा इत्यादी घासून गुळगुळीत झालेले शब्द वापरलेच पाहिजेत, असा एक अलिखित नियम आहे. याशिवाय चित्रपट-मालिकांध्ये दाखवलेली आई तर अतिरंजित रूपात असते. ऐन कसोटीच्या, जीवन-मरणाच्या प्रसंगात ही सिनोतली आई मुलासमोर भात्यातले एक ब्रह्मास्त्र सोडते.

'मैने तुम्हे नौ महिने अपने पेट मे पाला है...' प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला आव्हान देणारे हे 'भावनिक ब्रह्मास्त्र.' मुलाला क्षणात गारद करणारे! वास्तविक, नऊ महिने बाळाला पोटात सांभाळणे हा काही विश्वपराक्रम नाही; जन्मणाऱ्या बाळावर केलेले उपकार तर नाहीच नाहीत. ही अत्यंत नैसर्गिक अशी शारीरिक घटना आहे; ज्यात भावी आईचे काहीही कर्तृत्व नाही. 'तुला नऊ महिने पोटात वाढवले आणि तुझ्यासाठी खस्ता खाल्ल्या...' हे वाक्य ऊठसूट हुकमी एक्क्यासारखे का म्हटले जाते, हे अनाकलनीय आहे.

'गाजर का हलवा' खाऊ घालणारी, सतत टिपे गाळणारी, मशीनवर कपडे शिवणारी, डोक्यावर घमेले घेऊन दगड उचलणारी, स्वतः उपाशी राहणारी अशा ठरावीक साच्यातील आईची प्रतिमा चित्रपटात रंगवली जाते. पण आई हीसुद्धा एक हाडामांसाची जिवंत व्यक्ती आहे. तिला चांगल्या-वाईट संवेदना आहेत. तिचा ठरावीक स्वभाव आहे. तिला आवडीनिवडी आहेत. ही वस्तुस्थिती महत्त्वाची नाही का?

प्रत्येक आई आपल्या कुवतीनुसार, बुद्धीनुसार अपत्यांची काळजी घेत असते. संगोपन करते. कुठेही गेली तरी तिचा जीव लेकरांध्ये गुंतलेला असतो. अपत्याच्या सुखासाठी ती शक्य असेल ते सारे करते. आई आणि मुले हे एकमेकांचे सर्वस्व असतात. निरपेक्ष प्रेम हे आईचे वैशिष्ट्य असते. त्यामुळे मायलेकांचे नाते हे सर्वोत्कृष्ट मानले आहे. मुलांच्या शिक्षणासाठी, प्रगतीसाठी, सुरक्षित भविष्यासाठी ती वैयक्तिकरीत्या अनेक तडजोडी करते. ही प्रत्येक आईची गुणवैशिष्ट्ये आहेत. ती सर्वसामान्य आहेत, अंगभूत आहेत. पण अनेकदा, ती मुलांच्या अती लाडापोटी चुकतेसुद्धा. 'सुपरकीड'ची 'सुपरमॉ' बनण्याच्या हव्यासापोटी ती भरकटतेही.

मुलांवर आपल्या अपेक्षांची ओझी लादून, त्यांचे बाल्य हिरावले जाते आहे, याचेही तिला भान नसते. मुलांचे बोट धरून चालताना, त्यांना वाढवताना ती सक्षम झाल्यावर एक क्षण असा येतो जेव्हा मुलांचे बोट अलगद सोडून त्यांना स्वातंत्र्य द्यायचे असते. मुलांचे विवाह झाले की आईच्या भूमिकेतून हलकेच अंग काढून घ्यायचे असते. पण ही समयोचित वागणूक अनेक आयांना जमतेच असे नाही. 'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे' (कोणी लिहिले आहे देव जाणे) हे ब्रह्मवाक्यसुद्धा आईवर लादले जाते. मातेच्या भूमिकेतून तिने कधी बाहेरच येऊ नये, असा 'सोयीस्कर बहुान' तिच्या गळी उतरवला जातो आणि या अपेक्षांच्या दडपणाखाली, 'पुत्राचे सहस्त्र अपराध, माता काय मानी तयाचा खेद' असे म्हणत ती अपत्याचे लाड करते. त्याच्या चुका पोटात घालते.



स्वतः झिजत राहते आणि मग या आईचे काळीज प्रेयसीकडे घेऊन जाताना मुलगा ठेचकाळतो, तेव्हा 'तुला लागले तर नाही ना बाळा?' असा हुंकार त्या आईच्या काळजातून येतो. हे तर आईच्या उदात्तीकरणाचे अतिरेकी उदाहरण आहे. त्यावर अजून तडका मारणारी लोकप्रिय मालिका म्हणजे 'आई कुठे काय करते?' यातल्या अरुंधतीला 'महाराष्ट्र भूषण' नक्की मिळणार बघा! सध्याची मालिकेची लांबण बघता 'आई तू कशाला काही करते?' असे म्हणावेसे वाटते.

वास्तविक, भारतीय संस्कृतीने 'मातृत्वा'चा गौरव केला आहे; 'आई' या मर्यादित व्यक्तिमत्त्वाचा नाही. मातृत्व ही एक उदात्त, उन्नत वृत्ती आहे. ती मानवी जीवनाची परमोच्च, उत्कट भावना आहे. सगळ्या संतांना त्यांचे परमभक्त 'माउली' म्हणतात. 'विठु माझा लेकुरवाळा' या संत जनाबाईच्या अभंगातून किंवा 'बाप आणि आई, माझी विठ्ठल रखुाई' या संत एकनाथांच्या अभंगातून प्रतीत होणारे सर्वव्यापी, निरपेक्ष निर्मळ मातृत्व उच्च कोटीच्या संतांध्ये प्राधान्याने दिसून येते. राणी कौसल्येला आदर्श मातृत्वाचे प्रतीक समजले जाते. पण हा बहुान कैकेयीला का मिळाला नाही? कारण तिच्या मातृत्वाला स्वार्थ आणि मत्सराची किनार होती.

महानायक श्रीकृष्णाची आई देवकी, पण श्रीकृष्ण वाढला तो यशोदेच्या वत्सल छायेत. अगदी प्रसिद्ध उदाहरणे बघायची तर फ्लॉरेन्स नाईटिंगेल, मदर टेरेसा, माता जिजाबाई, सिंधुताई सपकाळ यांचे वंदनीय मातृत्व कायम प्रेरणा देणारे आहे आणि महत्त्वाचे म्हणजे ही मातृत्व वृत्ती पुरुषातही असते तसेच आई होऊ न शकलेल्या स्त्रीच्या ठायीही असते. थोडक्यात काय, तर आई आणि मातृत्व वृत्ती यांच्यात गल्लत होऊ नये. स्त्री ही व्यक्ती म्हणून उत्तम असेल तर ती आई म्हणूनही उत्तमच असते. अविवेकी, अविचारी स्त्री असेल तर ती आईही तशीच असू शकते. स्त्री व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगीण मूल्यमापन केल्यानंतरच तिच्या 'आईपणा'ला जोखणे गरजेचे आहे. म्हणूनच केवळ 'आई होणे' हे जीवनाचे सार्थक नाही तर जिजामातेसारखी मातृत्व वृत्ती असेल तरच शिवाजी घडतात.

मुलांना सतत उपदेश देऊन, त्यांची तुलना करून अनेक क्लासेसना पाठवून संस्कार होत नसतात. पालकांची दैनंदिन, प्रासंगिक वागणूक आणि कौटुंबिक वातावरण यातून संस्कार आपोआप झिरपतात. म्हणूनच म्हणावेसे वाटते, 'आई तू कशाला काही करते?'

# होर्मुझ कळीचा मुद्दा की अणुयुद्धाची कळ



**सद्यस्थितीत इराणची भूमिका रणनीतिक डावपेच समजून क्षम्य ठरू शकेल का? दोन दशलक्ष डॉलर प्रति जहाज टोल लावण्याची भाषा गूढ वाटते; पण इराण आमच्या विनाशाची भाषा वर्षानुवर्ष करतो आहे आणि तो देश कधीही अण्वस्त्र सज्ज होऊन आम्हाला नष्ट करू शकतो, असे हजारो अण्वस्त्र असलेल्या अमेरिका आणि इस्रायलचे म्हणणे अतार्किक वाटते.**

वेध **अरुण महाजन**

सद्यस्थितीत जगावरच एक महासंकट आहे; अगदी कोविडपेक्षाही मोठं! होर्मुझ कळीचा मुद्दा न राहता अणुयुद्धाची कळ झाल्यास त्याचे परिणाम दूरगामी, वर्षानुवर्ष आणि अनेक पिढ्यांना भोगावे लागतील. या युद्धाळू वेड्यांनी एकत्र बसूनच चर्चेतून तोडगा काढणे गरजेचे आहे. एकदा नाही निघाला तर परत परत भेटा. कुठेच जम बसत नसेल तर आमच्या तीन हजार वर्षांची मानवी संस्कृती लाभलेली काशी (बनारस) मुख्य मुद्दा बनवा; अन्य खूप मुद्द्यांची यादी न ठेवता हा एकच मुद्दा ठेवा... अन्यथा सहा महिने युद्ध विराम; सहा महिने हार्मुझ खुला; सहा महिने फक्त चर्चे तून तोडगा... अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनीअर झाल्यावर मी मर्चंट नेव्हीमध्ये तब्बल २० वर्षे काम केले. अगदी थर्ड इंजिनीअरपासून ते चिफ इंजिनीअरपर्यंत. 'तब्बल' याकरिता म्हटले की, सुरुवातीला जरी जगभरातल्या सगळ्या समुद्रातल्या सफरी आव्हानात्मक आणि आकर्षक वाटत असल्या, तरी चिफ इंजिनीअर होईपर्यंत एकाच जहाजावर चार ते पाच महिने; कधी कधी आठ ते नऊ महिने घरापासून- बायको-मुलापासून दूर राहणे कंटाळवाणे आणि निरर्थक वाटू लागते.

या २० वर्षांच्या प्रवासां ध्ये मी वेगवेगळ्या कंपन्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या जहाजांवर काम केले. नावे सांगायची झाल्यास एमटी सीएचएम, पिरू सिंग (पीव्हीसी), एमव्हीसीएमबी विनर, एमव्ही फ्रीडम, एमव्ही हारमनी अशी नाव घेता येतील. या जहाजांमध्ये गहू, खते, क्रुड आणि कधी कधी युद्धसामग्रीही असायची. गहू आणि युद्धसामग्रींनी भरलेली जहाजे लुटारूंची, समुद्री चाच्यांची आवडती असतात. जहाजांवर चिफ इंजिनीअर जरी इंजिन साईड म्हणजे अभियांत्रिकी विभागाचा सर्वश्रेष्ठ अधिकारी असला, तरीही नेव्हिगेशन साईड म्हणजे दळणवळण विभागाचा कॅप्टन सगळ्यात मोठा ऑफिसर असतो. तोच जहाजावर सर्वेसर्वा असतो. हो ुझच्या सामुद्रधुनीतून माझ्या कार्यकाळात मी कमीत कमी दहा वेळा तरी प्रवास केला असेल. सध्या हा एक कळीचा मुद्दा झा- लेला आहे.

सामुद्रधुनी म्हणजे दोन विशाल जलाशयांना किंवा समुद्रांना जोडणारा पाण्याचा नैसर्गिक अरुंद दुवा आहे. सामुद्रधुनी दोन भूभागांना वेगळे करते. भारत आणि श्रीलंका दरम्यानची पाल्कची सामुद्रधुनी आपल्या सगळ्यांना माहिती आहे. प्रभू रामचंद्रांनी वानरसेनेच्या मदतीने इथेच 'रामसेतू' बांधलेला आहे. राम सेतूच्या दगडांची संरचना पाहता रामसेतू मानव निर्मित असावा, यात दु त नसावे. कदाचित त्यामुळे इथली खोली मोठ्या जहाजांना ये- जा करण्यासाठी योग्य नाही. त्या मानाने होर्मुझची रुंदी ३० किमी इतकी असूनही खोली मोठ्या विशालकाय जहाजांना जाण्यायेण्यासाठी सुयोग्य आहे. तसं म्हटलं तर आज होर्मुझ कोणत्याही देशाच्या मालकीची किंवा सागरी हद्दीत न येणारी घोषित करण्यात आलेली आहे. ही पर्शियन आणि ओ ानच्या आखातामधली अरुंद सामुद्रधुनी आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या पहिले पोर्तुगीज आणि त्यानंतर इंग्रजांच्या अधिपत्याखाली होर्मुझ होती. आता 'युनायटेड नेशनसब कन्व्हेंशन ऑन द लॉ ऑफ सी नुसार जगातल्या सगळ्या देशांना इथून 'राईट टू ट्रान्झिट' आहे; तेही कुठल्याही प्रकारचा टोल न देता आणि कुठल्याही अटीबिना आपण बिनाथांबा पार करू शकतो. मात्र, होर्मुझमधल्या कोणत्याही बंदरावर थांबल्यास वापराप्रमाणे सर्व्हिस चार्ज द्यावा लागतो. आता मर्चंट नेव्ही सोडून बरीच वर्षे झाली असली आणि होर्मुझमधून पाणी वाहून गेलेलं नसलं, तरी गेल्या कित्येक वर्षांत अनेक महाकाय जहाजांनी कुठलाही टोल न भरता असंख्य खेपा घातल्या असतील. या सामुद्र धुनीचा किनारा इराण, ओमान आणि युएई या तीन देशांना लाभलेला आहे. इराणला थोडा जास्त होर्मुझ अशा ठिकाणी आहे, जिथे वैध किंवा अवैध मार्गांनी नियंत्रण मिळाल्यास कुवैत, कतार, इराक आणि काही प्रमाणात युएईच्या बंदरांना, गॅस किंवा क्रुड घेऊन जाणाऱ्या किंवा येणाऱ्या जहाजांच्या वाहतुकीवर आपोआप नियंत्रण मिळविता येऊ शकते. स्पिड बोटस्, समुद्री सुरुंग आणि मिसाईलस्च्या धाकावर अधिपत्य गाजवता येऊ शकते. हे म्हणजे एखाद्या वर्दळीच्या सरकारी जमिनीवर वरपर्यंत हात पोहोचलेल्या गुंडाने कुंपण घालून कार किंवा स्कूटर पार्किंग लावण्यासारखे आहे. सद्यस्थितीत इराणची भूमिका रणनीतिक डावपेच समजून क्षम्य ठरू शकेल का? दोन दशलक्ष डॉलर प्रति जहाज टोल लावण्याची भाषा गूढ वाटते; पण इराण आमच्या विनाशाची भाषा वर्षानुवर्ष करतो आहे आणि तो देश कधीही अण्वस्त्र सज्ज होऊन आम्हाला नष्ट करू शकतो, असे हजारो अण्वस्त्र असलेल्या अमेरिका आणि इस्रायलचे म्हणणे अतार्किक वाटते. मर्चंट नेव्हीच्या जहाजांवर नेव्हिगेशनच्या अत्याधुनिक यंत्रणा असतात तसे रडार, एआरपीए, एआयएस, गायरो कंपास, ईसीडीआयएस इ. पण नौदलाच्या जहाजांच्या तुलनेत स्वरक्षण किंवा संरक्षणाच्या यंत्रणा नगण्यच असतात. समुद्रीचाच्यांवर, लुटारूंवर किंवा आजच्या सारख्या युद्धजन्य परिस्थितीत प्रतिहल्ला करणारी यंत्रणा बहुतेक नसतेच. या सगळ्यापासून स्वतःचा बचाव करणे किंवा त्यांना टाळणे, हा एकच मार्ग असतो. सद्यस्थितीत अशा जहाजांनी हो ुझपासून ४० ते ५० नॉटस् म्हणजे अंदाजे ८० ते ९० किलो ीटर दूर डॉक करणे आवश्यक आणि सुरक्षित असू शकते. सध्या हो ुसच्या आसपास कित्येक जहाज ताटकळत असतील. मिसाईल आणि ड्रोन युद्धात अशी जहाजे 'सिटिंग डक्स' किंवा भगवान भरोसे असतात. कोणाची डोकी कशी फिरतील, याचा ने नसतो. सध्याच्या इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल संघर्षात आणि हो ुझ बंद केल्यामुळे जगाची कशी वाट लागली आहे, हे आपल्याला ठाऊक असून आपण त्याचा अनुभवही घेत आहोत.

आपला भारत देश याला अपवाद राहणार नाही. नाश्त्याचा साधा वडापाव २० रुपयांवरून २५ रुपयांवर गेला आहे, असेही ऐकिवात आहे. १९८५ ते १९८७ च्या इराण-इराक युद्धाचा प्रसंग आहे. या युद्धाला 'टँकर युद्ध' असे म्हटले गेले होते. म्हणजे एकमेकांची क्रुडने भरलेली किंवा रिकामी जहाजे उडविणे. त्या युद्धात कित्येक टँकर नष्ट होऊन अतोनात नुकसान झाले. मुंबईहून सौदीच्या रास तनुरा बंदरातून क्रुड भरण्यासाठी एससीआयच्या एम. व्ही. पिरू सिंग (पीव्हीसी) या जहाजावर मी फर्स्ट इंजिनीअर होतो. इराणइराक च्या अतिशय धोकादायक परिस्थितीत होर्मुझ पार करून पुढे सौदीला जायचं होतं. भारतासाठी क्रुड आणणे आणि एनर्जी सिक्युरिटी अबाधित ठेवणे तेव्हाही गरजेची गोष्ट होती. एससीआय कंपनीने ती उचलली होती. मी ज्या जहाजावर होतो त्याची ६० ते ७० हजार टन क्रुड वाहून नेण्याची क्षमता होती. अशा जहाजांची ताकद १० हजार एचपी पर्यंत असते आणि स्वतःसाठी रोज किमान ५० ते ६० टन इंधन लागते. आम्हाला होर्मुझ रात्रीच पार करून पर्शियन आखात आणि पुढे रास तनुराला पोहोचण्याच्या सूचना होत्या. जहाजावर पूर्ण 'ब्लॅक आऊट' करून कुठलाही दिवा, टॉर्च न लावता अगदी केबीनसुद्धा पडद्यांनी झाकून ठेवण्याची सक्त ताकीद होती. रात्रीच्या अंधारात आणि समुद्राच्या लाटां ध्ये एवढी मोठी जहाजं त्यामुळे अस्पष्ट होतात; हा त्यामागचा मुख्य उद्देश असतो. पण हल्ला झाल्यास आणि आग लागल्यास ती त्वरित विझविण्यासाठी अँटी फायर पंप आणि होजेस् चालूच ठेवले होते. असंही ठरलं की, हो ुझमधून जहाजाला जेवढं शक्य असेल तेवढ्या वेगाने बाहेर काढायचे. आमच्या जहाजाची सर्वोत्तम गती १४ नॉटस् म्हणजे अंदाजे ताशी २६ कि.मी. होती आणि आमच्यासाठी हाच एकमेव बचावाचा मार्ग होता. सुदैवाने इंजिन रूमवर हल्ला होऊनही आम्ही होर्मुझच्या बाहेर सहीसलामत पडलो आणि रातोरात रास तनुराला पोहोचलो. सुदैवाने परतीच्या प्रवासात क्रुड भरलेले असूनही असेच रातोरात सहीसलामत सुटलो.

आपल्या देशाच्या एनर्जी सिक्युरिटीसाठी खारीचा का होईना, पण वाटा उचलता आला, याचा अभिमान आहे. परीक्षा घेणाऱ्या अशा कठीण प्रसंगी आपल्या देशाची, गावाची आणि कुटुंबाची खूप ओढ लागते. शिपिंग कंपन्या वेगवेगळ्या सोयी, भरपूर पगार, अनेक प्रकारचा विमा उतरवते; पण 'आपलं माणूस सुखरूप घरी येणे यापेक्षा दुसरी कुठलीच सोय, पगार किंवा विमा मोठा नाही', अशी माझ्यासारख्या जहाजांवर फिरणाऱ्या लोकांच्या कुटुंबातल्या सगळ्यांची भावना असते. किमान या मानवी भावनेचा सर्वच पक्षांनी विचार करावा, इतकीच अपेक्षा आहे.।। जय हिंद। जय भारत।।

(स्वेच्छा सेवानिवृत्त मुख्य अभियंता मर्चंट नेव्ही, स्वेच्छा सेवानिवृत्त सिनियर असो. प्रोफेसर तोलानी मेरीटाईम इन्स्टिट्यूट तळेगाव) **शब्दांकन : मकरंद फडके**